**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टो व तापाच्या साथीवर नियंत्रण आणण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(1) * 22815 श्री.परशुराम उपरकर, श्री.किसनचंद तनवाणी** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यात यावर्षी लेप्टो व तापाच्या साथीमुळे सुमारे 18 रूग्ण दगावले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्लेटलेट सेपरेशन युनिट सुरू झाल्यानंतरही माहे ऑगस्ट सप्टेंबर, 2011 या महिन्यात रूग्णांचे प्लेटलेट कमी झाल्यामुळे त्यांना उपचारासाठी कोल्हापूर येथे पाठविण्यात आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, रूग्णांना जिल्ह्याबाहेर पाठविण्याची कारणे काय आहेत,

(4) असल्यास, जिल्ह्यातील साथ नियंत्रणात आणण्याकरीता 21 डॉक्टरांची नियुक्ती केली होती तथापि या 21 पैकी एकही डॉक्टर सिंधुदुर्ग जिल्ह्यात रूजू झाला नाही, हे खरे आहे काय,

(5) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील उपरोक्त साथीवर नियंत्रण आणण्यासाठी आरोग्य विभागाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली आहे ?

**श्री.सुरेश शेट्टी** : (1) हे खरे आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यात माहे एप्रिल, 2011 ते 25 नोव्हेंबर, 2011 अखेर लेप्टोस्पायरोसिसमुळे 4, लेप्टोस्पायरोसिस सदृश्य लक्षणामुळे 15 व विषाणूजन्य तापाने 2 असे एकूण 21 मृत्यू झालेले आहेत.

(2) हे खरे नाही.

(3) ज्या रूग्णांमध्ये श्वसनप्रक्रिया योग्यरित्या होत नाही व इतर महत्वाचे अवयवांचे कार्य योग्यरित्या होत नाही, अशा रुग्णांना विशेष तज्ज्ञांच्या देखरेखीखाली उपचार होण्यासाठी संदर्भित करण्यात आले.

(4) हे अंशत: खरे आहे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22815.....

सिंधुदुर्ग जिल्ह्याकरीता सार्वजनिक आरोग्य विभागाकडून एम.के.सी.एल. मार्फत निवड झालेल्या 23 वैद्यकीय अधिकाऱ्यांना पदस्थापना देण्यात आली. त्यापैकी 6 वैद्यकीय अधिकारी रूजू झाले आहेत. तसेच तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध केल्या आहेत.

(5) सिंधुदुर्ग जिल्ह्यात लेप्टोस्पायरोसिस आजाराच्या नियंत्रणासाठी खालीलप्रमाणे प्रतिबंधात्मक व उपचारात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या व येत आहेत.

- लेप्टोस्पायरोसिस जोखीमग्रस्त गावांची निवड
- जोखीमग्रस्त गावात सर्वेक्षण कार्यक्रम निश्चित करणे
- क्षेत्रीय आरोग्य कर्मचाऱ्यांमार्फत नियमित रूग्ण सर्वेक्षण
- सर्वेक्षणात आढळलेल्या रूग्णांना औषधोपचार
- जोखीम गटातील व्यक्तींना प्रतिबंधात्मक औषधोपचार
- प्रा.आ. केंद्र, उपकेंद्र व जिल्हास्तरावर पुरेशा औषधसाठयाची उपलब्धता
- प्रा.आ.केंद्र स्तरावर लेप्टोस्पायरोसिस निदान चाचणी सुविधा
- जिल्ह्यातील वैद्यकीय अधिकारी, क्षेत्रीय आरोग्य कर्मचारी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, आशा स्वयंसेविका व खाजगी वैद्यकीय व्यवसायिक यांचे लेप्टोस्पायरोसिस आजारांबाबत प्रशिक्षण
- आवश्यकतेनुसार रूग्णांना संदर्भसेवा
- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय कोल्हापूर व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय गोवा येथे रूग्णांना व रुग्णांच्या नातेवाईकांसाठी मदत व मार्गदर्शन कक्ष कार्यान्वित
- विविध प्रसिद्धी माध्याद्वारे जनतेत लेप्टोस्पायरोसिस आजाराबाबत जनजागृती.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, पहिल्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरात 21 रुग्ण दगावल्याचे मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. गेल्या 7 वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील 125 रुग्ण दगावले आणि यावर्षी सुध्दा रुग्ण दगावले आहेत. शासनाच्या गेल्या पाच वर्षाच्या काळात हलगर्जीपणामुळे हे रुग्ण दगावले असे म्हटले तरी चालेल. या दगावलेल्या रुग्णांना शासन मदत करणार आहे काय, तसेच यातील काही रुग्ण कोल्हापूरला पाठविले होते. माझ्याकडे अशी माहिती आहे की, लेप्टो स्पायरासिसचे 61 रुग्ण कोल्हापूरला पाठविले होते व त्यातील 6 रुग्ण मयत झाले. त्यानंतर

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22815..... श्री. परशुराम उपरकर......

गोव्याला एकूण 85 रुग्ण पाठविले होते, त्यातील 4 मृत झाले. अशा प्रकारे बाहेर पाठविलेल्या रुग्णांपैकी 10 रुग्ण दगावले आहेत. शासनाने या जिल्ह्यासाठी गेल्या चार वर्षांपासून ब्लड कंपोनंट सेपरेशन युनिट बसविले आहे त्यात विलंब झाला व हलगर्जीपणामुळे संबंधितांवर कारवाई करण्यात येईल काय, त्यानंतर तिसरा प्रश्न असा आहे की, जी मुले बाहेर पाठविण्याची कारवाई केली त्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी शासनाची जी टीम गेली होती त्या टीमने कोणत्याही हॉस्पिटलमध्ये न जाता अथवा एकाही रुग्णाला न भेटता पाहणी केली. शासनाची टीम येणार म्हणून दोन आमदार महोदय त्यांची वाट पाहत बसले होते त्यांनाही न भेटता परस्पर हे सचिव महोदय गोव्याला टूरसाठी निघून गेले. त्यासंदर्भात आम्ही त्यांच्यावर हक्कभंग सुध्दा दिलेला आहे. अशा अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, आमदार महोदयांनी विचारलेल्या पहिल्या प्रश्नात जी आकडेवारी दिलेली आहे त्यासंदर्भात मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की माझ्याकडे गेल्या तीन वर्षांचे आकडे आहेत. सन 2009-10 या वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यात फक्त एकच रुग्ण लेप्टो स्पायरासिसमुळे मृत झाला, संपूर्ण राज्यात एकूण 40 रुग्णांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर सन 2010-11 या वर्षात सिंधुदुर्ग जिल्ह्यात 25 रुग्ण याच रोगाने दगावले व संपूर्ण राज्यात रत्नागिरीच्या 6 रुग्णांचा समावेश करुन ही संख्या 73 इतकी होती. नंतरच्या म्हणजेच सन 2011-12 या वर्षात म्हणजेच चालू वर्षात फक्त 4 रुग्णांचे निदान झाले असून त्यात राम बाळकृष्ण सावंत, शरद दत्ताराम मुलम, मच्छिंद्र विठोबा गणकर आणि संदीप महादेव पालव असे चार लोक असून ही शासकीय आकडेवारी आहे. वृत्तपत्रातून काही बातम्या कदाचित आल्या असतील की 21 लोकांचा मृत्यू झाला किंवा 30 लोक दगावले पण माझ्याकडील माहिती ही ऑथेंटिक स्वरुपाची व शासनाची आकडेवारी आहे.

सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न ब्लड कंपोनंट युनिटच्या सेपरेशनबाबत विचारलेला आहे. त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, या सेपरेशन युनिटचा या जिल्ह्याला खूप फायदा झालेला आहे. त्या व्यतिरिक्त प्रायव्हेट हॉस्पिटलमधून मागणी आली किंवा त्यांना मदत लागली तरी आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ ST/ D/ 11:00

ता.प्र.क्र.22815..... श्री. सुरेश शेट्टी ......

त्यांना मदत करतो.

तिसरा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे की, शासनाची टीम या जिल्ह्याला भेट देण्यासाठी गेली होती. त्यासंदर्भात मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, माझ्याकडे एक आमदार महोदय येऊन म्हणाले की, आपण सुध्दा या जिल्ह्याला भेट द्यावी तेव्हा मी आमच्या विभागाचे अप्पर मुख्य सचिव यांना सिंधुदुर्ग जिल्ह्याला भेट देण्याची सूचना केली होती. त्यांना सांगितले की आपण सकाळच्या विमानानेच जावे. त्यानुसार ते या जिल्ह्याला भेट देण्यासाठी गेले होते. त्याचबरोबर माननीय राज्य मंत्र्यांनी सुध्दा तेथे भेट दिली व परिस्थितीचा आढावा घेतला होता. अप्पर मुख्य सचिवांसोबत मुंबईचे एक सन्माननीय आमदार सुध्दा उपस्थित असल्याने ते या घटनेचे साक्षीदार आहेतच. त्यानंतर काही लोकांनी असा हट्ट धरला होता की, अप्पर मुख्य सचिवांनी सिव्हील हॉस्पिटलमध्ये जाऊन भेट द्यावी. त्यानुसार अप्पर मुख्य सचिवांनी तयारी सुध्दा दाखविली होती पण त्या ठिकाणी अप्पर मुख्य सचिवांनी भेट दिली तर कदाचित काही राजकीय लोक काळे झेंडे लावून त्यांना घेराव घालणार असल्याची शंका स्थानिक जिल्हाधिकारी यांना आली. तसे झाले तर कदाचित कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न सुध्दा निर्माण होऊ शकतो त्यामुळे आपण भेट देऊ नये असा सल्ला त्यांनी दिला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 22815...

श्री. सुरेश शेट्टी ..

त्या ठिकाणी मी जाऊ नये असे जिल्हाधिकारी सांगत असल्यामुळे मी आता काय करु असे त्यांनी मला फोनवरुन विचारले तेव्हा मी त्यांना सांगितले की, तुम्ही सर्व सन्माननीय आमदाराची तसेच पत्रकारांची भेट घ्या तसेच काही लोकांचीही भेट घ्या. परंतु जिल्हाधिकारी तसेच पोलीस अधिकारी तेथे जाऊ नका असे सांगत असल्यामुळे तुम्ही तेथे जाऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल अशा ठिकाणी जाऊ नका. त्या ठिकाणचे काम झाल्यानंतर संबंधित अधिकारी गोवा येथे गेले.

लेप्टो रुग्णांना कोल्हापूर येथे घेऊन जावे लागते परंतु कोल्हापूर पेक्षा पणजी येथील गोवा मेडीकल कॉलेज जवळ पडते त्यामुळे रुग्णांना गोवा मेडीकल कॉलेजमध्ये उपचार करण्याची व्यवस्था करण्यात यावी यासाठी मी गोव्याचे माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा केली होती. मुंबईमध्ये अधिवेशन सुरु असतांना या विषयाच्या संदर्भात सभागृहात माहिती दिलेली आहे. आपल्या विनंतीला मान देऊन गोव्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सिंधुदुर्ग जिल्हयांच्या रुग्णासाठी गोवा मेडीकल कॉलेजमध्ये एक स्वतंत्र काऊंटर सुरु केले असून त्यांनी मला आश्वासन दिले आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील कोणताही रुग्ण आला तर त्याच्यावर उपचार केले जातील व यासंदर्भात जो काही खर्च येईल तो शासनाने नंतर द्यावा. सिंधुदुर्ग येथील रुग्णांना गोवा मेडीकल कॉलेजमध्ये उपचार करण्यासाठी जाता यावे यासाठी ट्रान्सपोर्टची व्यवस्था करण्याच्या संदर्भात जिल्हाधिका-यांना आदेश देऊन ट्रान्सपोर्टची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. संबंधित अधिकारी गोवा येथे सुट्टी घालवण्यासाठी गेले नव्हते तर शासकीय कामांसाठीच गेले होते एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, गेल्या 10 वर्षापासून सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. यावर्षी माननीय मंत्री महोदयांनी सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये लेप्टोच्या संदर्भात चांगल्या उपाययोजना केल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो. या वर्षी सिंधुदुर्ग जिल्हयातील रुग्ण कमी प्रमाणात दगावले आहेत परंतु पुढील भविष्य काळात एकही रुग्ण दगावणार नाही यासंदर्भात कोणती खबरदारी घेतली जाणार आहे ? सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टर येण्यास इच्छूक नसतात. त्यामुळे यासंदर्भात माझा प्रश्न असा आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये बीएएमएस डॉक्टर्स

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 22815...

श्री. राजन तेली...

मोठया प्रमाणात उपलब्ध आहेत त्यामुळे त्यांना संधी मिळाली तर त्या ठिकाणच्या पीएचसीचे काम चांगल्या प्रकारे सुरु होऊ शकेल. बीएएमएसच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी ऑर्डर दिली होती परंतु सिंधुदुर्गच्या सीईओ यांनी नोटीस काढून महाराष्ट्रातील डॉक्टरांना बोलावले. या डॉक्टरांना आपण केवळ 14 हजार रुपये मानधन देणार आहोत. त्यामुळे खास बाब म्हणून सिंधुदुर्ग जिल्हयातील बीएएमएस डॉक्टरांना लेप्टोसाठी घेतले जाणार आहे काय ? गेल्या 10 वर्षात लेप्टोमध्ये जे रुग्ण दगावले आहेत त्यांच्या वारसांना शासन आर्थिक मदत देणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, गेल्या 7-8 वर्षापासून सिंधुदुर्ग तसेच रत्नागिरी जिल्हयात लेप्टोचा मोठया प्रमाणात त्रास होत होता. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, वेस्टर्न कोस्ट म्हणजे कच्छ ते केरळ येथे लेप्टोचा त्रास जाणवतो. इस्टर्न कोस्टमध्ये लेप्टोचा त्रास जाणवत नाही. कच्छ, कारवार, रत्नागिरी तसेच सिंधुदुर्गमध्ये लेप्टोचा त्रास जाणवत असतो. ज्या ठिकाणी उंदराची संख्या जास्त असते अशा ठिकाणी लेप्टोचा त्रास जाणवत असतो. या विषयाच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाल्यानंतर आरोग्य विभागाने लेप्टोच्या संदर्भात जे पाऊल उचलले आहे तसे पाऊल इतर कोणत्याही राज्याने उचलले नाही. एनसीडीसी कडून यासंदर्भात प्रोग्राम आयोजित करण्यात आला होता तसेच अंदमान-निकोबार येथील लॅबमध्ये तसेच पुणे येथील एनआयसी येथे आपल्या लोकांना पाठवून ट्रेनिंग देण्यात आले होते. मुंबईतील केईएम हॉस्पीटलमधील डॉक्टरांना रत्नागिरी तसेच सिंधुदुर्ग जिल्हयात पाठविले होते. या सर्व उपाययोजनेमुळे आपल्या कडे लेप्टोचा त्रास कमी झालेला आहे. आज अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, केरळ येथील डॉक्टर्स अधिका-यांना फोन करुन विचारतात की, तुम्ही लेप्टो कसा काय कंट्रोलमध्ये आणला आहे ? आरोग्य विभागाच्या अधिका-यांनी लेप्टोच्या संदर्भात चांगले पाऊल उचलल्यामुळे आपण लेप्टो कंट्रोलमध्ये आणू शकलो त्यामुळे मी त्यांचे अभिनंदन करतो. या वर्षी लेप्टोच्या आजारात चार रुग्ण दगावले आहेत परंतु पुढील वर्षी एकही रुग्ण दगावणार नाही याची काळजी घेतली जाईल. लेप्टोच्या आजारासंदर्भात ग्रामविकास खाते तसेच संबंधित खात्यांना बरोबर घेऊन काम करावे लागणार आहे.

..3..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 22815...

श्री. सुरेश शेट्टी ..

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी डॉक्टरांच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टर जाण्यास नाखूष असतात. यावर्षी रत्नागिरी येथे 23 डॉक्टरांना पोस्टींग दिली आहे परंतु 23 डॉक्टर्सपैकी केवळ 6 डॉक्टर्स रुजू झाले असून बाकीचे डॉक्टर्स माझ्याकडे पोस्टींग घेण्याच्या अगोदरच बदलीसाठी आले होते. त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, तुमची बदली मी करणार नाही. या डॉक्टरांची बदली केली नाही म्हणून या डॉक्टरांनी नोकरी सोडून दिली परंतु रत्नागिरी येथे गेले नाही. आता डॉक्टरांच्या संदर्भात नवीन जाहिरात काढली असून त्यामध्ये 1058 डॉक्टर्स घेतले जाणार आहेत. रिक्रुटमेंट प्रोसिजरमध्ये आदिवासी आणि नक्षलग्रस्त भागात जे डॉक्टर्स पहिली पोस्टींग घेतील त्यांना मेरीटमध्ये ॲडीशनल 20 मार्क्स दिले जाणार आहेत. तसेच सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्हयात फर्स्ट पोस्टींग घेतली तर अशा डॉक्टरांना 20 मार्क्स एक्स्ट्रा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. आता डॉक्टरांची जाहिरात काढली असून त्यामध्ये आपल्याला किती डॉक्टर्स मिळतात ते बघून पोस्ट शिल्लक असेल तर स्थानिक बीएएमएस डॉक्टर्स ॲडहॉक बेसीसवर घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी या प्रश्नाच्या संदर्भात सांगितले आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयात डॉक्टरांची पोस्टींग केली तर डॉक्टर्स नोकरी सोडतात परंतु पोस्टींग घेत नाहीत. सिंधुदुर्ग जिल्हयात कोणाच्या दहशतीमुळे डॉक्टर्स जाऊ इच्छित नाहीत ? खरे म्हणजे गृह खात्यावर मंत्रीमहोदयांनी आक्षेप घेतलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी लेप्टोच्या संदर्भात आकडेवारी दिलेली आहे. लेप्टोच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. परंतु माननीय मंत्रीमहोदय या प्रश्नाच्या संदर्भात शब्दच्छल करीत आहेत. लेप्टो सदृश्य आजार व लेप्टो असा फरक केला जात आहे. लेप्टो आजाराच्या रुग्णांना सदृश्य आजारात टाकून यामध्ये दगावलेल्या रुग्णांना

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 22815...

डॉ. दीपक सावंत ..

लेप्टोच्या आजारापासून दूर करण्याचा प्रयत्न केला जातो व असे सांगितले जाते की, हे रुग्ण लेप्टोच्या आजाराने दगावले नाहीत अशा प्रकारचा शब्दच्छल अधिकारी करीत असतात. लेप्टोच्या रुग्णांना कोल्हापूर येथे पाठवले आहे. गेल्यावर्षी मी सुध्दा या प्रश्नाच्या संदर्भात कोल्हापूरला भेट दिलेली आहे. जास्तीत जास्त रुग्ण ट्रान्सपोर्टमध्ये दगावले आहेत का ? खरे म्हणजे रुग्ण वाहिकेमध्ये व्हेंटीलेटर नसल्यामुळे रुग्ण दगावले आहेत. लेप्टोच्या संदर्भात बाकीच्या राज्यातून सल्ला मागितला जात आहे असे माननीय मंत्री महोदयांनी आता सांगितले आहे. लेप्टो सदृश्य तापाने आजारी असलेल्या रुग्णासांठी कोणती काळजी घेतली जाणार आहे ? आपल्याकडे सेप्रेशन युनीट सुरु असतांना आपल्याकडील रुग्ण गोव्याला का गेले होते ? सेपरेशन युनीट नंतर किती रुग्णांना आपण प्लेटलेट दिलेल्या आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : सभपाती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, जे रुग्ण ताप आल्याबरोबर आपल्या दवाखान्यात येतात त्यांच्यावर त्वरित ईलाज होऊन ते बरे होत असतात. ताप आल्याबरोबर जे रुग्ण आपल्या दवाखान्यात आलेले आहेत त्यातील 92 टक्के रुग्ण बरे होऊन घरी गेलेले आहेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ शरद.. 11:20

ता.प्र.क्र.22815...

श्री.सुरेश शेट्टी....

ती नावे मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. काही रूग्ण असे असतात की, पहिल्यांदा ते खाजगी डॉक्टरांकडे जातात. ते एकदम सिरियस झाल्यानंतर आपल्या रूग्णालयात येतात. लॅप्टो कसा बळावतो हे डॉ.दीपक सावंत यांना माहीत असेल. या आजारावर उपचार देण्यास विलंब झाला तर मल्टीपल ऑर्गन फेल्युअर होतात. तेव्हा अशा रूग्णांना सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये पाठवावे लागते. अशी रूग्णालये कोल्हापूर व पणजी येथे असल्यामुळे रूग्णांना तेथे पाठवावे लागते. त्यावेळी आपल्याकडे जी रूग्णवाहिका उपलब्ध असते त्यात रूग्णांना घालून तेथे नेले जाते. नाही तर मग एनआरएच अंतर्गत खाजगी गाडी हायर करून रूग्णांना तेथे नेले जाते. कधी कधी असे होते की, रूग्ण अत्यंत गंभीर असल्यामुळे कोल्हापूर पर्यंत नेईपर्यंत त्यांचे वाटेतच निधन होते. यासंबंधी आपल्याला जिल्ह्यात जास्तीत जास्त अव्हेरनेस कार्यक्रम आखावा लागेल. पुढच्या वर्षीपासून पावसाच्या आधी ट्रीटमेंट घेण्यासंबंधी अव्हेरनेस कार्यक्रम आखण्याची मोहीम आपण हाती घेणार असून तेथे रूग्णवाहिका देखील ठेवण्याची व्यवस्था केली जाईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले ते खरे आहे. मी गेल्या वर्षी तेथे गेलो होतो. त्यावेळी तेथील अधिकाऱ्यांचे माननीय मंत्रिमहोदयां बरोबर बोलणे करून दिले होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सदर प्रश्न 7-10 वर्षापासून भेडसावित आहे. मंत्रिमहोदयांनी सांगितले की, नेमणुका देऊन सुद्धा 21 जण तेथे जायला तयार नाहीत. त्यासाठी आता ते इन्सेन्टीव्ह देखील देणार आहेत. गडचिरोली जिल्ह्यात जाणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांसाठी एक ग्रेड पे वाढवून देतो. तसा विचार याबाबत करता येईल काय, असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे. लेप्टोच्या साथीला आळा घालण्यासाठी आपण अंदमान निकोबार येथे प्रशिक्षणासाठी कर्मचारी/अधिकाऱ्यांना पाठविले होते. ते प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर त्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. ज्यासाठी त्यांना पाठविले त्याचा काहीही उपयोग झाला नाही. ते कर्मचारी प्रशिक्षणावरून आल्यानंतर त्यांच्या लगेच बदल्या केल्या आहेत. कोणकोण प्रशिक्षण घेऊन आले व

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांच्या बदल्या कधी झाल्या यासंबंधातील यादी माझ्याकडे आहे. तेव्हा त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा तेथे नेमणार काय, असा माझा दुसरा प्रश्न आहे. आज आपल्याकडे साधनसामुग्री आहे, पण तंत्रज्ञ उपलब्ध नाहीत. हे मी आपल्या निदर्शनास सहा महिन्यापूर्वी, दहा महिन्यापूर्वी असे दोन-तीन वेळा आणले आहे. पण यात आपण हतबल आहात की विभाग हतबल आहे हे मला काही कळत नाही. तेव्हा यासंबंधी शासन ठोस काही सांगणार आहे काय. ठराविक दिवसामध्ये भात कापणी होते त्यावेळी हे सर्व सुरू होते. सगळे नमुने हे ऑल इंडिया इन्स्टिटयूट, पुणे येथे जातात. तेव्हा या संस्थेच्या तंत्रज्ञांचा एक बेस कॅम्प तात्पुरत्या स्वरूपात या जिल्ह्यात करता येईल काय, असा माझा प्रश्न आहे. असे केल्याने लवकर निदान होऊन रूग्णांना त्वरित उपचार देता येतील. तेव्हा असा काही विचार शासन करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती स्पेशल ग्रेड पे देऊन करतो त्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये डॉक्टरांची नेमणूक करता येऊ शकेल काय, असा प्रश्न विचारला आहे. मी आपल्या मार्फत सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, आता आपण स्पेशालिस्ट नेमण्यासंबंधीचा रिक्रूटमेंट ड्राईव्ह घेतला आहे. आपल्या राज्यात पहिल्यांदा आपण स्पेशालिस्ट नेमण्याचा प्रयत्न करणार आहोत. 800 स्पेशालिस्टची नेमणूक करण्याकरिता आपण जाहिरात दिली आहे. आपल्याकडे स्पेशालिस्टचा ग्रेडच नव्हता. आता आपण आर.आर.चेंज केलेला आहे. आर.आर.चेंज करण्यासाठी थोडा वेळ लागलेला आहे. आता आपण पी.जी.आणि स्पेशालिस्टसाठी पोस्ट क्रिएट केल्या आहेत. त्यासंबंधी आपण जाहिरात दिली असून त्यास कसा प्रतिसाद मिळतो हे पाहणार आहोत. त्यानंतर निर्णय घेणार आहोत. पुण्यातील एनआयव्हीचा एक गट सिंधुदुर्गमध्ये स्थापित करू शकतो काय, असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे.

येथे सन्माननीय सदस्यांनी सांगितले भात कापताना लॅप्टोची बाधा शेतकऱ्यांना होते. गेल्या वर्षी भात कापणी झाल्यानंतर लॅप्टोची साथ सुरू झाली आहे. या वर्षी असे दिसून आले की, भात पीक कापण्याच्या आधी म्हणजे भात लावतानाच लॅप्टोची लागण

..3





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22815...

श्री.सुरेश शेट्टी....

झाली. खरे म्हणजे तो पिरिएड पाऊस आल्यानंतरच सुरू होतो. तेथे आपल्याला कमीतकमी चार महिने पथक ठेवावे लागेल. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे ती सजेशन फॉर ॲक्शन. सन्माननीय सदस्यांनी तंत्रज्ञांचा मुद्दा देखील मांडला आहे. आपल्या राज्यात जवळ जवळ 4 हजार टेक्निशियन्सची पदे रिक्ते आहेत. पुढील 2-3 महिन्यात आपली जाहिरात येणार आहे. सर्व पदे भरण्यासाठी एकच जाहिरात काढणार आहोत. मी कालच माहिती घेतली. तेव्हा मला असे कळले की, 2-3 दिवसांमध्ये या पदांची जाहिरात येणार आहे. त्यामुळे राज्यातील जेवढी म्हणून टेक्निशियन्सची पदे रिक्त आहेत ती भरण्याचा प्रयत्न आम्ही करणार आहोत. रत्नागिरी सिंधुदुर्ग आणि नंदूरबार या तीन जिल्ह्यामधून बदली करण्यासाठी कितीही विनंत्या आल्या तरी आम्ही एकही विनंती एन्टरटेंन केलेली नाही आणि कोणाचीही बदली केली नाही.

......

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ शरद.. 11:20

**गेवराई तालुक्यातील उजव्या कालव्याची दुरुस्ती करणेबाबत करावयाची उपाययोजना**

**(2) * 22280 ॲड्. उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले** : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या उजव्या कालव्याची दुर्दशा झाल्याचे माहे ऑगस्ट, 2011 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर कालव्याची दुरुस्ती करणेबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**##श्री.सुनील तटकरे** : (1) हे खरे नाही. तथापि पैठण उजवा कालव्यावर आवश्यक त्या ठिकाणी दुरुस्ती करण्याची कार्यवाही चालू आहे.
(2) प्रश्न उद्‌भवत नाही.
(3) प्रश्न उद्‌भवत नाही.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

ॲड.उषाताई दराडे : सभापती महोदय, आवश्यक त्या ठिकाणी दुरूस्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे असे मोघम उत्तर देण्यात आले आहे व पुढच्या तीनही प्रश्नांना प्रश्न उद्‌भवत नाही अशा प्रकारचे लेखी उत्तर देण्यात आले आहे. 90 गावे आणि 810 कि.मी.अंतरातून जाणारा हा कालवा आहे. गेवराई तालुक्यातील बोरगाव, कुरणपिंपरी, कोल्हे, राक्षसगोंड, गोंदी, शेलू,यासह अनेक गावातून जाणारा हा कालवा आहे. या कालव्याला खड्डे पडले असून तेथे मातीचे ढिगारे आहेत. आज या कालाव्याची अवस्था वाईट झालेली आहे. ती का झालेली आहे. येथे आपल्या अधिकाऱ्यांनी चुकीचे उत्तर रिपोर्टींग केलेले आहे. त्याच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ? कालवाच चुकीच्या ठिकाणी झालेला आहे. झाडे उगवणे, खड्डे पडणे, ढिगारे होणे ही समान्य परिस्थिती एका दिवसात निर्माण होऊ शकत नाही. कागदावर काम झालेले आहे. त्यामुळे सदर कालव्याची दुरूस्ती किती दिवसात पूर्ण करण्यात येणार असून ज्याने चुकीचे रिपोर्टींग केले आहे त्याच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? ..5



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

BGO/ D/ ST/ शरद.. 11:20

ता.प्र.क्र.22280...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, जायकवाडी प्रकल्प क्रमांक 2 अंतर्गत पैठण उजवा कालवा अंतर्भूत आहे. सन्माननीय सदस्य श्रीमती उषाताई दराडे यांनी गेवराई तालुक्यातील प्रश्न विचारला आहे. गेवराई तालुक्यातील साखळी क्रमांक 28 ते 60 या कि.मी.मधील कालवा मोठ्या प्रमाणावर नादुरूस्त झालेला आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. या कालाव्याची विसर्ग क्षमता 2250 क्युसेक्स होती ती 800 क्युसेक्सवर आलेली होती. या सर्व गोष्टीचा विचार करत मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत सन 2005 व 2007 मध्ये एकंदर 30 कोटी 49 लक्ष रूपयांची तरतूद करण्यात आली होती. आता पर्यंत जवळपास 37 कोटी 69 लाख रूपये खर्च झालेले आहेत. एवढेच नव्हे तर यांत्रिकी विभागाच्या मार्फत 12 लक्ष 48 हजार घनमीटर माती भरावाचे काम देखील झालेले आहे. यासाठी 18 कोटी रूपयांचा खर्च झालेला आहे. त्यामुळे विसर्ग क्षमता 800 क्युसेक्स होती ती 1200 क्युसेक्सवर गेलेली आहे. सिंचन क्षमतेमध्ये सुद्धा 8000 हेक्टरची वाढ झालेली आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या 15 कामा संबंधीचा प्रश्न विचारला आहे, ती कामे जून 2012 पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. ही पहिल्या टप्प्यातील सुरू असलेली कामे आहेत. दुसऱ्या टप्प्यामध्ये सुद्धा आम्ही 83 कोटी रूपयांची कामे प्रस्तावित केली आहेत. ही सर्व कामे जून 2012 पर्यंत पूर्ण करण्याची तजवीज आम्ही ठेवलेली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मराठवाड्याला वरदान ठरणारा जायकवाडी प्रकल्प आहे. कै.यशवंतराव चव्हाण आणि श्री.शरद पवार यांच्या प्रयत्नांमुळे हा प्रकल्प उभा राहिलेला आहे. मराठवाड्यातील 8 जिल्ह्यांपैकी 5 जिल्ह्यांना या प्रकल्पामुळे पाणी मिळत आहे. बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील 90 गावांतून जाणारा हा कालवा आहे. येथे मंत्रिमहोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे. मी आपल्या मार्फत त्यांना फोटो पाठवतो. कालव्याच्या दोन्ही बाजूला गवत उगवलेले आहे. येथे दर दोन वर्षांनी फरशा टाकण्याचे काम होते. श्री.सुनील तटकरे हे कर्तव्यदक्ष मंत्री आहेत. आपण नवीन तंत्रज्ञानाचा वापर का करीत नाही ? आपण गुत्तेदारांना पोसण्यासाठी असे आपण करीत आहात काय ?

यानंतर श्री.सरफरे...

अशुद्धित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/ 11:30

ता.प्र.क्र. 22280...

श्री. विक्रम काळे...

हे पाणी पाझरु नये याकरिता नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन उजवा आणि डावा अशा दोन्ही कालव्यांची पाहणी करुन त्यांचे कॉंक्रिटीकरण करणार काय, तसेच हे काम किती दिवसात पूर्ण करणार आहात?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, चतुर्थ प्रशासकीय मान्यता मिळवून 83 कोटी रुपयांची कामे प्रस्तावित केली आहेत. माननीय सदस्यांनी सूचित केल्याप्रमाणे यामध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन हे काम चांगल्या प्रकारे करण्यासाठी निश्चितपणे उपाय योजना केली जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी अतिशय विस्ताराने व चांगले उत्तर दिले आहे. माझा आक्षेप या ठिकाणी असा आहे की, माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी प्रश्न विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देण्याच्या बाबतीत अधिकाऱ्यांची उदासीनता दिसून येते. पहिल्या प्रश्नाचे उत्तर "हे खरे नाही" असे असतांना मंत्री महोदयांनी मात्र सविस्तर उत्तर दिले आहे . त्यानंतर क्रमांक 2, 3 व 4 या प्रश्नांना "प्रश्न उद्‌भवत नाही" असे उत्तर दिले आहे, आपल्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारची उत्तरे देऊ नयेत. आम्ही या ठिकाणी दोन-तीन महिने अगोदर प्रश्न दिल्यानंतर त्यावर कशाप्रकारची प्रक्रिया होते याचे खरे खुरे रिफ्लेक्शन छापील उत्तराच्या स्वरुपात सभागृहामध्ये यावे अशी आमची इच्छा आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी "गेवराई तालुक्यातून जाणाऱ्या उजव्या कालव्याची दुर्दशा झाल्याचे माहे ऑगस्ट, 2011 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय" असा पहिला प्रश्न विचारला होता. त्या अनुषंगाने उत्तर देण्यात आले आहे. मी मघाशी कबूल केल्याप्रमाणे सन 2005 पासून या कालव्याची दुरुस्ती करण्याच्या दृष्टीने मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत व अन्य प्रकारे निधी उपलब्ध करुन कालव्याची दुरुस्ती केली. हा कालवा नादुरुस्त झाला आहे त्याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. फक्त या ठिकाणी प्रश्न क्रमांक 1 मध्ये "माहे ऑगस्ट, 2011 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आले हे खरे आहे काय" असे विचारलेल्या प्रश्नाला अनुसरुन तसे उत्तर देण्यात आले आहे. मी यामध्ये तांत्रिक अडचण सांगितलीआहे. या ठिकाणी आपण व्यक्त केलेल्या भावनांशी मी सहमत आहे. यामुळे मी सविस्तरपणे या प्रश्नाचे उत्तर सभागृहापुढे ठेवले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ ST/ 11:30

ता.प्र.क्र. 22280...

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी उत्तर देतांना सांगितले की, उजव्या कालव्याची दुर्दशा झाल्याचे माहे ऑगस्ट 2011 च्या शेवटच्या सप्ताहात उघडकीस आलेले नाही तर खूप अगोदर उघडकीस आले असण्याची शक्यता आहे. सन 2005 सालापासून या कामासाठी निधीची उपलब्धता केली जात आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, धरणे आणि कालवे हे सिंचनाच्या दृष्टीने दोन्ही एकमेकांना पूरक संलग्न असलेल्या गोष्टी आहेत. त्यांच्या दुरुस्तीसाठी आपण एवढा पैसा खर्च करतो त्यावेळी आपल्या इंजिनिअर्सना आपण काही उद्दिष्ट ठरवून देता काय? गेल्या वर्षी त्या धरणाची क्षमता इतकी होती आणि या वर्षी अमुक इतका खर्च झाल्यानंतर त्याची क्षमता वाढली पाहिजे. अशाप्रकारे आयडीयल स्टेजला येण्यासाठी जे काही तंत्रज्ञान वापरले गेले पाहिजे त्याचे प्रयोग आपणामार्फत सुरु आहेत काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विस्तृत स्वरुपामध्ये प्रश्न विचारला आहे. गेल्या वर्षी माननीय मुख्यमंत्र्यांनी आमच्या विभागाला नियतव्यय उपलब्ध करुन दिला. त्यामुळे दरवर्षी किमान 2 लाख हेक्टर सिंचनाच्या लाभक्षेत्रामध्ये वाढ करण्याचे उद्दिष्ट आमच्या विभागाने ठरविले आहे. माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी प्रश्न विचारला आहे त्यास अनुसरुन सांगू इच्छितो की, पूर्वी 40 ते 50 वर्षापूर्वी झालेली धरणे आणि त्यावर झालेले कालवे हे गेल्या 40-50 वर्षात मोठया प्रमाणात नादुरुस्त झाले आहेत. या करिता ही कामे केवळ ठेकेदारामार्फत करण्याऐवजी विभागाच्या यांत्रिकीकरणामधून आणि मशिनरीचा वापर करुन केली तर त्या कामाचा दर्जा चांगला ठेवता येऊ शकतो आणि विशिष्ट वेळेत ती कामे करता येऊ शकतील या दृष्टीने आमचे प्रयत्न सुरु आहेत.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अमरावती जिल्ह्यातील मेळघाट येथील कुपोषण कमी करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करणेबाबत**

**(३) * २२७५२ डॉ.दीपक सावंत , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हयातील मेळघाट, चिखलदरा, या आदिवासी भागात सुमारे १४,५०० बालके कुपोषित असून सदर आदिवासी मागास भागामध्ये निरनिराळया विषयाचे तज्ज्ञ डॉक्टर्स नेमण्यासाठी वैद्यकीय संचालनालयाने माहे जुलै, २०११ मध्ये वर्तमान पत्रातून जाहिराती प्रसिध्द केल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जाहिरातींना प्रतिसाद किती प्रमाणात मिळाला आहे,

(३) असल्यास, सध्या तज्ज्ञ एमडी डॉक्टर्सना शासनाच्या रुग्णालयांमध्ये प्रतिमहा किती वेतन देण्यात येत आहे,

(४) असल्यास, मेळघाटसारख्या दुर्गम भागात विशेष तज्ञ डॉक्टरांना अधिक वेतन देण्याचाही निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, मेळघाट चिखलदरा आदि दुर्गम भागात एमडी स्पेशलिस्ट डॉक्टरांच्या नेमणुकीबाबत प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करुन तेथे तातडीने तज्ज्ञ डॉक्टर नेमण्यात आले अथवा येत आहेत काय?

**श्री.सुरेश शेट्टी** : (१) होय.

(२) जाहिरातीस अनुसरुन ४६ अर्ज प्राप्त झाले.

(३) सद्या तज्ञ एम.डी.डॉक्टर्सना शासनाच्या रुग्णालयामध्ये प्रतिमहा ४०,०००/- इतके वेतन देण्यात येत आहे.

(४) होय.

(५) ग्रामीण रुग्णालय चिखलदरा आणि ग्रामीण रुग्णालय, चुरणी येथे ९ विशेष तज्ञांच्या नेमणुका केलेल्या आहेत. त्यापैकी ४ विशेष तज्ञ रुजू झालेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आता आपण सभागृहामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्याची परिस्थिती पाहिली तशीच परिस्थिती मेळघाटमध्ये आहे. शासनाने प्रश्नाला छान उत्तर दिले आहे. दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "जाहिरातीस अनुसरुन ४६ अर्ज प्राप्त झाले". ग्रामीण रुग्णालय, चिखलदरा आणि चुरणी या ठिकाणी ९ विशेष तज्ज्ञांच्या नेमणुका केलेल्या आहेत

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २२७५२ ....

डॉ.दीपक सावंत...

त्यापैक्‍ी ४ विशेष तज्ज्ञ रुजू झालेले आहेत असे उत्तर दिले आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने मी शासनाला माहिती न देता थेट प्रश्न विचारतो की, मेळघाट तालुक्यामध्ये ३१३ गावांमध्ये ११ प्राथमिक आरोग्य केंद्र, २ ग्रामीण रुग्णालय, ६ आयुर्वेदीक दवाखाने आणि ४४ उपकेंद्र आहेत. यापैकी बाल रोग तज्ज्ञ आणि स्त्री रोग तज्ज्ञ असे किती डॉक्टर कामावर रुजू झाले आहेत, त्यांची नावानिशी माहिती मंत्री महोदय देतील काय? दुसऱ्या प्रश्नाला उत्तर देतांना म्हटले आहे की, " ४६ अर्ज प्राप्त झाले". त्यापैकी कितीत डॉक्टर्सवर रिकव्हरी आहे?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही. त्या बाबतची माहिती उपलब्ध करुन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये ४ विशेष तज्ज्ञ कामावर रुजू झाले असे म्हटले आहे. तर मग त्या ४ डॉक्टर्सची नावे सांगितली पाहिजेत. मंत्री महोदयांकडे ती नावे नसतील तर मी देऊ काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न या प्रश्नाशी संबंधित नाही, या योजनेसंबंधी विचारलेला नाही. या योजनेसंबंधी प्रश्न विचारला तर मी माहिती देण्यास तयार आहे.

डॉ.दीपक सावंत : शेवटच्या उत्तरामध्ये ४ विशेष तज्ज्ञ रुजू झाले आहेत असे आपण उत्तर दिले आहे. त्या विशेष तज्ज्ञांची नावे आपण सांगणार काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मेळघाटमध्ये आपण स्पेशल पॅकेज मार्फत योजना राबविणार आहोत त्यासंबंधीचा हा प्रश्न विचारला आहे. याकरिता दि. १०.६.२०११ मध्ये जाहिरात देण्यात आली होती.....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे शीर्षक असे आहे की, "अमरावती जिल्हयातील मेळघाट येथील कुपोषण कमी करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक करणेबाबत" असा प्रश्न विचारला असतांना नेमणूक केलेल्या डॉक्टर्सची नावे आपणाकडे कां नाहीत?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय,डॉ. शुभांगी नाकडे, स्त्री रोग तज्ज्ञ, डॉ. बालमुकुंद मालवीय,डॉ. ज्ञानेश्वर घोडे, डॉ. विनोद निमोणकर असे ४ डॉक्टर्स आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २२७५२ .....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या विभागाच्या रजिस्टरवर नोंदविण्यात आलेली नावे माझ्याकडे आहेत मी ती वाचून दाखवितो. डॉ. शीतल पटेल या स्त्री रोग तज्ज्ञ असून त्यांनी सहा महिन्यापूर्वी एम.डी. ची डिग्री घेतली आहे. त्याचप्रमाणे डॉ. जावरकर हे बाल रोग तज्ज्ञ आहेत, हे धारणी येथील उप जिल्हा रुग्णालयामध्ये बसतात. म्हणून मी आपणास माहिती दिली की, ३१३ गावांमध्ये ११ पीएचसी, ४४ उपकेंद्रे या ठिकाणी आज एकही तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित नाही हे खरे आहे काय?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आदिवासी विभागामध्ये तज्ज्ञ डॉक्टर जात नाहीत म्हणून आम्ही नवीन योजना राबविण्याचे ठरविले आहे. यामध्ये त्यांना १ लाखाचे स्पेशल पॅकेज देऊन त्यांची त्या ठिकाणी नेमणूक करण्याचे काम केले जात आहे. अगोदर सांगितल्याप्रमाणे ४६ लोकांकडून अर्ज आल्यानंतर त्यापैकी ४ डॉक्टर रुजू झाले आहेत....

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना मी सांगू इच्छितो की, आपण ज्या प्रमाणे अचूक प्रश्न विचारण्याचा प्रयत्न करीत आहात त्या प्रमाणे मंत्री महोदय देखील अचूक उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, एक सदस्य म्हणून जर मी माहिती उपलब्ध करुन देऊ शकतो तर मंत्री महोदयांना ती माहिती कां उपलब्ध होऊ शकत नाही?

**सभापती** : नक्की होईल.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मी माननीय सदस्यांना डॉक्टर्सची नावे सांगितली आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी नावे सांगितलेले डॉक्टर कामावर रुजू झाले नाहीत.

**सभापती** : मंत्री महोदयांनी उत्तरामधील तफावत तपासून त्याप्रमाणे माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवावी.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, होय.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा शेवटचा प्रश्न असा आहे की, मेळघाटचे कुपोषण कमी करण्यासाठी २ उप जिल्हा रुग्णालय, चिखलदरा आणि धारणी येथे सुरु केले.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २२७५२ .....

डॉ. दीपक सावंत....

त्याचप्रमाणे या अति संवेदनशील भागामध्ये आठवडयातून एकदा बाल रोग तज्ज्ञ आणि स्त्री रोग तज्ज्ञ जातील अशाप्रकारची व्यवस्था आपण किती दिवसात करणार आहात?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मानव विकास मिशनमार्फत आपण ही योजना राबवीत आहोत.त्या करिता आपण २४ कँप उघडले आहेत....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये हरकतीचा मुद्दा उपस्थित करता येत नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मला आपले संरक्षण हवे आहे. काल या सभागृहामध्ये माननीय राज्यमंत्र्यांना ताकीद देण्यात आली होती. तरी सुध्दा मंत्रीमहोदय अभ्यास न करता अशाप्रकारची उत्तरे देत आहेत. आता या ठिकाणी पाल्हाळ लावले जात आहे, परंतु प्रत्यक्षात उत्तर दिले जात नाही अशी मंत्री महोदयांची नवीन पध्दत सुरु झाली आहे हे योग्य नाही....

**सभापती** : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आपण हरकतीचा मुद्दा उपस्थित करु नये अशी मी आपणास सूचना करतो.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ ST/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:40

ता.प्र.क्र.22752 . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ठीक आहे.पण याठिकाणी माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत आणि जी यादी सांगत आहेत ती बरोबर नाही.याठिकाणी वेगळी पध्दत निर्माण होत आहे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आपण मेळघाटमध्ये 3 कार्यक्रम राबवितो. एकतर तेथील रुग्णालयांमध्ये हेल्थ सर्व्हीस देत आहोत आणि ते बळकट करण्यासाठी नवीन स्पेशालिस्ट नेमण्यासाठी आपण योजना जाहीर केली असून, त्यामध्ये त्यांना 1 लाख रुपयापर्यंत पगार देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सध्या आपण स्पेशालिस्ट डॉक्टरांना 35 हजार रुपये पगार देतो. परंतु मेळघाटच्या बाबतीत सांगावयाचे तर त्याठिकाणी संबंधितांना 1 लाख रुपये पगार, मोबाईल, घर आणि एक अटेंन्डन्ट देण्याची योजनाही सुरु केलेली आहे. दुसरे म्हणजे आपण मेळघाटमध्ये मानव विकास मिशन अंतर्गत कार्यक्रम करीत असतो. तेथे आपण नोव्हेंबर महिन्यापर्यंत 24 कॅम्प पूर्ण केले आहेत. फेब्रुवारीमध्ये 41 कॅम्प घेण्यात आले असून त्यामध्येही गायनाकॉलॉजिस्ट आणि पेडिॲस्ट्रीशन यांनाही घेतले होते.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर मिळत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ......

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक प्रश्न विचारला तर मी त्याला स्पेसिफीक उत्तर देईन.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्हाला माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर मिळत नाही, याच्या निषेधार्थ आम्ही सभात्याग करतो.

(शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

----

. . . .ई-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे येथील सौर अभ्यासिका आणि दीपस्तंभासाठी निकृष्ट दर्जाचे सौरदिवे पुरविणाऱ्या कंपन्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचा घेतलेला निर्णय**

(4) * 22450 श्री.मोहन जोशी, प्रा.सुरेश नवले,श्री.सुभाष चव्हाण , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे : सन्माननीय ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे येथील सौर अभ्यासिका आणि दीपस्तंभासाठी निकृष्ट दर्जाचे सौरदिवे पुरविणाऱ्या कंपन्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या कृषी आणि पशुसंवर्धन समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याचे दिनांक 2 ऑक्टोबर, 2011 रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर कंपनीवर गुन्हे दाखल करुन चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक** : (1) होय,

जिल्हा परिषद पुणे यांच्या अहवालानुसार हे खरे आहे.

(2) सदरची योजना ही महाऊर्जाचे 90 टक्के अनुदान व 10 टक्के ग्रामपंचायत हिस्सा याप्रमाणे महाऊर्जा व जिल्हा परिषद पुणे यांचेमार्फत राबविण्यात आली आहे. महाऊर्जाच्या दर करारातील अटी व शर्तीनुसार 5 वर्षापर्यंत देखभाल व दुरुस्ती ही संबंधीत पुरवठादाराने करणे बंधनकारक असल्यामुळे महाऊर्जा व जिल्हा परिषद पुणे यांच्यामार्फत संयुक्त पथकाद्वारे भोर तालुक्यातील सौर अभ्यासिकेची चौकशी करण्यात आलेली आहे.

(3) व (4) महाऊर्जा, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांच्या समितीमार्फत भोर तालुक्यातील सौर अभ्यासिकांची तपासणी दि.12 व 13 सप्टेंबर, 2011 दरम्यान करण्यात आली. सदर समितीच्या तपासणीमध्ये ढगाळ वातावरणामुळे संयंत्रे कमी कार्यक्षमतेने कार्यरत असल्याचे आढळले व काही सौर अभ्यासिका ग्रामस्थांच्या अयोग्य वापरामुळे नादुरुस्त असल्याचे दिसून आले. तसेच सौर अभ्यासिका संयंत्राचे चार्ज कंट्रोलर व पी.सी.बी. (इलेक्ट्रॉनिक्स) मध्ये किरकोळ तांत्रिक दोष असल्याचे निदर्शनास आले. सदर बाबींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने महाऊर्जाकडील दरकरारातील अटी व शर्तीनुसार दुरुस्तीबाबत संबंधित उत्पादकांना लेखी कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित उत्पादकांनी माहे सप्टेंबर व ऑक्टोबर, 2011 मध्ये दुरुस्तीचे काम पूर्ण केले असून सद्य:स्थितीत जिल्ह्यातील सर्व सौर अभ्यासिका कार्यान्वित असल्यामुळे संबंधित कंपनीवर कारवाई करण्यात आलेली नाही.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे. याठिकाणी प्रश्नांची जी उत्तरे देण्यात आलेली आहे, ती आपण वाचावी.कारण यामध्ये अत्यंत चुकीची उत्तरे देण्यात आलेली आहेत. याठिकाणी प्रश्न 2 मध्ये असे म्हटलेले आहे की, "असल्यास, सदर कंपनीवर गुन्हे दाखल करुन चौकशी करण्यात आली आहे काय ? परंतु याबाबत माननीय मंत्री महोदयांनी अतिशय गोलमाल व संदिग्ध उत्तर दिलेले आहे. तसेच "सौरदिवे पुरविणाऱ्या कंपन्यांवर फौजदारी गुन्हे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दाखल केले किंवा कसे? याबाबत माननीय मंत्री महोदयांनी मौन बाळगले असून अर्थात नरो वा वा कुंजरो वा अशी भूमिका घेतलेली आहे. लोड शेडींगच्या काळामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सौर अभ्यासिका पुरविणाऱ्या कंपन्यांनी निकृष्ट सौर दिवे पुरविले असून करारातील अटी व शर्तीनुसार त्याची देखभाल व दुरुस्ती देखील केलेली नाही. यामुळे तेथील विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम झालेला आहे.मात्र प्रश्न क्र.3 व 4 बाबत जे उत्तर दिले आहे,ते वाचल्यानंतर असे म्हणावे लागेल की,संबंधितांना वाचविण्यासाठी विभागाने सप्टेबर महिन्याच्या शेवटी केलेल्या समितीच्या तपासामध्ये ढगाळ वातावरणामुळे संयंत्रे कमी कार्यक्षमतेने कार्यरत असल्याचे आढळले व ग्रामस्थांच्या अयोग्य वापरामुळे हे सौरदिवे नादुरस्त झाल्याचे खापर फोडलेले आहे.याबाबतीत माझ ा स्पेसिफीक प्रश्न आहे की,ज्या कंपन्यांनी हे दिवे पुरविले होते,त्यांची नावे काय आहेत, त्यांना कधी ऑर्डर देण्यात आली होती,तसेच त्यानंतर किती दिवस हे दिवे सुरु होते, या कंपन्यांच्या बाबतीत महाऊर्जा विभागाकडून अहवाल मागविला आहे काय, तसेच माझा शेवटचा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, सदर सौर कंपन्यांच्या विरोधात त्वरित फौजदारी कारवाई करुन गुन्हे दाखल करणार आहात काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशीसाहेबांनी येथे प्रश्न उपस्थित केला की, या कंपन्यांना पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यामध्ये सौर अभ्यासिका स्थापन करण्यासाठी कधी आदेश देण्यात आले ? मी याबाबत सांगू इच्छितो की, याबाबत संबंधितांना 20 जानेवारी 2010 मध्ये आदेश निर्गमित करण्यात आले. तसेच सन्माननीय सदस्यांनी असाही प्रश्न विचारला की, सदरहू काम कोणत्या कंपन्यांना दिलेले आहे, याबाबत सांगावयाचे तर यामध्ये ऊर्जा फिचर्स सिस्टीम पुणे, तसेच न्युटेक्स सोलर सिस्टीम बंगलोर, स्काय लाईन सर्व्हीसेस औरंगाबाद, फोटोपिया ऑटोमेशन ॲण्ड कंट्रोल प्रायव्हेट लिमिटेड, सातारा आणि सेव्ह मॅक्स सोलर सिस्टीम,प्रा.लिमिटेड, पुणे अशी या कंपन्यांची नावे आहेत. याठिकाणी माननीय सदस्य श्री.मोहन जोशी साहेबांनी निश्चितपणे एक बाब सांगितली की, ज्याठिकाणी लोड शेडींग आहे, ज्याठिकाणी पारंपारिक ऊर्जा नेणे कठीण आहे,अशा भागामध्ये अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांकरता ग्राम पंचायतीचे कार्यालय, ग्राममंदिर, शाळा आणि समाजमंदिर अशा ठिकाणी ते दिवे बसवून तेथील विद्यार्थ्यांची सोय केली जाते.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक . . . .

याठिकाणी असेही सांगण्यात आले की, माननीय मंत्री महोदयांनी चुकीचे उत्तर दिलेले आहे.बाब अशी आहे की,साधारणपणे सप्टेंबर महिन्यामध्ये वातावरण ढगाळ असल्यामुळे त्या ठिकाणी अपेक्षित असलेला उजेड मिळू शकला नाही ही गोष्ट खरी आहे. त्याचबरोबर काही ठिकाणी ही यंत्रणा चुकीच्या पध्दतीने हाताळण्यात आली आणि काही ठिकाणी यंत्रणेमध्ये चूक झाली होती,फॉल्ट होता.म्हणून या सर्व गोष्टीची पहाणी करण्याकरता महाऊर्जा, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांचा गट निर्माण करण्यात आला आणि त्यांनी त्याबाबतीत पहाणी केल्या नंतर त्यातील चुका दुरुस्त करण्यात आल्या आणि पुढील पाच वर्षे यावर देखरेख करणे आणि दुरुस्ती करणे या कंपन्यांवर बंधनकारक आहे आणि आजच्या स्थितीमध्ये या सर्वच अभ्यासिका योग्य पध्दतीने कार्यान्वित असल्यामुळे त्या कंपन्यांवर कारवाई करण्याची गरज भासली नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नामध्ये असा उल्लेख केला आहे की,"पुणे येथील सौर अभ्यासिका आणि दीपस्तंभासाठी निकृष्ट दर्जाचे सौरदिवे पुरविणाऱ्या कंपन्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्याचा निर्णय जिल्हा परिषदेच्या कृषी व पशुसंवर्धन समितीच्या बैठकीत घेण्यात आल्याचे दिनांक 2 ऑक्टोबर 2011 रोजी निदर्शनास आले, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी "होय" असे उत्तर दिलेले आहे. म्हणजे माननीय मंत्री महोदयांनी हे मान्य केले आहे की, त्याची क्वॉलिटी बरोबर नव्हती आणि याठिकाणी निकृष्ट दर्जाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच आपण फिलिप्स् कंपनीचा माल दिल्ली येथे घेतला आहे. फिलिप्स् कंपनीच्या नावाने 2 हजार रुपयांचा माल घेतला. पण तो 500 रुपयांच्या क्वॉलिटीचा माल होता आणि त्यानंतर ते दिवे रिपेअर करुन घेतले म्हणजे तो अजूनही निकृष्ट दर्जाचा माल झाला. त्यामुळे रिपेअरींग करुन घेतले म्हणून संबंधितांवर कारवाई करावयाची नाही काय ? आपण निकृष्ट दर्जाचा माल घेतला आहे हे कबूल केले जात असेल तर याबाबत कारवाई का केली नाही आणि संबंधितांवर फौजदारी गुन्हा का दाखल करण्यात आला नाही ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, मी याठिकाणी निकृष्ट दर्जाच्या बाबतीत कुठेही उल्लेख केलेला नाही, असे कबूलच केलेले नाही.



ता.प्र.क्र.22450 . . . .

श्री.गणेश नाईक . . . .

श्री.जैनुद्दीन जव्हरी : सभापती महोदय, आपण म्हटलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, नाही. त्या घटकांनी त्याठिकाणी जो पुरवठा केला, तेथे ज्या चुका होत्या किंवा नादुरुस्त झाले होते. ते दुरुस्त करण्याचे त्यांच्यावर बंधनकारक आहे. तसेच अभ्यास गटाने पहाणी केल्यानंतर त्यांना ज्या-ज्या गोष्टी चुकीच्या वाटल्या, त्या संबंधितांना दुरुस्त करण्याबाबत सांगण्यात आले. त्यानुसार आजच्या क्षणाला भोर तालुक्यातील सर्व अभ्यासिका जशा प्रकारचा अपेक्षित रिझल्ट मिळावयास पाहिजेत, त्या पध्दतीने सुरु असल्याबाबतची माहिती मी आपल्यामार्फत सभागृहाला देऊ इच्छितो.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, मुळामध्ये हे दिवे अतिशय निकृष्ट दर्जाचे होते. ग्राम पंचायतीने ठराव केला की, सध्या वातावरण ढगाळलेले असले तरी हे दिवेही ढगाळलेले आहेत आणि या दिव्यांची अवस्था ट्युबसारखी आहे म्हणजे हे दिवे उघड-झाप करतात, चालत नाहीत, त्या मुळे बरोबर दिसत नाही.पुरेसा प्रकाश नाही.अशा स्थितीमध्ये ज्या कंपनीने या दिव्यांचा येथे पुरवठा केला आहे, त्यांच्यावर खरेतर कारवाई करण्याची आवश्यकता आहे. माननीय मंत्री महोदय, हे निकृष्ट व उघड-झाप करणारे दिवे आहेत. तेव्हा या कंपनीने काय दिवे लावले आहेत, काय दिवे पाजळले आहेत याबाबत आपण नव्याने चौकशी करणार आहात काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी उघड झ ाप करणाऱ्या दिव्यांच्या बाबतीत सांगितले, ती बाब माझ्या लक्षातच आली नाही. तसेच दिवे पाजळले की लावले हे देखील मला समजले नाही. याठिकाणी एवढीच बाब आहे की, ज्या कंपन्यांनी ही यंत्रणा बसविली होती, त्यामध्ये ज्या नादुरुस्त्या होत्या त्या सर्व बाबी अधिकाऱ्यांनी स्वत:च्या नियंत्रणाखाली पडताळून पाहून त्या दुरुस्त केलेल्या आहेत आणि सदरहू यंत्रणा आजही कार्यान्वित आहे एवढीच माझी माहिती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सदरहू दिवे घेताना जे टेंडर मागविण्यात आले होते, त्याप्रमाणे ज्या पध्दतीची क्वॉलिटी पाहिजे, त्या पध्दतीची क्वॉलिटी नसताना ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी या दिव्यांची डिलीव्हरी घेतली आहे, त्याच्यावर शासन कारवाई करणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्या प्रमाणे त्याठिकाणी निकृष्ट दर्जाची यंत्रणा बसविलेलीच नव्हती. ही यंत्रणा उत्कृष्टच ...



ता.प्र.क्र.22450 . . . .

श्री.गणेश नाईक . . . .

होती. काही ठिकाणी ढगाळ वातावरणामुळे रिझल्ट मिळाला नाही. काही ठिकाणी ग्रामस्थांना सदरहू दिवे वापरण्याची पध्दत न समजल्यामुळे तसे घडले आहे आणि काही ठिकाणी फॉल्ट होता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मात्र तो दुरुस्त करण्यात आलेला आहे. तसेच हा माल दर्जेदार असल्यामुळे याबाबत कारवाई करण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय से सिर्फ दो ही प्रश्न मैं पूछना चाहता हूं . मेरा कहना है कि रिन्यूएबल एनर्जी के लिए केंद्र सरकार बहुत सारी सब्सिडी देती है. हमारी जानकारी ऐसी है कि सोलर लेंप या सोलर हीटर बहुत सारी कंपनियां बना रही हैं. जो कंपनियां बहुत ज्यादा माल सप्लाई नहीं करतीं, वे कंपनियां भी सेंट्रल गवर्नमेंट से सब्सिडी लेती हैं.

इसलिए हमारा पहला प्रश्न यह है कि मेन्युफेक्चर्रस द्वारा बनाए जाने वाले सोलर लेंप, सोलर हीटर या अन्य उपकरणों की क्वालिटी टेस्टिंग के लिए क्या आपके विभाग में कोई हाई पावर कमेटी है, जो उन उपकरणों की क्वालिटी सर्टिफाय कर सके ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि हमारे राज्य में सौर उर्जा का प्रचार इसलिए भी नहीं हो पा रहा है, क्योंकि हमारी राज्य सरकार उनको सब्सिडी नहीं देती है. बहुत सारे राज्यों में केंद्र सरकार के साथ-साथ वहां की राज्य सरकारें भी इस काम के लिए सब्सिडी देती हैं इसलिए मेरा प्रश्न सरकार से यह भी है कि सौर उर्जा का प्रसार बढ़ाने के लिए क्या हमारी राज्य सरकार उन कंपनियों को कोई स्पेशल इन्सेंटिव देने का विचार कर सकती है?

यानंतर कु.थोरात . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22450..

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जमा यांनी सांगितल्याप्रमाणे या ठिकाणी जी यंत्रणा पुरविण्यात आलेली आहे ती आयएसआय स्टॅण्डर्डमध्ये नॉमिनेट झालेल्या कंपन्यांकडूनच घेण्यात येते. ही गोष्ट खरी आहे की, केंद्र सरकारचे या सौरऊर्जा, पवन ऊर्जासाठी फार मोठे बॅकअप आहे. महाऊर्जामार्फत हे दिवे बसविण्याकरिता 90 टक्के अनुदान दिलेले आहे. त्या ग्रामपंचायतीच्या आणि जिल्हा परिषदेच्या नियंत्रणाखाली हे दिवे बसविण्यात आले आहेत कारण त्यांची यामध्ये 10 टक्के गुंतवणूक असते. सन्माननीय सदस्य श्री. जमा यांनी सांगितल्याप्रमाणे राज्य सरकार अपारंपरिक ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर व्हावा यासाठी अतिशय प्रयत्नशील आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, कोटयवधी रुपयांचा हा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी स्वत: या सभागृहात असे सांगितलेले आहे की, जानेवारी, 2010 मध्ये हे काम देण्यात आले आहे. सप्टेंबर, 2011 मध्ये पुणे जिल्हा परिषदेच्या कृषी समितीने एक मताने ठराव केला. त्या भागातील दिवे 18 महिने चालत नव्हते आणि या ठिकाणी सांगण्यात येत आहे की, सप्टेंबर महिन्यात हवामान ढगाळ होते. सभापती महोदय, कोटयवधी रुपयांचा हा प्रश्न आहे. या कंपनीवर फौजदारी कारवाई करण्यात यावी असा जिल्हा परिषदेने एक मताने ठराव केलेला आहे असे असताना त्या कंपनीला पाठीशी का घातले जात आहे. जिल्हा परिषदेने केलेल्या ठरावाची अंमलबजावणी शासन करणार काय आणि संबंधितावर फौजदारी गुन्हा दखल करणार काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे कृषी समितीच्या समितीने ठराव केला होता ही गोष्ट खरी आहे. मी थोडयावेळा पूर्वी सांगितल्याप्रमाणे त्या कालखंडामध्ये ढगाळ वातावरण, हाताळणीचे ज्ञान नसणे आणि काही ठिकाणी फिटिंग करताना लूज कॉन्टॅक्ट यामुळे त्या यंत्रणा काही कालखंड निश्चितपणे कार्यान्वित नव्हत्या. परंतु ही बाब निदर्शनास आणल्यानंतर मेडाचे अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी आणि या कंपनीच्या लोकांना बरोबर घेऊन, सर्व्हेक्षण केल्यानंतर ती यंत्रणा अतिशय योग्य पध्दतीने कार्यान्वित झालेली आहे त्यामुळे या कंपनीवर कारवाई करण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदय, जिल्हा परिषद ही स्थानिक महत्वाची संस्था आहे. ती कायदेशीररित्या ग्रामीण भागामध्ये काम करते. या जिल्हा परिषदेच्या संस्थेने जर अशा पध्दतीने गांभीर्याने ठराव केला असेल तर त्याची उकल होण्याच्या दृष्टीने यामध्ये आपण लक्ष देण्याची गरज आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना जमत नसेल तर आम्ही सन्माननीय पालक मंत्र्यांना सांगू म्हणजे हे काम लवकर होईल.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, आपण केलेली सूचना निश्चितपणे योग्य आहे. कारण जिल्हा परिषदेच्या शेतकी समितीने निर्णय घेतल्यानंतर त्या ठिकाणी मेडाचे अधिकारी, जिल्हा परिषदेचे अधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी आणि ज्या घटकांनी ही यंत्रणा बसविलेली आहे त्यांना एकत्रित नेऊन असलेल्या त्रुटी दूर करण्यात आलेल्या आहेत त्यामुळे आज त्या ठिकाणी चांगले रिझल्ट आलेले आहेत. भविष्य काळात अशा प्रकारे विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही, लोकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले जातील.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व जिल्हा शासकीय रुग्णालय नाशिक येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत**

**(5) * 22177 श्री.जयवंतराव जाधव , श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.अनिल भोसले** : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विभागीय संदर्भ सेवा रूग्णालय व जिल्हा शासकीय रूग्णालय नाशिक येथे वैद्यकीय महाविद्यालय (पी.जी.इन्स्टिटयुट) सुरू करण्याबाबत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांनी माहे एप्रिल, 2010 मध्ये शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(2) तसेच उक्त ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालय सुरू करण्याची जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मागणी आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, प्रश्न भाग 1 व 2 बाबत शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार नाशिक येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरू करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.विजयकुमार गावित** : (1) हे खरे आहे.

(2) हे खरे आहे.

(3) विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय व जिल्हा शासकीय रुग्णालय नाशिक येथे वैद्यकीय महाविद्यालय (पी.जी.इन्स्टिट्युट) सुरु करण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

सध्या नाशिक येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाचा प्रस्ताव नाही. तथापि खाजगी संस्था/ट्रस्ट यांच्याकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास व संबंधित शिखर संस्थाचे निकष संस्था पूर्ण करत असेल तर शासन आवश्यकता निर्गमित करेल.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक हा महसुली विभाग असून नाशिकच्या आजूबाजूला जळगाव, धुळे व औरंगाबाद हे जिल्हे आहेत या दृष्टिकोनातून नाशिक जिल्हयामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलची निर्मिती करण्यात आली होती. आज त्या ठिकाणी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल असून सुध्दा कॅन्सर विभागात भौतिक शास्त्रवेत्ता व किरणोत्सार तज्ज्ञ उपलब्ध नसल्याने 6 कोटी रुपये किंमतीचे मशीन गेल्या दोन-तीन वर्षापासून बंद आहे, हे खरे आहे का? अतिविशिष्ट दर्जाच्या त्या रुग्णालयात 45 अधिकारी आहेत पण त्यापैकी 25 पदे रिक्त आहेत हे खरे आहे का?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जाधव यांनी अचूक प्रश्न विचारणे गरजेचे आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22177

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, सदर प्रश्न आरोग्य विभाग आणि वैद्यकीय शिक्षण या दोन्हीशी संबंधित आहे. या रुग्णालयात आज कुठल्याही प्रकारचे तज्ज्ञ उपलब्ध नसल्यामुळे या ठिकाणी शासनाच्या वतीने वैद्यकीय महाविद्यालय सुरु होणे अतिशय गरजेचे आहे. या ठिकाणी डीएमईआरचे आवश्यक असलेले प्रमाणपत्र देऊ केलेले आहे त्यासंबंधीची आरोग्य विज्ञान विद्यापीठाने मागणी करुन दीड वर्ष उलटून गेलेले आहे परंतु ते आजपर्यंत का देण्यात आले नाही?

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. जाधव हे नवीन असल्यामुळे तयार होत आहेत. या सभागृहात अचूक उत्तरे मिळवण्यासाठी प्रत्येक सन्माननीय सदस्याने अगोदर प्रस्तावना करावी आणि पाच-सहा मिनिटे झाल्यानंतर प्रश्नाला सुरुवात करावी असे केले तर प्रश्नोत्तराच्या तासात केवळ एक किंवा दोनच प्रश्न चर्चेला येतील. पहिला प्रश्न आरोग्य विभागाचा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे त्या प्रश्नाला 21 मिनिटांचा वेळ देण्यात आलेला आहे.

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी माझ्या वक्तव्यात सुधारणा करतो आणि एकच प्रश्न विचारतो. आरोग्य विद्यापीठ ही संपूर्ण वैद्यकीय महाविद्यालयाची शिखर संस्था आहे, ती नाशिकमध्ये आहे. त्यामुळे तेथे उपलब्ध असलेल्या रुग्णालयाचा वापर करुन वैद्यकीय महाविद्यालय पी.जी.इन्स्टिटयुट तेथे चालू करण्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत असताना शासन आज पर्यंत या संस्थेला महाविद्यालय सुरु करण्याकरिता अनुमती का देऊ शकले नाही?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने एप्रिल, 2010 मध्ये एक प्रस्ताव तयार केला आणि दुसऱ्या विद्यापीठामध्ये ज्या पध्दतीने त्यांची स्वत:ची कॉलेजेस आहेत तशा पध्दतीने सुपर स्पेशालिटी कॉलेज सुरु करण्याच्या दृष्टीने मंत्रालयाकडे प्रस्ताव पाठविला होता. तो प्रस्ताव पाठवित असताना त्यांनी नाशिक येथील सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल जे आरोग्य विभागाकडे आहे तेथे ही मागणी केली होती. त्या उद्देशाने शासनाने आरोग्य विभागाची एक बैठक घेतली होती. त्या बैठकीच्या अनुषंगाने तपासून आपल्याला कळविण्यात येईल असे सांगण्यात आले होते. त्यानंतर जवळ जवळ एका वर्षाचा कालावधी गेला. त्या एका वर्षाच्या

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.22177..

डॉ. विजयकुमार गावित..

कालावधीमध्ये तिकडून उत्तर आले नाही. म्हणून मी स्वत: कुलगुरु आणि रजिस्ट्रार यांच्याबरोबर नाशिक येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात पी.जी.इन्स्टिटयुट सुरु करण्याच्या बाबतीत चर्चा केलेली आहे. त्यानंतर महानगरपालिकेच्या रुग्णालयाबरोबर एमओयु करुन त्या ठिकाणी पी.जी. इन्स्टिटयुट सुरु करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानंतर त्यांनी एप्रिल 2011 मध्ये 11 विषयांचा प्रस्ताव मंत्रालयात पाठविला होता. त्या 11 विषयाला शासनाने इसेन्शलिटी सर्टिफिकेट द्यावयाचे असते ते शासनाने दिलेले आहे. आता मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाकडे या 11 विषयापैकी 8 विषय मंजुरीसाठी पाठविण्यात आलेले आहेत. अशा पध्दतीने नाशिक येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयाबरोबर एमओयु करुन महासभेनेसुध्दा त्याला मंजुरी दिलेली आहे. पुढील वर्षी त्या ठिकाणी हे कोर्सेस निश्चितपणे सुरु होतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे आहे. विभागाचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल नाशिक येथे आहे तसेच या विभागातील सगळयात मोठे जिल्हा शासकीय रुग्णालयही नाशिक येथे आहे. वैद्यकीय महाविद्यालय आणि पी.जी. इन्स्टिटयुट या दोन वेगळया गोष्टी आहेत. बेसिक एमबीबीएस ची पदवी देणारे महाविद्यालय आणि पोस्ट ग्रॅज्युएशनचा डिप्लोमा आणि डिग्री देणारी महाविद्यालये असा यातील फरक आहे. आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथे असताना आणि त्यांचे संकुल सक्षम असतांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिकमध्ये स्वत:चे पी. जी. इस्टिटयुट सुरु करण्याचा विचार करणार आहे का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, या बाबत निश्चितपणे अभ्यास करुन विचार केला होता पण त्यासाठी मोठे इन्फ्रास्टक्चर लागेल म्हणून सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलला विनंती केलेली आहे की, त्यांनी ती द्यावी जेणेकरुन ते सुरु करता येईल. अद्यापपर्यंत इन्फ्रास्ट्रक्चर न मिळाल्यामुळे महानगरपालिकेच्या दवाखान्यात ते सुरु करण्यात येत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 22177... डॉ. विजयकुमार गावित ...

पुढे त्या महानगरपालिकेच्या दवाखान्यामध्ये आपण बाकीचा जो टिचिंग स्टाफ नेमणार आहोत तो पुरेसा झाला तसेच काही इन्स्ट्रूमेंट्स लागतात ते पुरेसे झाले तर निश्चितपणे विद्यापीठ त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज सुरु करण्यासाठी परवानगी देईल.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, साधे मेडिकल कॉलेज उघडावयाचे असेल तर ते 500 खाटांचे उघडावे लागते. जगामध्ये ही पहिली इन्स्टिटट्यूट असेल की, ज्यांच्याकडे स्वत:चे रुग्णालय नाही. औरंगाबादच्या घाटी हॉस्पिटलला सुध्दा नाशिक, धुळे, जळगाव जिल्ह्याचे पैसे नेतात. सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी योग्य मुद्दा उपस्थित केला की, आरोग्य खात्याचे सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल करण्यापेक्षा आरोग्य विद्यापीठ स्वत:ची पी.जी. इन्स्टिटट्यूट लवकरात लवकर त्या ठिकाणी चालू करणार का ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर जात आहे. कोणत्याही विद्यापीठाला स्वत:चे हॉस्पिटल सुरु करण्यासाठी हॉस्पिटलचे इन्फ्रास्ट्रक्चर लागते आणि या एम.डी.,एम.एस.च्या सगळ्या सिट्सच्या बाबतीत ॲडमिशन घेण्यासाठी त्या ठिकाणी कॉट्स असतात, प्राध्यापक असतात, बाकीचा स्टाफ असतो आणि इन्फ्रास्ट्रक्चर असते. त्यामुळे कोणतेही विद्यापीठ स्वत:चे हॉस्पिटल सुरु करु शकत नाही, स्वत:चे सुपर स्पेशालिटी कॉलेज सुरु करु शकत नाही.

श्री. जयवंतराव जाधव : मी मागणी केलेली आहे..

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, विद्यापीठाचे काम वेगळे आहे. माननीय मंत्री महोदय हे प्रो. व्हाईस चान्सलर आहेत. त्यांनी याबाबत सांगावे.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या ठिकाणी प्रश्न उपस्थित केला. मी असे सांगितले की, महानगरपालिकेचा जो दवाखाना आहे तो परिपूर्ण झाल्यानंतर,त्या ठिकाणी सर्व पूर्तता झाल्यानंतर विद्यापीठाच्या वतीने त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज सुध्दा सुरु करण्याचा निश्चितपणे मनोदय आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी सांगितले की, त्या ठिकाणी हॉस्पिटलची गरज असते आणि हे सगळीकडे करणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थोडेसे अडचणीचे आहे. परंतु औरंगाबादमध्ये, पुण्यामध्ये आणि नागपूरमध्ये एम्स दर्जाचा दवाखाना उभा करुन त्या ठिकाणी पी.जी. कोर्सेस सुरु करण्याचा राज्य शासनाचा मनोदय आहे.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ ST/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोमवार, दिनांक 12 डिसेंबर, 2011 व मंगळवार, दिनांक 13 डिसेंबर, 2011 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : सोमवार, दिनांक 12 डिसेंबर, 2011 व मंगळवार, दिनांक 13 डिसेंबर, 2011 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या याद्या सभागृहासमोर ठेवण्यात आल्या आहेत.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात )

...4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ ST/

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी, विसावी, एकविसावी, बाविसावी, तेविसावी, चोविसावी, पंचविसावी, सव्विसावी, सत्ताविसावी, अठ्ठाविसावी, एकोणतिसावी, तिसावी व एकतिसावी यादी सभागृहासमोर ठेवीत आहे.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तरांची सोळावी, सतरावी, अठरावी, एकोणीसावी, विसावी, एकविसावी, बाविसावी, तेविसावी, चोविसावी, पंचविसावी, सव्विसावी, सत्ताविसावी, अठ्ठाविसावी, एकोणतिसावी, तिसावी व एकतिसावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात )

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील (गृह, ग्रामविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन 2008-2009 चे वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन 2007-2008 व 2008-2009 या वर्षाचे एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

---

डॉ. विजयकुमार गावित ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने, कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

...6...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

---

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवता.

**सभापती** : वार्षिक लेखे अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

-----

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन 2008-2009 या वर्षाचा वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचे वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : वार्षिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

----

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ ST/

**पृ.शी.**: दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची "मराठी भाषा समिती" गठीत करणे

**मु.शी.**: दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची "मराठी भाषा समिती" गठीत करण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव

प्रा. फौजिया खान ( सामान्य प्रशासन, राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषद नियम 158 (1) अन्वये खालील प्रस्ताव मांडते.

" राज्याच्या राजभाषा मराठीबाबतच्या धोरणानुसार राज्य शासकीय कार्यालये व राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील प्राधिकरणे, महामंडळे यांच्या कार्यालयीन कामकाजामध्ये मराठीच्या वापराबाबत तसेच, केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र शासनाच्या शासकीय / निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठीचा वापर काटेकोरपणे केला जातो किंवा कसे याबाबत, जिल्हाधिकारी यांच्याकडून मराठीच्या वापराबाबत पाहणी करण्यात येते किंवा कसे याची तपासणी करुन व सर्वंकष आढावा घेऊन याबाबत राज्य शासनास सूचना देणे व सुयोग्य अशा तद्नुषंगिक अन्य उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने आणि या विषयाची माहिती घेऊन त्यासंदर्भातील अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्याच्या दृष्टीने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांचा समावेश असलेली "मराठी भाषा समिती"या नावाची नियमित संयुक्त समिती गठीत करण्यात यावी.

सदर समितीमध्ये सदस्यांची एकूण संख्या 15 असावी. या समितीवर विधानसभेचे 11 सदस्य असतील व विधान परिषदेचे 4 सदस्य असतील.

समितीची कार्यकक्षा, कर्तव्ये व तद्संबंधी नियम ठरविण्याची बाब विधानमंडळाच्या नियम समितीकडे सुपूर्द करण्यात यावी."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. खंदारे ...

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी अशी सूचना आहे की, शासन आमदारांची समिती गठित करीत आहे. अधिकाऱ्यांनी मराठी भाषेला योग्य न्याय न दिल्यामुळे आमदारांची समिती गठित होत आहे. या समितीला मार्गदर्शन करण्यासाठी बाहेरचे तज्ज्ञ नेमावेत. शासनाने दोन तज्ज्ञांना निमंत्रित म्हणून नेमावे. ते जास्त चांगले होईल.

**सभापती** : नियम समितीसमोर हा प्रस्ताव जाईल त्यावेळी आपण सुचविलेल्या सूचनेवर जरुर विचार करण्यात येईल.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

----

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे

श्री.विनोद तावडे ( समिती सदस्य ) : : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा सन 2005-2006 या वर्षाचा महसुली जमा अहवालाच्या संदर्भातील सातवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**सभापती** : लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहाला सादर करण्यात आला आहे.

------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

**पृ.शी.**: 'मुंबई मिरर' मध्ये छापून आलेला बदनामीकारक मजकूर

**मु.शी.**: 'मुंबई मिरर' मध्ये छापून आलेला बदनामीकारक मजकूर या विषयाबाबत श्री.प्रकाश बिनसाळे यांनी 'मुंबई मिरर' या इंग्रजी दैनिकाच्या विरुध्द दिलेली विशेष हक्कभंगाची सूचना.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी 'मुंबई मिरर' मध्ये छापून आलेला बदनामीकारक मजकूर याबाबत 'मुंबई मिरर' या इंग्रजी दैनिकाच्या विरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना दिली आहे. सदस्यांना त्यावर आपले म्हणणे मांडावयाचे असल्यास थोडक्यात मांडावे.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, दिनांक 17 डिसेंबर, 2011 रोजीच्या 'मुंबई मिरर' या इंग्रजी दैनिकाच्या अंकामध्ये 'Oh la la...Vidya brings warring MLA's together' अशा मथळ्याखाली बातमी छापून आली होती.

दिनांक 15 डिसेंबर, 2011 रोजी काही आमदार नागपूरमधील मल्टीप्लेक्स चित्रपटगृहात 'डर्टी' चित्रपट बघण्यासाठी गेले होते. मी स्वत: आमच्या पक्षाच्या बैठकीला हजर होतो. ती बैठक संपवून माझ्या निवासस्थानी आलो होतो. माझ्या घरी काही चॅनल्सचे प्रतिनिधी माझा बाईट घेण्यासाठी उभे होते. मला त्यांनी प्रश्न विचारल्यावर मी त्यांना स्पष्टपणे सांगितल होते की, शेवटी आमदार, मंत्री जे कोणी लोकप्रतिनिधी आहेत ती सुध्दा माणसे आहेत. त्यांना सुध्दा विरंगुळा लागतो. त्यांना जो स्ट्रेस असतो तो कमी करण्यासाठी कोणी चित्रपट पाहतात, कोणी नाटक पाहतात, कोणी पुस्तके वाचतात, कोणी लिखाण करीत असतात. त्यामुळे या विषयावर फारसा वादंग करण्याचे कारण नाही. मुंबई मिररचे प्रतिनिधी श्री.राहुल यांनी मला असाच प्रश्न फोन करुन विचारल्यानंतर त्यांनाही मी हेच सांगितले होते. त्यांच्याकडेही मी एका राजकीय पक्षाचा प्रवक्ता म्हणून प्रतिक्रिया दिली होती. अशा प्रकारचीच प्रतिक्रिया दिली असताना दुसऱ्या

4...

श्री.प्रकाश बिनसाळे....

दिवशी दिनांक 17 रोजीच्या वृत्तपत्रामध्ये त्यांनी बातमी दिली. त्या बातमीमध्ये असे नमूद केले होते की, "We did nothing wrong by going for the Movie. The House was adjourned.." अर्थात मी स्वत: तो चित्रपट बधण्यासाठी गेलो नव्हतो. तरी देखील त्यांनी असे लिहिले आहे की, "..and we have every right to spend our free time the way we want to "Prakash Binsale said". अशा पध्दतीचे वाक्य माझ्या तोंडी टाकले आहे ते मी बोललो नव्हतो. पुढे त्यांनी असेही छापले आहे की, ".. But we are public figures, and the media would have gone to town saying we were watching an "A" rated movie. To avoid the controversy we decided to leave the multiplex right away." यातील एकाही वाक्याचा मी उच्चार केला नव्हता.

आमदार हा माणूस असल्यामुळे त्यांनाही त्यांचे स्वातंत्र्य आहे. स्ट्रेस कमी करण्यासाठी ते सुध्दा छंद जोपासत असतात. माझ्या नावानिशी ही बातमी आल्याचे माझ्या लक्षात आल्यानंतर मी या वृत्तपत्राच्या संपादकांना मोबाईलवरुन फोन केला होता. त्यावेळी त्यांनी मला तातडीने एक ई-मेल पाठविण्याची सूचना केली होती. मी रविवारी तातडीने ई-मेल पाठविला होता. त्यानंतर सोमवार, मंगळवार असे दोन दिवस झाल्यानंतरही मी जो खुलासा केला होता त्याबाबत कोणत्याही प्रकारची दिलगिरी व्यक्त करण्याचे सौजन्य या वृत्तपत्राने दाखविलेले नसल्यामुळे नाईलाजास्तव मला आज त्यांच्याविरुध्द विशेष हक्कभंगाची सूचना द्यावी लागत आहे. कृपया आपण ती स्वीकृत करावी.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी दिलेल्या विशेष हक्कभंगाच्या सूचनेच्या संदर्भात मी सर्व संबंधितांकडून खुलासे मागवून घेईन. यातील सर्व बाबी तपासून घेतल्यानंतर याबाबतचा मी निर्णय देईन.

-----

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज महाराष्ट्र राज्य वैद्यकीय शिक्षण संघटनेच्या वतीने राज्यातील सर्व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये संप सुरु आहे. सर्व वैद्यकीय शिक्षक साखळी उपोषणास बसले आहेत, संपावर गेलेले आहेत. या महाविद्यालयांना संलग्न असलेल्या रुग्णालयांमधील वैद्यकीय सेवा विस्कळीत झालेली आहे. त्यांच्या मागण्या मोठ्या नाहीत. माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांच्याकडे सुध्दा या मागण्या प्राप्त झालेल्या आहेत अशी माझी माहिती आहे. सहावा वेतन आयोग लागू करणे, कालबध्द पदोन्नती लागू करणे अशा प्रकारच्या मागण्या आहेत. या अॅकॅडमिक विषयाशी निगडित आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांनी या विषयात लक्ष घालून लवकरात लवकर हस्तक्षेप करुन हा संप निकाली काढावा व रुग्णांचे होणारे हाल टाळावेत. धन्यवाद.

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, वैद्यकीय प्राध्यापकांच्या संघटनेचे प्रतिनिधी मला भेटले आहेत. त्यांच्याबरोबर मी चर्चा केलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री यांच्याबरोबर दिनांक 22 तारखेला बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यामुळे हॉस्पिटलमधील रुग्ण सेवा विस्कळीत झाली आहे असे मला वाटत नाही. परंतु रुग्णांची निश्चितपणे घेतली जाईल. (अडथळा) त्यांनी संप पुकारला असला तरी ते सेवा देत आहेत. यापूर्वीही ते एक दिवस लाक्षणिक संपावर गेले असतानाही ड्यूटीवर काम केलेले आहे. ते आजही काम करीत आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, ते रुग्णांची काळजी घेत आहेत.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी यांनी "शीव (मुंबई) येथील विराज परमार या विद्यार्थ्याचा बस चालकामुळे झालेला मृत्यू, आरटीओ अधिकाऱ्यांनी स्कूल बस चालक मालक यांचेविरुध्द कारवाई सुरु केल्यामुळे बस चालक मालक असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दि.28.12.2011 रोजी पासून संपावर जाण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "भारताचे माजी अर्थमंत्री डॉ.सी.डी.देशमुख यांचे स्मारक रोहा (जि.रायगड) येथे उभारण्यासाठी मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार दि.28.8.2009 च्या शासन आदेशान्वये प्राप्त झालेल्या निधीचा वापर स्मारकासाठी न होता अन्य कारणासाठी खर्च केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील बांदा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, बांदा या संस्थेचे आर्थिक व्यवहार मे, 2008 पासून बंद असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर, चंद्रकांत पाटील यांनी "पेंढकरपाडा, मिरा रोड (पूर्व) येथील सर्वे नं.65 (नवीन), 232 (जुना) हा भूखंड सीआरझेड-2 या प्रभागात असून विकासकाने 16 मजली इमारतीचे केलेले अनधिकृत बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

7....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

**उप सभापती**.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "खेतवाडी, गिरगाव, मुंबई येथील मोती मॅन्शन व वीर भुवन या दोन्ही इमारतींच्या पुनर्विकासामध्ये झालेले गैरप्रकार व म्हाडाने दिलेले ना-हरकत प्रमाणपत्र" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. उर्वरित नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

------

8......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

**पृ. शी.** : राज्यात पत्रकारांवर वाढत असलेले हल्ले

**मु. शी.** : राज्यात पत्रकारांवर वाढत असलेले हल्ले याबाबत सर्वश्री धनंजय मुंडे, संजय केळकर, विनोद तावडे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा.फौजिया खान ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेले असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...9 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, राज्यातील पत्रकारांसंबंधी हा अत्यंत गंभीर विषय उपस्थित केलेला आहे. दिनांक 15 रोजी पत्रकारांनी मोठा मोर्चा काढला होता, धरणे आंदोलन केले होते. जे.डे.हत्याकांडानंतर हा विषय उफाळून आला आहे. एवढेच नाही तर 200 वेळा पत्रकारांवर हल्ले झालेले आहेत, परंतु महाराष्ट्रातील निरनिराळया पत्रकारांना हजारोंच्या संख्येने धमक्या देण्यात आल्या आहेत. वृत्तपत्र हा एक महत्वाचा स्तंभ आहे. या पत्रकारांमध्ये भयाची व असुरक्षिततेची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

पत्रकारांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले गेलेले आहे. पत्रकारांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या संदर्भात शासनाने सहा सदस्यांची समिती नेमली होती. त्या समितीच्या बैठका झाल्या आहेत. परंतु यासंदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारची निर्णायक भूमिका घेतलेली नाही. पत्रकारावर हल्ले होऊ नयेत म्हणून शासन कायदा करणार आहे, तो कायदा शासन किती दिवसात काढणार आहे ?

श्रीमती फौजिया खान : या प्रश्नाच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाची उप समिती गठीत झालेली आहे. त्यांनी त्यांच्या टर्मस् ॲन्ड रेफरन्सप्रमाणे सखोल अभ्यास केलेला आहे. इतरही तज्ज्ञ लोकांची मते या अनुषंगाने जाणून घेतलेली आहेत. या उप समितीने याबाबतचा सखोल अभ्यास करुन त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर ठेवलेला आहे. त्या प्रस्तावाच्या बाबतीत अंतिम निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात येणार आहे.

श्री.संजय केळकर : हा निर्णय कधीपर्यंत घेण्यात येणार आहे ?

श्रीमती फौजिया खान : लवकरात लवकर हा निर्णय घेण्यात येईल.

-------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन सन 1996 पासून रु.7225/- ही सुधारित वेतनश्रेणी देण्याचे मान्य करुनही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही न होणे.

**मु. शी.** : उच्च माध्यमिक शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर करुन सन 1996 पासून रु.7225/- ही सुधारित वेतनश्रेणी देण्याचे मान्य करुनही प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही न होणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, भगवान साळुंखे, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. फौजिया खान ( शालेय शिक्षण राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवते.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...3...



ABG/ KTG/ प्रथम श्री.खंदारे 12:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सन्माननीय सभापती महोदय, हा विषय सभागृहात जवळपास 28 ते 29 वेळा येऊन गेला आहे. नियम 93 अन्वये हा विषय मी पुन्हा सभागृहात उपस्थित करीत आहे. शासनाने यासंदर्भात उत्तर दिलेले आहे ते अतिशय गोलगोल स्वरुपाचे आहे. उच्च शिक्षकांचे दोन,चार महत्वाचे प्रश्न आहेत. ते मी या ठिकाणी उपस्थित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या निवेदनाच्या लेखी उत्तरात शासनाने असे म्हटले आहे की, प्रस्तावाची छाननी सुरु आहे, प्रस्ताव तपासण्यात येत आहे, प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने एक,दोन अथवा तीन महिन्यात निश्चितपणे निर्णय घेण्यात येईल अशा पध्दतीने माहिती शासनाने या ठिकाणी द्यावी. उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांच्या वेतनश्रेणीचा प्रश्न आहे. हा देखील प्रश्न अनेक वेळा या सभागृहात चर्चेला आलेला आहे. या बाबतीत शासनाने समिती नेमली आहे,यासाठी शासनास एवढा खर्च येईल असे ठरलेल्या साच्यातील प्रत्येक वेळी उत्तर दिलेले आहे. शासनाची ती उत्तरे अतिशय गुळगुळीत झालेली आहेत. यासंदर्भात जी बैठक झाली, त्या बैठकीची बरहुकूम निर्णयाची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी अशा प्रकारचे दिनांक 25 मार्च, 2010 रोजी माननीय सभापतींनी शासनास निर्देश दिले होते. माननीय सभापतींनी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी शासनाच्या माध्यमातून केली जाणार आहे किंवा नाही ? करणार नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्रीमती फौजिया खान : येथे दोन प्रश्न विचारण्यात आले आहेत. नियम 93 अन्वयेच्या सूचनेमध्ये अनेक मुद्दे उपस्थित करण्यात आले आहेत, त्या अनुषंगाने प्रश्न विचारले आहेत. मला प्रथम असे सांगावयाचे आहे नियम 93 च्या सूचनेत किती विषय असावेत याला काही बंधन असणे आवश्यक आहे. वेगवेगळया स्वरुपातील वेगवेगळे प्रश्न नियम 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने विचारण्यात आले आहेत. या सूचनेत अनेक विषयांचा संबंध येत असल्यामुळे मला निश्चित असा कालावधी सांगता येणार नाही. नियम 93 च्या सूचनेत एक,दोन प्रश्न असते तर मला निश्चित कालावधी सांगता आला असता. त्यामुळे निश्चित कालावधी सांगणे कठीण आहे.

श्री. रामनाथ मोते : शिक्षण संचालकांकडून शासनाकडे गेल्या तीन वर्षापूर्वी प्रस्ताव आलेला आहेत. तीन वर्षापासून प्रस्ताव आल्यानंतर देखील शासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही केली जात नाही ही खेदाची गोष्ट आहे. शिक्षण संचालकांकडून 2008 मध्ये शासनाकडे प्रस्ताव

4..



श्री.रामनाथ मोते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाठविले आहेत, परंतु त्याबाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही, म्हणून मी निश्चित कालावधीची मागणी केली आहे. माननीय सभापतींच्या निर्देशाचा प्रश्न वेगळा आहे. मला प्रथम माझ्या प्रश्नाचे उत्तर हवे आहे.

श्रीमती फौजिया खान : या सूचनेत अनेक प्रश्नांचा उल्लेख आलेला असल्यामुळे मला निश्चित कालावधी सांगता येणार नाही. माननीय सभापती महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या बाबतीत दुसरा प्रश्न विचारण्यात आला आहे. त्याबाबतीत मी सांगू इच्छिते की, सदर प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या समोर नेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

----------

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा कारागृहाची निर्मिती करणे.

**मु. शी.** : गोंदिया या नक्षलग्रस्त जिल्हयाच्या ठिकाणी जिल्हा कारागृहाची निर्मिती करणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर,विनोद तावडे. वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गोंदिया हा नवीन जिल्हा झालेला आहे. गोंदिया येथे कारागृह असण्याची आवश्यकता आहे. वास्तविक पाहता गोंदिया हा नक्षलवादी जिल्हा

आहे. त्या ठिकाणी नक्षलवाद्यांना तसेच गुन्हे करणाऱ्यांना अटक केली जाते. तेथील गुन्हेगारांना भंडारा येथील कारागृहात ठेवले जाते. भंडारा कारागृहात ठेवलेल्या आरोपींना गोंदिया येथे तारखेसाठी आणावयाचे असेल तर गोंदिया पोलीस स्टेशनची गाडी असणे आवश्यक आहे, तसेच त्या आरोपींना घेऊन जाण्यासाठी गोंदियाचे पोलीस असणे आवश्यक आहे. गोंदिया जिल्हयात पुरेसे पोलीस बल नाही, पोलीस स्टेशनला वाहने नाहीत. वाहनांना पुरेसे डिझेल उपलब्ध होत नाही. त्यामुळे भंडारा जिल्हयात ठेवण्यात आलेल्या गोंदियांच्या कैद्यांना कोर्टातील तारखांसाठी उपस्थित ठेवणे कधी कधी शक्य होत नाही. गोंदिया-भंडारा येथे ने आण करण्यासाठी कि.मी.चा प्रश्न निर्माण होतो. गोंदिया येथून कैद्यांना भंडारा येथील जेलमध्ये नेले जाते, त्यानंतर ते वाहन तसेच गोंदिया येथे परत येते, त्यानंतर तारखेच्या वेळी पुन्हा गोदिया पोलीस स्टेशनचे वाहन भंडारा येथे ठेवण्यात आलेल्या कैद्यांना घ्यावयास जाते, त्यानंतर त्या कैद्यांना पुन्हा भंडारा जेलमध्ये ठेवण्यात येते. यामुळे वाहनांचे किलोमीटर मोठया प्रमाणात वाढतात. हाही एक महत्वाचा प्रश्न आहे.गोंदियातील कैद्यांना भंडारा येथील कारागृहात ठेवले जाते, कोर्टाच्या तारखेच्या वेळी भंडारा पोलीस स्टेशनची गाडी दिली तर डिझेलचा प्रश्न काही प्रमाणात सुटू शकतो, तसेच भंडाऱ्याचे पालीस दिले तर मनुष्यबळ देखील कमी लागेल. गोंदिया आणि भंडारा जिल्हयातील पोलीस वाहनांना डिझेलचा जो काही कोटा दिलेला आहे, तो अतिशय कमी आहे. तो वाढवून दिला पाहिजे. गोंदिया, भंडारा जिल्हयातील काही भाग नक्षलग्रस्त आहे, कैद्यांना ने-आण करताना सुरक्षिततेचा देखील प्रश्न निर्माण होतो. या वाहनांवर नक्षलवाद्यांचे हल्ले् होऊ शकतात. भविष्यात अशा वाहनांवर हल्ले होऊ नयेत म्हणून कैद्यांची गोंदिया येथे ने-आण करण्यासाठी भंडारा जिल्हयातील पोलीस स्टेशनच्या गाडया उपलब्ध करुन दिल्या जातील काय, गोंदिया येथे लवकरात लवकर कारागृह बांधण्यात येईल काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, कारागृहासाठी लागणाऱ्या जमिनी संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे, याबाबतची माहिती निवेदनात देण्यात आली आहे. कारागृहाच्या बांधकामासाठी जमीन ताब्यात घेतलेली आहे. सदर कारागृह बांधण्यासाठी येत्या मार्च

7..



श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील.....

महिन्याच्या अधिवेशनात काही बजेट उपलब्ध करुन घेऊ व त्यानंतर लागलीच कारागृहाच्या बांधकामास सुरुवात करण्यात येईल. भंडारा येथील पोलीस गोंदियाला आरोपी घेऊन जाण्यासाठी वापरावेत. ते गोंदियातील आरोपी असल्यामुळे गोंदिया पोलिसांचा त्यांचेशी संबंध येणार आहे. हा टेक्निकल विषय आहे. गोदियातील आरोपी असल्यामुळे गोंदिया पोलीसांची जबाबदारी आहे. ही बाब

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मी निश्चितपणे तपासून बघतो. मनुष्यबळ कमी आहे असा मुळीच प्रश्न नाही. गोंदियासाठी नवीन 123 पोलिसांची पदे उपलब्ध होणार आहेत. मनुष्यबळ आणि वाहनांची अडचण या कैद्यांना ने-आण करण्यासाठी येणार नाही.

-----------

8...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KTG/ प्रथम श्री.खंदारे 12:20

**पृ. शी.** : राज्यातील दूध विक्रेत्यांनी कमिशन वाढविण्याची केलेली मागणी.

**मु. शी.** : राज्यातील दूध विक्रेत्यांनी कमिशन वाढविण्याची केलेली मागणी याबाबत श्री. दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री.परशुराम उपरकर,किसनचंद तनवाणी,गोपीकिसन बाजोरिया वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय दुग्धविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गुजरात राज्यातून अमूल कंपनीचे दूध मोठया प्रमाणात महाराष्ट्र राज्यात वितरित होत असणे, हे दूध टँकरने नवी मुंबईतील तुर्भे एम.आय.डी.सी.तील कंपन्यांमध्ये पॅकिंग करण्यात येत असणे, राज्यातील दूध विक्री व्यवसाय करणाऱ्या शेकडो विक्रेत्यांनी कमिशन वाढवून मिळण्याबाबत अमूल कंपनीकडे माहे नोव्हेंबर,2011 मध्ये केलेली आग्रही मागणी, दूध विक्रेत्यांच्या या मागणीकडे कंपनीने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, या दूध विक्रेत्यांना अमूल व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कंपनीचे दूध विकण्यास या कंपनीने घातलेली बंदी, महाराष्ट्रातील महानंदाचे दूध गुजरात राज्यामध्ये विक्रीसाठी नेले असता एकही दिवस दूध गुजरात राज्यात विकू न देणे, याचे तीव्र पडसाद राज्यात उमटून नवी मुंबई येथील संघटनांनी दिनांक 18.11.2011 रोजी तुर्भे येथील दूध पॅकिंग कंपन्यांवर मोर्चा काढून तेथील दूध पॅकिंग बंद पाडणे, दूध विक्रेत्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, अमूल कंपनीच्या अशा अरेरावीला वेळीच प्रतिबंध न केल्यास राज्यातील दूध व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता विचारात घेऊन शासनाने याबाबत तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.गुलाबराव देवकर ( दुग्धविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

9..

20-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) I-9

ABG/ KTG/ प्रथम श्री.खंदारे 12:20

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आपल्या राज्यातील गोकुळ दुधाचा ब्रॅन्ड गुजरातमध्ये गेला. या संदर्भात राज्य सरकारला जो काही अधिकार आहे, तो अधिकार राज्य शासन दाखविणार आहे की नाही हा खरा प्रश्न आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थ आदेश, 1992 ची अंमलबजावणी सन

1996 पासून सुरु आहें. त्यानुसार खाजगी, सहकारी वा व्यापारी यांना देशात कोठेही जाऊन दुध संकलन करण्याची व दूध वितरण करण्याची मुभा मिळालेली आहे. गुजरातचे अमूल दूध महाराष्ट्रात का आले यासंबंधी देखील निवेदनात माहिती दिली आहे. महानंदाचे दूध गुजरात राज्यात गेले, त्यावेळी हा कायदा तेथेही लागू होता. महानंद डेअरीचे दूध गुजरातमध्ये रुजू नये, महाराष्ट्रातील महानंदा सहकारी संस्थेला गुजरातमध्ये दुधाचा धंदा करता येऊ नये. महानंद डेअरीचे दूध ज्या दूग्ध सहकारी संस्थांनी घेतले, त्यांचे विरुध्द गुजरात सरकारने कारवाई केली. त्यांनी महानंद डेअरीच्या दुधाच्या सॅम्पलची तपासणी केली. त्यानंतर त्यांनी महानंद संस्थेला न्यायालयात खेचले. परंतु या संदर्भात न्यायालयात ्गुन्हे सिध्द झाले नाहीत. गुजरात सरकार न्यायालयात हरले, तरी देखील गुजरात सरकारने महानंद सहकारी संस्थेला पळवून लावले.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1........ श्री.दिवाकर रावते....

मुंबई शहराला जादा दुधाची गरज भासते म्हणून अमूल दुधाची विक्री होत आहे. अमूल दुधाच्या विक्रीची अपरिहार्यता लक्षात घेऊन या राज्यातील अमूल दूध वितरकांना कमिशन वाढवून दिले जात नाही. दुपारी 12.00 वाजेपर्यंत उद्याची ऑर्डर नोंदविली पाहिजे, दूध शिल्लक राहिले तर ते परत घेतले जात नाही. अशी अमूल दूध उत्पादकांची अरेरावी सुरु आहे. त्यांनी ज्याप्रमाणे महानंद डेअरीला त्रास दिला त्याच प्रकारे राज्य शासनाने त्यांच्यावर निर्बंध आणले पाहिजेत. त्याशिवाय अमूल दूध डेअरी वठणीवर येणार नाही. त्यांनी महानंद डेअरीवर जी कारवाई केली तशी कारवाई अमूल डेअरीवर करुन त्यांचे नाक दाबले जाईल काय? राज्यात अमूल दुधाचे जे वितरक आहेत त्यांनी कोणत्या भावाने दूध खरेदी करावी, कोणत्या भावाने दुधाची विक्री करावी हे ठरविण्याचे अधिकार अमूल डेअरीला आहेत. परंतु अमूल दुधाची विक्री केली जाते त्या ठिकाणी अमूल दूध वितरकांना इतर डेअरीचे दूध विकता येणार नाही असे बंधन त्यांनी घातले आहे. राज्य शासनाने अमूल दूध डेअरीला या राज्यात त्यांचे दूध विक्री करण्यासाठी मात्र रान मोकळे ठेवले आहे. या संदर्भात शासनाची धोरणात्मक भूमिका काय राहणार आहे?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, महानंद डेअरीने गुजरात राज्याच्या सीमेवर अहमदाबाद शहराजवळ प्लँट सुरु केला त्यावेळी दुधाची उपलब्धता 7 ते 8 लाख लीटरपेक्षा जास्त होती. गुजरात राज्यामध्ये महानंद डेअरीचे दूध विक्रीसाठी जावे म्हणून तेथे प्लँट सुरु केला होता. परंतु स्थानिक वितरकांनी आणि दूध व्यावसायिकांनी प्रखर विरोध केल्यामुळे गुजरात राज्याकडून महानंद डेअरीवर गुन्हे दाखल झाले, पोलीस केसेस झाल्या. त्यामध्ये निर्दोष सुटका झाली आणि तो विषय तेथे बंद झाला. पुढील काळात महानंद डेअरीचे दूध संकलन आपोआप कमी झाले आणि पर्यायाने ती बाजारपेठ थांबविली गेली. अमूल दुधाच्या संदर्भात अशी भूमिका घेणार का असा प्रश्न माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे. आपल्या राज्यात विक्रीसाठी येणाऱ्या अमूल दुधाचे 28 नमुने तपासणीसाठी घेण्यात आले होते, त्यापैकी 26 नमुने प्रमाणित आढळून आले व दोन नमुन्यांचा तपासणी अहवाल अप्राप्त आहे. यापूर्वी ज्या दोन कारवाया करण्यात आल्या त्यामध्ये आईस्क्रीम प्रकरणी आणि तयार दह्याच्या एका प्रकरणात गुन्हे दाखल केले असून त्या खटल्याचा निकाल अप्राप्त आहे. ज्या पध्दतीने महानंद डेअरीला त्यांच्याकडून त्रास देण्याचा प्रयत्न केला गेला, नमुने तपासणीसाठी घेऊन गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेला त्याच पध्दतीने महाराष्ट्र शासनाने त्यांच्या दुधाचे व दुग्धजन्य उप पदार्थाचे नमुने तपासणीसाठी घेऊन गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारचा कायदा 1992 साली अस्तित्वात आला आणि त्याची अंमलबजावणी 1996 मध्ये सुरु झाली. या कायद्यानुसार कोणत्याही दूध उत्पादकाला कोणत्याही राज्यात जाऊन दूध विक्री करता येते. त्यांनी कोणत्या दराने दूध खरेदी करावी, कोणत्या दराने विक्री करावी याबाबत त्यांना मुभा देण्यात आली आहे. वितरकांना कोणत्या दराने कमिशन द्यावे, किती कमिशन द्यावे या संदर्भात सुध्दा दूध उत्पादकांना मुभा देण्यात आली आहे. ही गोष्ट खरी आहे की, अमूल दूध डेअरीच्या मालकाकडून राज्यातील अमूल दूध वितरकांची पिळवणूक होत आहे. त्यांच्याकडून दूध वितरकांना कमी कमिशन दिले जात आहे. या बाबत अमूल दूध वितरकांनी आंदोलने केल्यानंतर त्यांची भूमिका समजून घेण्याचे काम राज्य सरकारच्या माध्यमातून झाले. हा विषय कायदा आणि सुव्यवस्थेच्या माध्यमातून थांबविण्यात आला. राज्यात अमूल दूधाची विक्री पूर्ववत सुरु झाली. काही दूध उत्पादक संस्था वितरकांना प्रती लीटर 2 रुपये किंवा 1.80 रुपये कमिशन देतात. मात्र अमूल डेअरीकडून दूध वितरकांना प्रती लीटर 1 रुपया कमिशन दिले जाऊन त्यांची पिळवणूक केली जाते. कायद्याच्या दृष्टीकोनातून आपण त्यांच्यावर बंधन आणू शकत नाही, अशी तरतूद कायद्यात केलेली आहे. या प्रश्नाबाबत आणखी कोणता मार्ग काढता येईल या दृष्टीने शासन स्तरावर निर्णय घेण्यासाठी कॅबिनेट मंत्र्यांनी अमूल डेअरीच्या मॅनेजिंग डायरेक्टरना एक पत्र पाठविले आहे. त्या पत्रात असे नमूद केले आहे की, अमूल दूध प्रकल्प महाराष्ट्रात सुरु असताना वितरकांची पिळवणूक केली जात आहे, त्यांना कमी दराने कमिशन दिले जात आहे. इतर दूध उत्पादक संस्थांप्रमाणे वितरकांना कमिशनचा दर देण्यात यावा अशीही विनंती केली आहे. त्या संदर्भात मुंबई येथे एक बैठक घेऊन तडजोडीने मार्ग काढण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, कायदेशीर कोणते प्रयत्न करता येतील या दृष्टीने प्रयत्न करीत आहोत असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. आज अत्यावश्यक सेवा संदर्भातील विधेयक सभागृहापुढे चर्चेला येणार आहे. त्यामध्ये दूध विक्री अत्यावश्यक सेवा असल्याचे नमूद केले आहे. अमूल दूध गुजरातमधून या राज्यात विक्रीला येत असल्यामुळे त्यांना हा अत्यावश्यक

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सेवेचा कायदा लागू होईल का या बाबत साशंकता निर्माण झालेली आहे. मंत्री महोदय या संदर्भात मार्गदर्शन करतील काय?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अत्यावश्यक सेवा विधेयकाचा माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्याचा या प्रश्नाशी संबंध येत नाही. यापूर्वी या प्रश्नाबाबत ज्या दोन बैठका झाल्या त्या माझ्याच पुढाकारामुळे आयोजित केल्या होत्या. अमूल दूध वितरकांवर अन्याय होत आहे. मुंबईमध्ये दररोज 65 ते 70 लाख लीटर दुधाची गरज भासते, त्यापैकी 10 ते 12 टक्के दूध गुजरात राज्यातील अमूल डेअरीच्या माध्यमातून मुंबई शहरात विक्रीसाठी येत असते. अमूल ब्रँडची पॉप्युलॅरिटी आम्ही समजू शकतो. परंतु त्या पॉप्युलॅरिटीप्रमाणेच मुंबई शहरात त्यांची दादागिरी सुरु आहे. 1996 मध्ये केंद्र सरकारचा कायदा अंमलात आलेला असला तरी या राज्यातील कायद्यानुसार अमूल दूध वितरकांवर होणारा अन्याय दूर करण्याचा अंतिम अधिकार राज्य सरकारकडे असला पाहिजे आणि तो अधिकार राज्य सरकारलाच आहे. ज्याप्रमाणे गोकुळ डेअरीविरुध्द राज्य सरकारने पाऊल उचलले होते त्याच धर्तीवर अमूल डेअरीबाबत कारवाई करता येऊ शकते अशी माझी धारणा आहे. या पूर्वी मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दोन बैठका झाल्या आहेत. सहा महिन्यांचा काळ उलटून गेला आहे. त्या बैठकीमध्ये मला आश्वासित केले होते त्या नुसार अमूल डेअरीच्या प्रतिनिधींना बैठकीसाठी उपस्थित राहण्याबाबत कळवावे. या राज्यात 10 टक्के म्हणजे 7 ते 8 लाख लीटर अमूल दुधाची विक्री होत आहे. हे त्यांच्या निदर्शनास आणून देऊन अमूल डेअरीच्या प्रतिनिधींना मुंबई येथे बैठकीसाठी बोलावले जाईल काय? 80 टक्के दूध उत्पादक ठराविक दराने त्यांच्या दूध वितरकांना कमिशन देत असतील आणि अमूल डेअरी ठराविक दरानेच वितरकांना कमिशन देत असेल तर इतर दूध उत्पादक संस्थांप्रमाणे वितरकांना वाढीव कमिशन देण्यास अमूल डेअरीला बाध्य करण्यात येईल काय?

श्री.गुलाबराव देवकर : अमूल डेअरीला आपण पत्र पाठविले आहे. त्यांना पुन्हा स्मरणपत्र देऊन लवकरच बैठक आयोजित करण्याचे काम केले जाईल आणि या बाबतीत निगोसिएशन करुन अमूल दूध वितरकांना कमिशनचा जास्त दर देण्यासाठी आग्रह धरला जाईल.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, कायद्यामध्ये तरतूद नसल्यामुळे अमूल डेअरीविरुध्द कारवाई करता येत नाही. मुंबई आणि मुंबईबाहेर अमूल डेअरीची बरीच आऊटलेट आहेत. शासनाच्या अन्न व औषध प्रशासनाकडून आणि महापालिकेकडून त्यांना लायसन्स दिली जातात. त्यांचे नाक का दाबले जात नाही? कायद्याचा आधार घेऊन त्यांची सर्व आऊटलेट बंद केल्यास अमूल डेअरीचे व्यवस्थापन ताबडतोब ताळ्यावर येईल. अशा प्रकारची कारवाई करणार आहात काय?

श्री.गुलाबराव देवकर : तपासून कारवाई केली जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, दुधाच्या संदर्भात हा एक अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. 60 ते 65 लाख लीटर पैकी 7 लाख लीटर दूध अमूल डेअरीकडून मुंबई शहरात विक्रीसाठी येत असते. देशभर मान्य झालेला हा सुपरिचित ब्रॅंड आहे. कोणत्याही बाजारपेठेच्या अर्थशास्त्राप्रमाणे अमूल डेअरीचे मालक जे कोणी आहेत त्यांना त्यांच्या ब्रॅंडची किंमत आणि त्या निमित्ताने कमिशनची रक्कम ठरविण्याचा अधिकार आहे. परंतु ज्या राज्यात दूध विकायचे आहे त्यांच्याशी स्पर्धा करायची, त्यांनी आपल्याला अडवायचे आणि आपण त्यांना अडवायचे हे प्रकार सुरुच राहतील. महानंद डेअरी आणि इतर दूध उत्पादक संस्थांकडून होणाऱ्या दूध पुरवठ्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे मागणी आणि पुरवठ्यामध्ये 7 लाख लीटरचा फरक झालेला आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल. सूचना क्र. 1........... श्री. हेमंत टकले ......

आज अमूल ती गरज पूर्ण करीत आहे. तेवढ्या दुधाची गरज भागविण्यासाठी ते दूध वापरले जाते. अमूल दुधाचे दर ठरविण्याचा अधिकार कदाचित त्या राज्यालाच असावा. आपल्या राज्यात असलेली महानंदा आणि शासकीय दूध विक्री योजना अधिक सक्षम करणे, दर्जा चांगला करणे आणि गुजरात राज्यापेक्षा तुलनेने अधिक स्पर्धात्मक रित्या आपले दूध कसे टिकून राहील अशा प्रकारे प्रयत्न करणे आवश्यक आहे. केवळ अशा प्रकारची लढाई करुन हा विषय संपणार नाही तर यातून मार्ग काढण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगला प्रश्न विचारला की दुग्धविकास विभागात जी स्पर्धा चालते त्यामुळे असे होतच राहणार. आपणच आपल्या पायावर धोंडा मारुन घेण्यापेक्षा स्पर्धेत कसे टिकून राहता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. त्यांच्या या मताशी मी सहमत असून शासनाचे त्याच दिशेने प्रयत्न सुरु आहेत. मी थोडक्यात सांगू इच्छितो की, शासनाने नुकताच एनडीडीबी शी करार केला असून पालघर येथे 10 लाख लिटर दुधाचा प्रकल्प घेण्याबाबत एमओयू केला आहे. त्या प्रकल्पाच्या माध्यमातून आपण दुधाचे उत्पादन जास्तीत जास्त वाढवू शकू. दुसरा विषय म्हणजे मराठवाडा आणि विदर्भाच्या सहाय्याने मिल्क प्रोजेक्शन कंपनीची स्थापना करुन दूध उत्पादक शेतकऱ्यांना दूध संकलन करण्यासाठी एकत्र करुन त्यांना प्रोत्साहन द्यावे अशी एक योजना ठरविलेली आहे. त्याचबरोबर पालघर येथे पशुधनाच्या अनुवंशिकतेत वाढ करण्याच्या दृष्टीने कृत्रिम रेतन सेंटर सुध्दा तयार करीत आहोत. जेणेकरुन त्या माध्यमातून कृत्रिम रेतन आपल्याला करता येईल व चांगल्या जातीच्या जास्तीत जास्त गायी निर्माण करता येतील. त्या माध्यमातून दुधाचे उत्पादन वाढविता येईल. त्याच पध्दतीने आपण राज्यात एकात्मिक दुग्धविकास प्रकल्प राबविण्यासाठी सुरुवातीला मराठवाड्यातील 8 जिल्ह्यांची निवड केली होती. ज्या यंत्रणेच्या माध्यमातून आपण मराठवाड्यात ही योजना राबविली त्याच पध्दतीने संपूर्ण राज्यात प्रत्येक जिल्ह्याला 48 लाख रुपये देऊन ज्याप्रमाणे मराठवाड्यात 100 गायींचा प्रकल्प राबविला आणि यशस्वी झाला त्याच धर्तीवर दुधाचे उत्पादन संपूर्ण राज्यात वाढविता येईल.

.....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर ......

अशा प्रकारे संपूर्ण राज्यात 100-100 गायींचे दोन दोन प्रकल्प उभे करुन त्याचे रिझल्ट चांगले मिळतील अशी अपेक्षा आहे. त्याच पध्दतीने राज्यातील 17 दूध संघांचे बळकटीकरण आणि आधुनिकीकरण करण्यासाठी 53.83 कोटीचा निधी आपण काही संस्थांना दिला. त्या संस्थेच्या माध्यमातून दुधाच्या बाबतीत प्रशिक्षण देणे, मिल्कींग मशिन्स, संगणक सचिव, दुग्धशाळा उभारणे अशा प्रकारच्या यंत्रणा उभ्या करण्याचा शासनाचा मानस आहे. पशुधन कृत्रिम रेतनाचा जो कार्यक्रम आपण मागील वर्षापासून राबवित आहोत त्या माध्यमातून आता रिझल्ट सुध्दा चांगले मिळत आहेत. राज्य शासनाच्या स्तरावर त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा सुरु केली असून त्या यंत्रणेमार्फत कृत्रिम रेतन सेंटर सुरु करीत आहोत. त्याचबरोबर गावागावात जाऊन ही यंत्रणा चांगल्या जातीच्या गायींची नोंद करुन त्याचे रेकॉर्ड तयार करण्याचे काम सुध्दा करेल. अशा प्रकारे सर्व चांगल्या प्रकारच्या गायी पुन्हा कशा तयार करता येतील यासाठी एक धडक कार्यक्रम आपण घेणार आहोत. जनारवरांवर वेगवेगळ्या प्रकारचे जे रोग येतात त्यांचे समूळ उच्चाटन करणे हे देखील त्याच कार्यक्रमात असून त्याची सुरुवात आपण करीत आहोत. गावांमध्ये जाऊन 300 गायी निवडल्या जातील व त्यांच्याकडे प्रत्यक्ष लक्ष देण्याचा कार्यक्रम सुध्दा घेतला जाणार आहे. त्या गायींच्या आरोग्याकडे लक्ष देणे, त्यात सुधारणा करणे, चारा देण्याचे काम अशा सर्व गोष्टी या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येतील. एकंदरित शासनाचा उद्देश असा आहे की, एकीकडे जनावरांची चांगल्या प्रकारे वाढ झाली पाहिजे, चांगल्या जातीची जनावरे आपल्याकडे आली पाहिजेत त्याच पध्दतीने दूध उत्पादनासाठी वेगवेगळे प्रकल्प सुध्दा आणता आले पाहिजेत, असा कार्यक्रम पुढील दोन तीन वर्षात घेऊन अधिकाधिक दूध कसे निर्माण करता येईल याकडे लक्ष देण्यात येईल.

श्री. संजय केळकर : महोदय, मंत्री महोदयांनी राज्यात पुढे घेणार असलेल्या निरनिराळ्या प्रकल्पांबाबतची माहिति दिली. त्यातून दुधाच्या वाढीसाठी कशी मदत होईल असा उहापोह सुध्दा त्यांनी केला आहे. मी या निमित्ताने विचारु इच्छितो की, ठाणे जिल्ह्यात दापचरी दूध प्रकल्प आपण घेतला होता. त्या प्रकल्पासाठी आदिवासींची शेकडो एकर जमीन संपादित केली होती. पण हा प्रकल्प आता पूर्णपणे ठप्प झालेला आहे, डब्यात गेला आहे. एवढेच नव्हे तर त्या

......3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

जमिनीवर लोकांनी अतिक्रमण सुध्दा मोठ्या प्रमाणात केलेले आहे. हाच प्रकल्प अधिक सक्षम करण्याचा शासनाचा विचार आहे काय, तसेच ज्यांनी या प्रकल्पासाठी आपली जमीन कवडीमोल भावाने दिली ती त्यांना परत न करता उलट त्यावर ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नसून ती कारवाई करुन शासन ही संपूर्ण जागा आपल्या ताब्यात घेणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, दापचरी दूध प्रकल्पाला मी स्वत: भेट दिलेली असून त्या संपूर्ण भागाचा दौरा सुध्दा केलेला आहे. या जागेवर ज्यांनी अतिक्रमण केलेले आहे त्याची माहिती घेतली असता काही लोकांनी दुसऱ्याच्या नावावर या जमिनी बळकाविण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून आले आहे. या सर्व लोकांना कायदेशीर नोटिसेस इश्यू करण्यात आल्या असून त्यांच्यावर नियमानुसार निश्चित कारवाई करणार आहोत. तसेच पुढील काळात दापचरी प्रकल्पाचा सुध्दा एनडीडीबीच्या माध्यमातून किंवा खाजगी संस्थांच्या माध्यमातून एखादा प्रकल्प घेता येतो काय याबाबत विचार करण्यात येईल. जेणेकरुन या जागेचा उपयोग होईल.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, मंत्री महोदयांनी शासनाच्या वतीने वेगवेगळ्या योजना घेऊन राज्यात दुधाचे उत्पादन कसे वाढविता येईल याबाबतची माहिती दिली आहे. गुजरातच्या अमूल दुधाचा ब्रँड हा अधिक लोकप्रिय आहे की कोणतेही दूध प्रकल्प आणले तरी अमूल दुधाचा वापर कमी होणार नाही असा त्या दुधाचा दर्जा आहे. माझी या निमित्ताने शासनाला सूचना आहे की, ज्या प्रमाणे गुजरात राज्याने आपल्या महानंदा दुधावर त्या राज्यात बंदी घातली होती तशाच प्रकारची उपाययोजना शासन आपल्या राज्यात करणार आहे काय ?

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, गुजरात राज्याने आपल्या महानंदा दुधावर कोणत्याही प्रकारे बंदी घातली नव्हती तर त्या दुधाचे वेगवेगळे नमुने घेऊन तपासणी केली होती व त्यानुसार कारवाई केली होती. तशाच प्रकारचा प्रयत्न आपण अमूल दुधाच्या बाबतीत करीत आहोत. अमूल दुधावर बंदी आपल्याला आणता येणार नाही हे निश्चित आहे.

-------

.......4

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गेवराई शहराला होणारा अशुध्द पाणीपुरवठा

**मु. शी.** : गेवराई शहराला होणारा अशुध्द पाणीपुरवठा यासंबंधी ॲड. उषा दराडे, सर्वश्री विक्रम काळे, हेमंत टकले, रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"गेवराई शहरातील 20 कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना शासनाने मंजूर करुन पूर्ण केली, तथापि शहरासाठी बसविण्यात आलेला अत्याधुनिक जलशुध्दी प्रकल्प एक वर्षापासून बंद राहणे, परिणामी रहिवाशांना गोदावरी नदीतून आलेल्या पाण्यावर थातूर मातूर प्रक्रिया करुन अशुध्द पाणी प्यावे लागणे, परिणामी शहरवासियांना कावीळ, टाईफाईड, डायरिया, गॅस्टीक आदिंसारखे आजार उद्‌भवत असणे, याबाबत शहरांसाठी असलेला जलशुध्दी प्रकल्प सुरु करणेबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-------

......5

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : महोदय, गेवराई शहराला गोदावरी नदीच्या पात्रातून पाणी पुरवठा केला जातो. हा पाणी पुरवठा अत्यंत अस्वच्छ स्वरुपात दिला जातो. तसेच येथील योजनेसाठी असलेला जलशुध्दीकरण प्रकल्प सुध्दा बिघडलेला आहे. त्याला मंत्री महोदयांनी असत्य स्वरुपाचे उत्तर दिलेले आहे. शासनाने सांगितलेले आहे की, पाण्याचे शुध्दीकरण करुन व्यवस्थित पाणी पुरवठा केला जातो. यालाच माझा आक्षेप असून पुन्हा या प्रकरणाची चौकशी करण्यात येणार आहे काय, तसेच जो अशुध्द पाणीपुरवठा केला जातो त्यासाठी जल शुध्दीकरण प्रकल्प दुरुस्त करुन शुध्द पाणीपुरवठा केला जाणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : महोदय, ही पाणीपुरवठा योजना नगरपालिकेला हस्तांतरित झालेली असून दरमहा त्या पाण्याचे वॉटर सॅम्पल्स सुध्दा तपासले जातात. हे नमुने योग्य आढळून आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली की, अशुध्द पाणीपुरवठा केला जातो याची चौकशी पुन्हा करण्यात येईल. तसेच येथील जल शुध्दीकरण युनिट नादुरुस्त नसून चांगल्या अवस्थेत आहे असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

---------

..........6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाहतुकीच्या दरात बऱ्याच वर्षांपासून वाढ न करणे

**मु. शी.** : सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाहतुकीच्या दरात बऱ्याच वर्षांपासून वाढ न करणे यासंबंधी सर्वश्री सर्वश्री. नागो गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवानराव साळुंखे, डॉ.रणजीत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर जिल्हयातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत दरमाही सुमारे 17000 मेट्रीक टन अन्न-धान्याची वाहतूक करण्यासाठी खाजगी वाहतूक कंत्राटदारांना कंत्राट देताना प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी सन 2006 पासून अधिग्रहीत वाहनाचे निश्चित केलेल्या दरात आज पावेतो कुठल्याही प्रकारची वाढ न करणे, वाहतूक कंत्राटदरांना पूर्वीच्याच दरात माल उचलणे परवडत नसल्याने दरमहा मोठया प्रमाणात धान्यसाठा व्यपगत होणे, परिणामी लाभार्थी अन्न धान्यापासून वंचित राहणे, याकरिता संबंधित विभागाच्या मा.मंत्र्यांनी दि.29/04/2011 रोजी दरवाढीस मंजुरी देऊनही संबंधित अधिका-यांकडून दरवाढ देण्यास टाळाटाळ करणे, या महत्वाच्या प्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, या प्रकरणी शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

श्री. अनिल देशमुख (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

------

नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुडलिक गाणार : सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना उपस्थित केली असून या लक्षवेधीच्या संदर्भात शासनाचे जे उत्तर आलेले आहे त्यासंदर्भात मी सहा प्रश्न विचारु इच्छितो. 1) वाहतूक दरवाढ करण्याबाबत धोरण पक्की करण्यासाठी वित्त विभागास पाठविलेल्या प्रस्तावावर अभिमत प्राप्त झाले आहे काय, नसल्यास कधी पर्यंत प्राप्त होणार आहे. 2) बीड जिल्हयात 30 टक्के वाहतूक दरवाढ शासनाने मंजूर केली हे खरे आहे काय ? 3) डिझेल, मजूर, रोड टॅक्स, विमा तसेच वाहतुकीवरील व इतर आनुषंगिक खर्चात खूप मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे तरी सुध्दा सन 2006 पासून नागपूर जिल्हयात कोणत्याही प्रकारची वाहतूक दरवाढ करण्यात आली नाही हे खरे आहे काय ? 4) राज्यातील कोणत्या जिल्हयात अन्न धान्य वाहतुकी करिता दोनदा दरवाढ देण्यात आली त्याची प्रमुख कारणे काय आहेत 5) नागपूर जिल्हयात अधिकृतपणे वाहतूक दरवाढ प्रत्यक्षात कधी पासून देण्यात येणार आहे, नसल्यास त्याची कारणे कोणती ? 6) मंत्री महोदयांनी दि. 29 एप्रिल, 2011 रोजी दरवाढीस मंजुरी दिलेली असतांनाही प्रशासनाने आजतागायत अंमलबजावणी का केली नाही ?

श्री. अनिल देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सहा प्रश्न उपस्थित केलेले आहेत. नागपूर जिल्हयातील अन्न धान्याच्या वाहतुकीसाठी सन 2006 पासून निविदा काढण्यात आल्या होत्या. परंतु यासंदर्भात कोर्टाने स्टे आल्यामुळे भाव वाढ नक्की होऊ शकली नाही. रिक्वीझीशनने काही ट्रक्स ताब्यात घेऊन सदर वाहतूक केली जात आहे. गेल्या सहा वर्षापासून रिक्वीझीशनच्या माध्यमातून वाहतूक केली जात आहे. मध्यंतरीच्या काळात यासंदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात आला होता. इन्फ्लेशन इंडेक्स वाढलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. इन्फ्लेशन इंडेक्समध्ये पेट्रोल, डिझेल तसेच टॅक्सेसमध्ये वाढ झालेली आहे. सहा वर्षापासून एकाच दराने वाहतूक करावी लागत असून त्या वाहतुकीच्या दरात वाढ करुन मिळावी अशी मागणी होत आहे. इन्फ्लेशन इंडेक्समध्ये 4-5 वर्षात भाव वाढ झालेली आहे. त्यामुळे वाहतुकीच्या संदर्भात इन्फ्लेशन इंडेक्स काढून 2007 ते आता पर्यंतची दर वाढ निश्चित करण्यात येईल व यामधील तफावत कंत्राटदारांला देण्यात येईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 पुढे ढकलण्याबाबत**

**उप सभापती** : आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दर्शवण्यात आलेली चवथी लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात यावी अशी संबधित मंत्री महोदयांनी विनंती केल्यामुळे सदर लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 5 बाबत**

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, माझ्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यासाठी जलसंपदा विभागाचे एकही मंत्री उपस्थित नाहीत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना असतांना सुध्दा संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी सभागृहात उपस्थित न राहणे हे बरोबर नाही. जलसंपदा विभागाच्या मंत्री महोदयांनी सभागृहात हजर रहावे म्हणून सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी तहकूब करावी अशी विनंती आहे.

**उप सभापती** : सदर लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मंत्री महोदयांनी पत्र दिले असते तर ती बाब मी मान्य केली असती. सभागृहाची बैठक मी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 12.54 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात आली.)

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

(सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य श्री.जैन्नुद्दीन जव्हेरी माननीय उप सभापती आसनस्थ होताच घोषणा देतात.)

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीन जव्हेरी यांना एक गोष्ट सांगू इच्छितो की, त्यांना जर न्याय पाहिजे असेल तर त्यांनी बाहेर पायरी बसून बॅनर लावून आमरण उपोषणाला बसावे. मग मी तेथे येतो. आपण माझ्यावर विश्वास ठेवावा. येथे बसून आपण सर्वांना गोळ्या चारत आहात. आता सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी लक्षवेधी सूचना उपस्थित करावी.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर यांनी नी वीज प्रकल्पाकरिता वर्धा नदीच्या पात्रात विहीर खोदल्यामुळे आजूबाजूच्या गावातील विहिरीवर झालेला परिणाम

**मु.शी.**: धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर यांनी वीज प्रकल्पाकरिता वर्धा नदीच्या पात्रात विहीर खोदल्यामुळे आजूबाजूच्या गावातील विहिरीवर झालेला परिणाम याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. विनोद तावडे, डॉ. रणजित पाटील, श्री. जैनुद्दीन जव्हेरी,प्रा. सुरेश नवले,सर्वश्री अशोक उर्फ भाई जगताप, एस.क्यू.जमा, सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"चंद्रपूर शहरातील महाराष्ट्र राज्य औद्योगिक महामंडळाच्या जागेत धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर यांनी वीज प्रकल्पाला पाण्याची व्यवस्था करीत असतांना वर्धा नदीच्या पात्राच्या मध्यभागी भूभागापासून 30 मिटर उभारलेली विहीर, त्यातच 10 मिटर भुगर्भातील पाणी उचलण्याची योजना, ह्या प्रकल्पाला लागणारे 19.27 द.ल.घ.मि.पाणी 14 ते 15 किलो मिटर नेण्याची होणारी सोय, भुगर्भातील पाणी उचलण्यामुळे आजूबाजूच्या गावातील विहिरीवर होणारा परिणाम, भविष्यात पिण्याच्या पाण्याचे होणारे दुर्भिक्ष, शासनाचे ह्याकडे होत असलेले दुर्लक्ष, नदीच्या वाहत्या प्रवाहाच्या पाण्याची परवानगी असतांना भूगर्भातील पाण्याचा होणारा गैरकायदेशीर वापर, ह्यामुळे जनतेत पसरलेला असंतोष, शासनाने ह्यावर तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

श्री.सुनील तटकरे (जलसंपदा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, विदर्भात प्रकल्प होत नाही म्हणून आम्ही सदैव ओरडत असतो. आमच्या कुठल्याही धरणातील पाणी अडविण्याची ताकद जलसंपदा विभागात नाही. उद्योजकांना पाणी देताना मात्र कुठलाही विचार न करता पाणी दिले जाते. धारीवाल प्रकल्पासंबंधी उत्तर देताना सांगितले की, केंद्रीय पर्यावरण विभागाने परवानगी दिल्यामुळे त्या अनुषंगाने आम्ही परवानगी दिली. येथे उत्तर देताना सांगितले की, गावाच्या सीमेपासून 500 मीटर अंतरावर विहीर खोदली. हे चुकीचे आहे. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, ती बाऊण्ड्री कुठून मोजली आहे. पटवारी नोंदी नुसार नदीची बॉर्डर ही गावाची बाऊण्ड्री असते. तेथून 500 मीटरवर ती विहीर नाही, अशा प्रकारचे माझे स्पष्ट मत आहे. कारण मी त्याची पाहणी केली आहे. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, शासनाने बाऊण्ड्री कुठून मोजली आहे ? केंद्रीय पर्यावरण विभागाने स्टँड बाय रेडियल वेल असावी असे म्हटले आहे. ज्यावेळी पाणी कुठूनच मिळणार नाही त्यावेळी त्याचा वापर करावा असे त्या पत्रात म्हटले आहे. ते पत्र माझ्याकडे आहे. असे असताना सुद्धा शासनाने रेडियल वेल बांधण्यास परवानगी दिली. केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाच्या म्हणण्यानुसार परवानगी दिली असे शासनाचे म्हणणे आहे. आपण पहिल्यांदा बॅरेज बांधायला परवानगी दिली होती. ते बॅरेज आपण केव्हा बांधणार आहात ? रेडियल वेलचा वापर हा कंपनीसाठी नाही. अतिशय अडचणीच्या वेळी त्याचा वापर करावा असे केंद्रीय पर्यावरण विभागाने स्पष्ट कळविले आहे. आपण अजून बॅरेज बांधलेले नसताना रेडियल वेलला परवानगी का दिलेली आहे ? असे माझे प्रश्न आहेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या विषयावर विस्तृतपणे सांगावयाचे झाले तर राज्य शासनाने विद्युत निर्मिती क्षेत्रात खाजगी गुंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी दिनांक 28 मार्च 2005 रोजी धोरण जाहीर केले होते. या धोरणाच्या अनुषंगाने मे.धारीवाल इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या तडाळी येथील औद्योगिक इस्टेट मध्ये ऊर्जा निर्मिती प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव दिला होता. त्यास राज्य शासनाने दिनांक 27 मार्च 2007 रोजी हमी दिली होती. त्यानुसार प्रकल्पासाठी लागणाऱ्या पायाभूत बाबीसाठी जसे रस्ते, पाणी उपलब्धता,

..4



श्री.सुनील तटकरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

इंधन उपलब्धता, विद्युत निष्कासन या बाबीसाठी सहकार्य करण्याची तयारी शासनाने दर्शविली होती. या प्रकल्पासाठी पाणी लागणार होते.  त्यामुळे जलसंपदा विभागाने दरवर्षी 19.27 द.ल.घ.मि.पाणी वर्धा नदीतून उचलण्यास 1.6.2006 रोजी परवानगी दिली. प्रवर्तकाने बॅरेज बांधण्याची परवानगी मागितली होती. परंतु, सरकारने ती परवानगी नाकारली होती. कारण त्या भोवताली आणखी दुसरे प्रकल्प होते.  त्यांनी देखील बॅरेज बांधण्याची परवानगी मागितली होती. तेव्हा राज्य सरकारने आपणच बॅरेज बांधण्याचे ठरविले. त्यातून इतर प्रकल्पांना पाणी उपलब्ध करून देण्याची आपली भूमिका होती. गावाच्या हद्दीपासून 500 मीटर अंतरावर रेडियल वेल बांधण्याची अट आहे. नदीपासून 500 मीटर अंतरावर असे नाही. केंद्रीय पर्यावरण विभागाने गावाच्या हद्दीपासून 500 मीटर अंतरावर अशी परवानगी दिलेली आहे. त्यामुळे गावापासून 500 मीटर अंतरावर रेडियल वेल बांधली आहे याची आम्ही खातरजमा करून घेतली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा मंत्रिमहोदयांच्या उत्तरालाच आक्षेप आहे. मी पटवारी, तहसीलदार यांना विचारले आहे की बाऊण्ड्री कुठून सुरू होते. त्यांनी मला नकाशा दिलेला आहे. गावाची बाऊण्ड्री ही शेतीसहित मोजली जाते. ज्यावेळी शेती विकत घेतो त्यावेळी दस्तऐवजावर गावाचे नाव असते. त्यामुळे ती वेल गावाच्या बाहेर दाखविणार आहात काय ? गावाची बाऊण्ड्री ही नदीपासून सुरूवात होते, असे स्पष्ट मत पटवारी आणि तहसीलदार यांनी मला दिले आहे. हा महसूल खात्याचाच प्रश्न आहे. त्यामुळे महसूल विभागाने ठरविलेले बाऊण्ड्री ही बरोबर राहणार आहे. आपण नदीपासून 500 मीटरची बाऊण्ड्री दाखवावी.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, केंद्रीय पर्यावरण विभागाने गावापासून म्हणजेच गावठाणापासून 500 मीटर अंतरावर रेडीयल वेल बांधण्याची अट घातलेली आहे.  त्यानुसार रेडीयल वेल बांधण्यात आलेली आहे.

यानंतर श्री.देवदत्त....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, पावर सेक्टर को बढ़ावा देने के लिए सरकार ने पावर हाऊस निजी कंपनी को दिया है और कंपनी ने वहां पर रेडियल वेल बनाया है. माननीय मंत्री जी से मेरे दो प्रश्न हैं एक प्रश्न यह है कि वहां पर जो विवाद है वह गांव की बाउंडरी से संबंधित है. क्योंकि जितना डीप यह रेडियल वेल बना रहे हैं उसकी वजह से गांव का वाटर लेवल बहुत नीचे चला जाएगा और खती की बात तो जाने दीजिए, किसी भी किसान को वहां पर पीने का पानी भी नहीं मिलेगा. इस संबंध में यदि पर्यावरण मंत्रालय ने परमीशन दी है तो वह उचित नहीं है. इसलिए मुझे पूछना है कि क्या मंत्री महोदय पक्की जानकारी बताएंगे कि उसकी बाउंडरी कहां से होगी तथा क्या उन्होंने उसी हिसाब से रेडियल वेल वहां पर बनाया है या नहीं ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि मंत्री महोदय ने उर्जा क्षेत्र को बढावा देने के लिए 28 मार्च 2005 की उर्जा नीति की बात यहां पर कही. मेरा कहना है कि महाराष्ट्र सरकार ने पानी वितरण की प्रायर्टी अब बदल दी हैं पहले यह प्रायर्टी औद्योगिक क्षेत्र के लिए थी. लेकिन अब यह प्रायर्टी पीने के पानी और खेती के लिए कर दी है. इस तरह की नीति इसी हाऊस में पास की गयी है. इसलिए इस नीति के अंतर्गत इस कंपनी को अब पानी का कोई अल्टरनेट सोर्स देखने का आदेश महाराष्ट्र सरकार देगी, ताकि वाटर लेवल नीचे न जाने पाये और गांव के लोगों को पीने के पानी और खेती के लिए पानी की कमी न होने पाये ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, गावठाणापासून 500 मीटरची लांबी मोजता येईल. याचे कारण आजूबाजूला दुसरी गावे असू शकतात. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, शासनाने आता जलनीती बदलली आहे. जलनीती आता बदलली असल्यामुळे तिला पूर्वलक्षी प्रभावाने मान्यता दिलेली नाही. या प्रकल्पाला फार पूर्वी मान्यता दिलेली असल्यामुळे आपण नवीन कायद्यामध्ये केलेला बदल या प्रस्तावाला लागू होणार आहे.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्ह्यात अनेक इलेक्ट्रिकचे उद्योग येत आहेत. या जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न असो,विजेचा प्रश्न असो, प्रदूषणचा प्रश्न असो किंवा सिंचनाचा प्रश्न असो या बाबत शासनाचे एकच उत्तर असते की, आम्हाला विजेची आवश्यकता आहे. राज्यामध्ये नवीन उद्योग येण्यासाठी आपल्याला त्यांना प्रोत्साहन देण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, पूर्वी हा धारीवालचा प्रकल्प होता त्यासाठी त्यांनी शासनाकडून एनओसी घेतली होती. आता या प्रकल्पाचे खरे मालक कोण आहेत? माझ्या माहितीप्रमाणे धारीवालने 1500 कोटी रुपयांना तो प्रकल्प विकला आहे. आम्ही जिल्हाधिकाऱ्यांकडे किंवा तहसीलदारांकडे कोणतेही काम घेऊन जातो त्यावेळी गावच्या पटवाऱ्याकडील नकाशानुसार दाखविली जाणारी हद्द हीच गावची हद्द गृहीत धरली जाते. मंत्री महोदयांनी आता उत्तरामध्ये सांगितले की, गावठाणापासून 500 मीटरपर्यन्त गावची हद्द असते. याचा अर्थ या कामासाठी शासनाने गावची हद्द बदलली आहे काय? चंद्रपूर जिल्ह्यामध्ये पुढील 10-15 वर्षामध्ये पिण्याच्या पाण्याचाच नव्हेतर, सिंचनासाठी लागणाऱ्या पाण्याचाही प्रश्न निर्माण होणार आहे. त्या जिल्ह्यामध्ये प्रदूषणाचा प्रश्न आहे त्याचबरोबर पाण्याचाही प्रश्न आहे.

माझ्या मतदारसंघामध्ये जिल्हा परिषद, ग्रामपंचायतीचे क्षेत्र असून अनेक गावांमध्ये पाण्याच टंचाई आहे. नदीच्या पात्राकरिता 10 मीटरची अट घालण्यात आली आहे.10 मीटरमध्ये म्हणजे 35 फूटापर्यन्त पाणी मिळत नाही. कमीत कमी 50 फूट खोल इन्टेक विहीर खोदल्यानंतर पाणी मिळते. आपण 150 फूट खोल खोदकाम केल्यास आजूबाजूच्या गावातील विहिरींसाठी असलेले झरे पूर्णपणे बंद पडणार आहेत. नदीच्या पात्रामध्ये ही विहीर बांधली जाणार असल्यामुळे झऱ्याचे सर्व पाणी त्या विहिरीमध्ये येणार आहे. त्या विहिरीमधून फॅक्टरीवाले पाणी घेऊन जाणार आहेत. गावातील लोकांना आजूबाजूच्या 15 ते 20 कि.मी. च्या परिसरात पाणी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी.....

मिळणार नाही. मी अनेक वेळा खनिज विभागाशी संबंधित प्रश्न विचारतो.त्या ठिकाणी कोल बेअरींगमध्ये 500 मीटरची अट घालण्यात आली आहे. या सर्व बाबींची चौकशी करण्यासाठी एक तज्ज्ञ समिती नियुक्त करण्यात यावी. या जिल्ह्यात नवीन उद्योग लायसन्स घेऊन येतात व नंतर दुसऱ्यांना विकून मोकळे होतात. आपण या उद्योगांना प्रोत्साहन दिल्यास यापुढील काळात चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण भागामध्ये पिण्याचे पाणी मिळणार नाही. त्याकरिता तज्ज्ञांची चौकशी समिती नेमणार काय आणि 500 मीटरची अट घालण्यात आली आहे त्याबाबत आपण कोणती भूमिका स्वीकारणार आहात?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, मी मघापासून सांगत आहे की, गावामध्ये ज्या ठिकाणी आज लोकसंख्या वसलेली आहे तिथून 500 मीटर अंतरावर हद्द ठरविण्यात आली आहे. केंद्रीय पर्यावरण विभागाने दिलेल्या परवानगीनुसार 500 मीटरची मोजणी करुनच आपण त्यांना परवानगी दिलेली आहे. माननीय सदस्यांन विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाबाबतची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही, ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. सभापती महोदय, मी घेतलेल्या माहितीनुसार त्या नदीचे पात्र 200 मीटर रुंद आहे, 60 ते 70 मीटर अंतरावर ही रेडीयल विहीर खोदण्यास परवानगी दिली आहे तिच्या उजव्या बाजूला पावसाळयात पाण्याचा प्रवाह वहात असतो. परंतु उन्हाळयाच्या दिवसात या नदीमधून वाहणारा पाण्याचा प्रवाह रेडीयल विहिरीपासून बऱ्याच अंतरावर आहे. त्यामुळे ही विहीर पाण्यामध्ये बांधण्यात आलेली नाही. या बाबतीत सर्व तांत्रिक गोष्टींची खबरदारी घेण्यात आलेली आहे. माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, या विहिरीचे खोदकाम केल्यानंतर गावातील विहिरींच्या झऱ्याचे पाणी या विहिरीमध्ये येईल. या विहिरीकरिता जवळपास 2 मीटर उंचीचे पूर्णपणे कॉंक्रिट केले जाणार आहे. वाळूमधून झिरपणारे जेवढे पाणी आहे तेवढेच या विहिरीमध्ये येणार आहे. अजून पाणी उपसण्याची सुरुवात झाली नसून 2012 मध्ये ते पाणी उपसण्यास सुरुवात होईल. यापूर्वी जवळपास 40ते 50 वर्षापूर्वी तेथील एका पेपर मिलला परवानगी देण्यात आली होती. त्यामुळे भू गर्भामधील पाणी कुठेही कमी झालेले आढळले नाही. तरीसुध्दा या बाबतीत निरीक्षण करण्याच्या दृष्टीने योग्य ती तांत्रिक बाजू आम्ही उपलब्ध करुन ठेवू.

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, या प्रोजेक्टचे मालक कोण आहेत? या विहिरीचा तेथील गावकऱ्यांना त्रास होणार नाही यासाठी आपण एक तज्ज्ञ समिती नियुक्त करणार काय?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकल्पाचा मालक कोण हा प्रश्न नाही. हा प्रश्न या प्रकल्पाबाबत आहे. आपण लक्षवेधी सूचना काळजीपूर्वक वाचली तर कोणत्या मालकाला आपण परवानगी दिली आहे असे त्यात विचारण्यात आलेले नाही. या प्रकल्पासाठी रेडीयल विहिरीची परवानगी देण्यात आली आहे हाच मुख्य उद्देश यामध्ये आहे. त्याबाबतची तांत्रिक माहिती मी आपणासमोर ठेवली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, त्या ठिकाणी धारीवालने प्लॉट नं. 48आणि प्लॉट नं. 540 असे दोन प्लॉट विकत घेतले आहेत. हे प्लॉट धानोरा या गावाच्या माध्यमातून घेण्यात आले आहेत. तिथपासून नदीच्या आतमध्ये त्यांनी बांधकाम केले आहे. जर त्यांनी धानोरा गावामधून दोन प्लॉट विकत घेतले असतील तर तुम्ही हद्द कशी ठरविणार आहात? त्यांनी ते दोन प्लॉट खरेदी करुन अगदी नदीच्या मध्यभागी ही विहीर बांधलेली आहे. याबाबत मी धारीवाल यांच्याशी, त्यांच्या कंपनीच्या अधिकाऱ्यांशी आणि त्या कॉट्रॅक्टरशी बोलले आहे. त्यांनी मला असे सांगितले की, भू गर्भामध्ये दगड लागला तिथपासून वर 14 मीटर वाढविले आहे, अजून 28 मीटर जाणार आहोत त्यामध्ये 3 मीटर आणखी खाली जाणार आहोत. खाली 3 मीटर जाऊन रेडीयल वेल बांधून त्या ठिकाणी 15 पाईप वाकडे टाकण्यात येणार आहेत. त्या पाईपची लांबी 100मीटर राहणार आहे. असे 100 मीटर लांबीचे 15 पाईप जमिनीमध्ये साडे तीन मीटर आत टाकल्यानंतर गावातील पाणी संपणार नाही असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही. आज उन्हाळयात गावातील पाण्याची पातळी अतिशय कमी होते. हा धारीवाल अतिशय हुशार असून त्याने डोहात विहीर बांधली आहे. त्यामुळे अंडरग्राऊंड असलेले सर्व पाणी हा खेचून घेणार आहे.

माझ्याकडे एक पत्र देण्यात आले आहे . मी त्यांना विचारले होते की, हे पाणी कशापध्दतीने आणले जाणार आहे त्यावेळी त्यांनी जलप्रवाहातून पाणी आणले जाणार आहे असे म्हटले आहे. माहितीच्या अधिकारामध्ये मला मिळालेल्या माहितीनुसार पहिल्या पत्रामध्ये त्यांनी नदीच्या पात्रामधून पाणी आणले जाणार असल्याचे म्हटले आहे. मी आपल्याला माझ्याकडील कोणतीही माहिती देत नाही. आपण पहिल्या पत्रामध्ये जल प्रवाहातून असे म्हटल्यानंतर ही रेडीयल वेल कोठून आली? हा सुध्दा एक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा की, ज्यावेळी एखादे काम नदीमध्ये सुरु केले जाते त्यावेळी खनिकर्म विभागाला विचारले जाते. त्या विभागाकडे परवानगी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्रीमती शोभा फडणवीस...

मागितली गेली त्याबाबत त्या विभागाकडून मला असे समजले की, ज्या कामासाठी त्यांनी आमच्याकडे जागा मागितली त्या जागेचा सर्व्हे केल्यानंतर व त्या जागेमधून किती खनिज संपत्ती निघू शकते याची माहिती घेतल्यानंतर

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस . . . .

आता त्यांनी विहीर बांधली आहे, ती त्या जागेवर नाही तर अडीच मीटर मागे आहे अशा प्रकारचे उत्तर मला माहितीच्या अधिकाराअंतर्गत विज्ञान खनिकर्म विभागाने दिलेले आहे. त्यामुळे आता घोळ निर्माण झालेला आहे म्हणजे एका ठिकाणी जागा दाखविण्यात आली आणि दुसऱ्या जागेचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले आणि त्यांनी स्वत:च्या सोयीसाठी धानोरा येथे विहीर न बांधता तिसऱ्याच ठिकाणी बांधलेली आहे.जर त्यांनी 48/570 च्या समोर विहीर बांधली असेल तर धानोरा गावाची हद्द दुसरी कशी धरण्यात येत आहे ? हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच या सगळयामध्ये काहीतरी घोळ आहे असे माझे म्हणणे आहे मी यासंबंधातील कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांकडे पाठवू इच्छिते.

सभापती महोदय, येथे एखादी कंपनी यावी, विद्युत प्रकल्प झाले पाहिजेत आणि ते विदर्भाच्या मूळावर यावयास पाहिजेत असे तुम्हा सर्वांचेच मत आहे.परंतु येथील शेतकरीही मेला पाहिजे असेही तुमचे मत आहे काय? आम्ही शासनाकडे जलसंपदेच्या संदर्भातील प्रकल्पांबाबत मागणी करीत आहोत पण ते मिळू शकत नाही. परंतु 10 हजार मे.वॅ.वीज तयार झाली पाहिजे म्हणून 13 प्रकल्पांना परवानगी दिलेली आहे. अशा वेळी जे चुकीचे काम होत आहे ते आम्ही आपल्या निदर्शनास आणत आहोत आणि त्याकडे जर लक्ष देणार नसाल तर मग या विदर्भाला मारावयाचेच ठरविलेले आहे काय असाही माझा प्रश्न आहे. म्हणून माझे स्पष्ट म्हणणे आहे की, याबाबतीत फेर चौकशी करावी आणि तोपर्यंत संबंधितांना तेथे काम करण्यास परवानगी देऊ नये आणि तुमच्या म्हणण्याप्रमाणे जे असेल त्यानुसार किंवा आम्ही जी कागदपत्रे सादर केलेली आहेत त्याचा सर्व विचार करुन स्पॉट इन्स्पेक्शन करण्यात यावे.तसेच त्या ठिकाणी विहीर खोदण्याचे काम करताना ती साडेतीन मीटर खाली खोदली जाणार आहे की एक मीटर खाली जाणार आहे हे याठिकाणी बसून सांगता येणार नाही.याबाबतीत कोणीही चौकशी केली नाही, तसेच कोणीही तेथे जाऊन तो स्पॉट पाहिलेला नाही. परंतु ते त्याठिकाणी मनमानी काम करीत आहेत. त्याठिकाणी मध्यभागी विहीर बांधलेली आहे आणि तेथील जी बॉर्डर आहे, त्यावर जवळजवळ 14 मीटर काम केलेले आहे आणि अजून 14 मीटर नेणार आहेत. त्यामुळे हा भाग साडेतीन मीटर खाली जाणार असल्याने याची पूर्णपणे चौकशी झाल्याशिवाय हे काम करण्यात येऊ नये असे माझे म्हणणे आहे. त्यामुळे आपण या कामाला स्थगिती देऊन त्याची पूर्ण चौकशी करावी अशी माझी आपल्याला विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. त्यानंतर आमच्या मुख्य अभियंता यांनी जागेवर जाऊन समक्ष पहाणी केलेली आहे. तरीसुध्दा याठिकाणी सन्माननीय सदस्या जे सांगत आहेत, त्याप्रमाणे काही तांत्रिक बाजू किंवा नेमकी जागा तसेच त्यांना जी परवानगी दिलेली आहे, ती जागा यासंदर्भात कार्यकारी संचालक हे दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या समवेत जाऊन पहाणी करतील. मी देखील तांत्रिकदृष्ट्या अभ्यासलेले आहे, पाहिलेले आहे की, यामुळे भूगर्भातील पाण्याच्या पातळीवर काहीही परिणाम होणार नाही. पण तरीसुध्दा येत्या तीन-चार दिवसामध्ये जेव्हा वेळ उपलब्ध असेल, तेव्हा सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, सन्माननीय सदस्य श्री.जैनुद्दीनजी जव्हेरी यांच्या समवेत कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता, अधिक्षक अभियंता यांना त्या जागेची समक्ष पहाणी करण्याबाबत सांगण्यात येईल.याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे-जे तांत्रिक मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याचा निराकरण साईटवरच केले जाईल आणि त्यासंबंधातील अहवाल आल्यानंतर पुढील उचित कारवाई केली जाईल.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, तोपर्यंत सदरहू काम थांबविण्यात यावे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

**उप सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी या कामाची येत्या चार दिवसामध्ये पहाणी करु असे सांगितल्यानंतर मला असे वाटते की, .....

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मग चार दिवस तेथील काम थांबवावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी परवानगी एका ठिकाणी आणि काम दुसरीकडे आणि हे सगळे तिसरीकडेच चालले आहे असा प्रकार सुरु आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी याबाबतची सर्व कागदपत्रे माननीय मंत्री महोदयांना दिलेली आहेत. मग चार दिवस हे काम थांबवावे. चार दिवस काम थांबल्यामुळे काही फरक पडणार नाही. त्यामुळे शासनाने या सदनाला सन्मानित करावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण याठिकाणी असे सांगत आहात. पण एकतर सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याकडे जी कागदपत्रे आहेत, त्याची देखील पहाणी करणे आवश्यक आहे.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, त्याची पहाणी करावी.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय,मी तेच म्हटले की, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा ताई फडणवीस यांनी कागद असे दिलेले नाहीत......

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, मी हे कागद माहितीच्या अधिकारामध्ये घेतलेले आहेत, माझ्याजवळचे नाहीत. त्यामुळे तुमच्याकडूनच घेतलेले हे कागद असून ते मी आता तुम्हालाच दाखवत आहे. म्हणून आता तुम्ही जर आमच्यासहित चौकशी करावयाची ठरविली आहे तरी सुध्दा चार दिवसासाठी काही फरक पडणार नाही, नाहीतरी दोन वर्षानंतर पाणी येणार आहे. आम्हाला माहिती आहे की, तुम्ही तोपर्यंत तेथे पराती बांधणार नाही, तुम्ही केवळ आमची फसवणूक करीत आहात. म्हणून तोपर्यंत तेथील काम बंद करण्यास काय अडचण आहे म्हणजे केवळ उद्योजकांना सांभाळावयाचे आणि शेतकऱ्यांना मारावयाचे हे कोणते धोरण आहे? आम्ही तुम्हाला यासंबंधातील सर्व कागदपत्रे आणून दाखवितो, मग माननीय मंत्री महोदयांनी याबाबत निर्णय घ्यावा. चार दिवसांनी काय फरक पडणार आहे.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, आमची काहीतरी इज्जत राहू द्यावी.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, इज्जत ठेवण्यासाठीच मी सांगू इच्छितो की, आपण चार दिवस कामाची पहाणी करेपर्यंत थांबावे.

**उप सभापती** : आता सर्वप्रथम विनियोजन विधेयके चर्चेला घेण्यात येईल आणि त्यानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

. . . .ओ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: महाराष्ट्र विनियोजन (तृतीय पुरवणी) विधेयक

**L. A. BIL NO. LVI OF 2011**

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2012.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 56 - दिनांक 31 मार्च 2012 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापार करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

. . . .ओ-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ.शी.**: महाराष्ट्र विनियोजन (अधिक खर्च) विधेयक

**मु.शी.**: **L. A. BILL NO. LVII OF 2011**

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2003, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 57 - दिनांक 31 मार्च 2003 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षा तील विवक्षित सेवांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून त्या वर्षात त्या विवक्षित सेवांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोगास अधिकृत मंजुरी देण्याकरिता तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी,परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही,अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

-----

. . . . ओ-6



**पृ.शी.**: महाराष्ट्र विनियोजन (व्दितीय अधिक खर्च) विधेयक

**L. A. BILL NO. LVIII OF 2011**

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2004, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक 58 - दिनांक 31 मार्च 2004 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित सेवांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून त्या वर्षात त्या विवक्षित सेवांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोगास अधिकृत मंजुरी देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो, शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

. . . .ओ-7



**पृ.शी.**: महाराष्ट्र विनियोजन (तृतीय अधिक खर्च) विधेयक

**L. A. BILL NO. LIX OF 2011**

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2005, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

श्री.अजित पवार (वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक - 59 दिनांक 31 मार्च 2005 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित सेवांसाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून त्या वर्षात त्या विवक्षित सेवांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोगास अधिकृत मंजुरी देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

----

ओ-8



**पृ.शी.**: महाराष्ट्र विनियोजन (चतुर्थ अधिक खर्च) विधेयक

**L. A. BILL NO. LX OF 2011**

(A BILL TO PROVIDE FOR THE AUTHORISATION OF APPROPRIATION OF MONEYS OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE TO MEET THE AMOUNTS SPENT ON CERTAIN SERVICES DURING THE FINANCIAL YEAR ENDED ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2006, IN EXCESS OF THE AMOUNTS GRANTED FOR THOSE SERVICES AND FOR THAT YEAR.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 60 - दिनांक 31 मार्च 2006 रोजी संपलेल्या वित्तीय वर्षातील विवक्षित सेवासाठी व त्या वर्षासाठी मंजूर करण्यात आलेल्या रकमांहून त्या वर्षात त्या विवक्षित सेवांवर ज्या अधिक रकमा खर्च करण्यात आल्या, तो खर्च भागविण्यासाठी राज्याच्या एकत्रित निधीतून केलेल्या पैशांच्या विनियोगास अधिकृत मंजुरी देण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडशः सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक या प्रमाणे विचारात घेण्यात आले, त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

**उप सभापती** : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशींसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर कु.थोरात . . . .

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक.

**L. C. BILL NO. XIV OF 2011**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA MUNICIPAL COUNCILS, NAGAR PANCHAYATS AND INDUSTRIAL TOWNSHIPS ACT, 1965.)

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2011 चे विधान परिषद क्रमांक 14 महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, 1965 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 14 मांडतो.

**उप सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--- -

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**औचित्याचा मुद्दा**

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, विक्रोळी येथे 14 एकरच्या शासकीय प्लॉटवर गेल्या आठवडयामध्ये महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी ॲक्शन घेतली ती बरोबर होती. परंतु विक्रोळी पोलीस स्टेशनचा काही संबंध नसताना तेथे फक्त बंदोबस्तावर आलेल्या श्री. विलास मराठे यांनी ऑर्डर दिली आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर सस्पेंड होण्याची वेळ आली. ते मोठे अधिकारी आहेत. त्यांना न्याय देत असताना विक्रोळी पोलीस स्टेशन येथे पंधरा दिवसांपूर्वी आलेले पोलीस इन्स्पेक्टर श्री. रवींद्र गावकर, श्री. दिलीप थोरात, श्री. सोपान काकड आणि श्री. आढाव यांच्यावर कारवाई झालेली आहे. सभापती महोदय, मी या ठिकाणी विनंती करते की, ज्यांनी आदेश दिले त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी आणि या निरपराध माणसांना न्याय देऊन त्यांची पुन्हा त्यांच्या जागेवर नियुक्ती करण्यात यावी.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी या ठिकाणी औचित्याच्या मुद्याद्वारे जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यातील विषय माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना माहीत आहे. एक गोष्ट खरी आहे की, या ठिकाणी ज्यांच्यावर पोलीस कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे ती कारवाई अद्याप केलेली आहे की नाही याची मला कल्पना नाही. परंतु या प्रकरणाच्या संदर्भात मी साद्यंत माहिती घेतल्यानंतर मला जो प्रकार माहीत झालेला आहे तो मी या ठिकाणी सदनाच्या माहिती करिता सांगतो.

या विक्रोळी पोलीस स्टेशनचे सिनिअर इन्स्पेक्टर श्री. गावकर तसेच त्यांचे सहकारी यांची नावे सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सांगितलेली आहेत ते हा प्रकार झाल्यानंतर घटनास्थळी आले. श्री. विलास मराठे, सहाय्यक पोलीस कमिशनर यांच्याकडे भांडूप पोलीस स्टेशनचा चार्ज आहे. परंतु या घटनेच्या वेळी त्या ठिकाणी स्थानिक नेमणूक करण्यात आलेले ए.सी.पी. रजेवर असल्यामुळे त्या ठिकाणी महिला सहाय्यक पोलीस आयुक्त आल्या होत्या. त्यांना त्या ठिकाणी फक्त मदतीसाठी बोलावण्यात आले होते. हा सगळा प्रकार घडत असताना कलेक्टर आणि उप

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ....

जिल्हाधिकाऱ्यांवर श्री. विलास मराठे नावाच्या पोलीस अधिकाऱ्याने गुन्हा दाखल करण्यास सांगितले. हे सांगत असताना श्री. विलास मराठे त्यांना हेही सांगण्यास विसरले नाहीत की," श्री. रणजित शर्मा यांना मी तुरुंगात टाकले तर तू यांची कशासाठी काळजी करतोस?" वास्तविक पहाता शासनाने नेमून दिलेले कर्तव्य बजावत असताना जर शासकीय अधिकाऱ्यांना अशा प्रकारे आरोपी करण्यात आले तर या पुढे कुठलाही वरिष्ठ अधिकारी अशा प्रकारचे काम करण्यास धजावणार नाही. त्यामुळे मला असे वाटते की, शासनाने या बाबतीत तातडीने हस्तक्षेप करावा. कर्तव्य बजावत असलेल्या अधिकाऱ्यांवर कारण नसताना कारवाई होत असेल तर ते योग्य नाही. मी फक्त जिल्हाधिकारी आणि उप जिल्हाधिकाऱ्यांबद्दल बोलत नाही. चोर सोडून सन्याशाला फाशी देणे असा प्रकार त्या ठिकाणी होऊ नये म्हणून या अधिकाऱ्यांना ही कारवाई ज्यांनी करावयास लावली आहे, या बाबतीत तातडीने माहिती मागवून त्या अधिकाऱ्यांचे निलंबन किंवा आणखी कुठली कारवाई होणार असेल तर ती करण्यात यावी. जे जबाबदार आहेत त्यांना शासन करण्या ऐवजी निरपराध्यांना शासन होऊ नये एवढीच या मागची अपेक्षा आहे. मला असे वाटते की, हे प्रकरण तातडीने मागवून घेण्यात यावे आणि तोपर्यंत घाईगडबडीने काही कारवाई केली जाणार असेल तर ती कृपया थांबविण्यात यावी.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, आपण या ठिकाणी जे सुचविलेले आहे त्याच्या खोलामध्ये जाऊन शासनाने माहिती घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण जी माहिती दिलेली आहे तशाच पध्दतीची माहिती शासनाकडे आलेली आहे. त्यामुळे राज्य सरकार फार गंभीरतेने या सगळया प्रकारची नोंद घेईल आणि ज्यांनी कोणी सरकारचे कामकाज करीत असताना कारण नसताना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर, जिल्हाधिकाऱ्यांवर आणि प्रांत अधिकाऱ्यावर कारवाई करण्याचा किंवा एफआयआर दाखल करण्याचा प्रयत्न केलेला आहे त्या चुकीच्या वागणाऱ्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई केली जाईल.

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 1.36 ते 2.15 मध्यंतर )

---

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**विशेष उल्लेख**

**पृ. शी.** : नागपूर शहरातील कोहिनूर मतिमंद मुला-मुलींच्या शाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांकडून संस्थाचालकांनी पैशाची मागणी करुन मानसिक त्रास देणे

**मु. शी.** : नागपूर शहरातील कोहिनूर मतिमंद मुला-मुलींच्या शाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांकडून संस्थाचालकांनी पैशाची मागणी करुन मानसिक त्रास देणे याबाबत श्री. नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. नागो पुंडलिक गाणार यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"नागपूर शहरातील काहिनूर मतिमंद मुला-मुलींच्या शाळेतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना संस्था चालकाकडून पैशाची मागणी करण्यात येणे, या शाळेतील शिक्षकांना मानसिक त्रास देणे, त्यांना नोकरीतून काढून टाकण्याच्या धमक्या देण्यात येणे, या प्रकरणी माननीय आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे व समाजकल्याण अधिकारी नागपूर यांचेकडे तक्रारी देऊनही त्याकडे त्यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असणे, त्यांना अद्याप न्याय न मिळणे, याकडे शासनाचे झालेल अक्षम्य दुर्लक्ष व तातडीने करावयाची कार्यवाही."

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : पनवेल शहरातील वाढती वाहतूक समस्या

**मु. शी.** : पनवेल शहरातील वाढती वाहतूक समस्या याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"ऐतिहासिक शहर म्हणून ख्याती असलेले पनवेल (जि.रायगड) शहर झपाट्याने बदलत आहे. प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ, सेझ, जे.एन.पी.टी. व तिच्या अनेक कंपन्या या प्रकल्पांमुळे येथील गुंतवणूक वाढत आहे. सिडकोने विकसित केलेले खारघर, कामोठे, नवीन पनवेल व कळंबोलीचा परिसर नागरी वस्तीने भरुन गेला आहे. तेथे प्रत्येक घरात दुचाकी तसेच चारचाकी वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. त्यातच मुंबई-पुणे, मुंबई-गोवा, मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, पनवेल जे.एन.पी.टी. मार्ग असे महत्वाचे व वाहतुकीची घनता जास्त असणारे मार्ग पनवेल शहरातून जातात. यामुळे नवीन पनवेल परिसर सध्या वाहतूक समस्येने ग्रस्त आहे. त्यातच बेशिस्त वाहनचालक, विविध पक्षाच्या नेत्यांच्या विविध उपक्रमाचे होर्डींग्ज/कमानी यामुळे वाहनकोंडीमध्ये सातत्याने भरच पडत आहे आणि समस्या वाढतच आहे. सणासुदीच्या दिवसात म्हणजे नवरात्र, दिवाळी-दसरा या कालावधीमध्ये पनवेल शहरात व परिसरात साधी दुचाकी चालविणेही अवघड झालेले आहे. यावर उपाय म्हणून वाहतूक शाखेने याकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. वाहतूक पोलीस आणि वाहतूक चौक्या उपलब्ध करुन देण्याची गरज आहे. वाहतूक शाखेने प्रत्येक 100-125 फुटावर वाहतूक पोलीस तैनात करावेत. पनवेल शहरामध्ये होर्डींग्ज आणि कमानी इतक्या आहेत की ज्यामुळे वाहतुकीमध्ये अडथळा

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .....

यावयास लागलेला आहे. अपघात व्हावयास लागलेले आहेत. त्यामुळे विविध उपक्रमांचे होर्डींग्ज/कमानी उभारण्याबाबत पनवेल शहरात आचारसंहिता प्राधान्यक्रमाने लागू करावी म्हणून सदर बाब मी या विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात मांडत आह. त्याबाबत कार्यवाही व्हावी, ही विनंती."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : इतिहास संशोधक श्री. गजानन भास्कर मेहंदळे यांचा महाराष्ट्र शासनाकडून उचित गौरव करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : इतिहास संशोधक श्री. गजानन भास्कर मेहंदळे यांचा महाराष्ट्र शासनाकडून उचित गौरव करण्याची आवश्यकता याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

"शिवाजी : हिज लाईफ अँड टाईम्स" इतिहास संशोधक श्री. गजानन भास्कर मेहंदळे ह्यांच्या प्रदीर्घ संशोधनातून हा हजार पृष्ठांचा ग्रंथ लवकरच प्रकाशित होणार आहे. महाराजांच्या कार्यकर्तृत्वाचा सखोल अभ्यास ह्या ग्रंथात समाविष्ट झालेला आहे. अशा ह्या मौलिक कामगिरीबद्दल श्री. मेहंदळे ह्यांचे अभिनंदन करुन महाराष्ट्र शासनाने त्यांचा उचित गौरव करावा, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

सभापती महोदय, श्री. मेहंदळे यांनी शिवराय समजून घेताना या ग्रंथामध्ये जी मांडणी केलेली आहे त्याबाबत मला असे वाटते की, आजपर्यंत जी पुस्तके प्रकाशित झालेली आहेत त्यापेक्षा हा ग्रंथ अतिशय वेगळ्या स्वरुपाचा आहे आणि तो अतिशय महत्वाचा आहे. ही एक ऐतिहासिक कामगिरी आहे. म्हणून हा विषय आपण निश्चितपणे घ्यावा अशी मी विनंती करतो.

----



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजना लागू करण्याची आवश्यकता

**मु. शी.** : महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजना लागू करण्याची आवश्यकता याबाबत श्री.सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□य सदस्य श्री. सतीश चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. सतीश चव्हाण ( औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राज्यात, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजना लागू आहे परंतु ज्या ठिकाणी कनिष्ठ महाविद्यालय माध्यमिक शाळेशी संलग्न आहे त्यांच्या पाल्यांना योजनेचे फायदे आहेत तर जे कनिष्ठ महाविद्यालय वरिष्ठ महाविद्यालयास संलग्न आहे अशांच्या पाल्यांना ही सवलत लागू नाही. महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा पगार हा माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारापेक्षा कमी आहे. तेव्हा महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना मोफत शिक्षण योजना लागू करण्याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही."

----

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : अकोला महानगरपालिका क्षेत्रातील जठारपेठ येथील नझूल सिट नं. 75-सी, भूखंड क्र.03 येथील जमीन मालक श्री. जसपालसिंग नागरी यांनी हॉटलच्या बाजूला तीन मजली मंगल कार्यालयाचे केलेले अनधिकृत बांधकाम

**मु. शी.** : अकोला महानगरपालिका क्षेत्रातील जठारपेठ येथील नझूल सिट नं. 75-सी, भूखंड क्र.03 येथील जमीन मालक श्री. जसपालसिंग नागरी यांनी हॉटलच्या बाजूला तीन मजली मंगल कार्यालयाचे केलेले अनधिकृत बांधकाम याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"अकोला महानगरपालिका क्षेत्रातील जठारपेठ येथील नझूल सिट नं. 75-सी, भूखंड क्र. 03 येथील जमीन मालक श्री. जसपालसिंग नागरा यांनी हॉटेलच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेवर एका तीन मजली मंगल कार्यालयाचे अनधिकृरीत्या बांधकाम केले आहे. सदर अनधिकृत बांधकामाबाबत रहिवाशांकडून तक्रारी प्राप्त झाल्यावर महानगरपालिकेने सदर ठिकाणी 3857.27 चौ.मी. क्षेत्रफळाचे अनधिकृतरीत्या बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले, सदर जमीन मालकास मंजूर नकाशाप्रमाणे 2 एफएसआय दिला असता त्या ठिकाणी प्रत्यक्षात 6 एफएसआय म्हणजे जास्तीचा 4 एफएसआय जमीन मालकाने वापरलेला आहे. या संदर्भात अकोला महापालिका आयुक्त यांचेकडे तक्रार करुनही काहीही कारवाई झाली नाही. म्हणून मी दि. 11.12.2011 रोजी माननीय मुख्यमंत्री व माननीय नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे लेखी पत्रे देऊन तक्रारी केलेल्या आहेत. या भयानक प्रकरणी नवीन जमीन घोटाळा झाला असल्यामुळे शासनाने या संदर्भात संबंधित

..7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

जमीन मालकाविरुध्द तातडीने कारवाई करावी आणि या संदर्भात शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, मी हा जो विशेष उल्लेख मांडत आहे तो मांडण्यापूर्वी संबंधित खात्याचे प्रमुख म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते आणि त्या पत्राची प्रत सन्माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांना दिली होती. मी असे म्हटले होते की, मला ज्या माध्यमातून हा विषय मांडता येईल त्या माध्यमातून मांडीन. खरे म्हणजे मला पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळेलाच हा विषय मांडावयाचा होता परंतु त्यावेळी मांडू शकलो नाही. म्हणून मी हा विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे. मी आता जो विशेष उल्लेख मांडत आहे तो फार गंभीर आहे. यावर कारवाई सुरु झाली असेल असे मला वाटले होते आणि मी हा विषय मांडेपर्यंत त्या ठिकाणी बुलडोझर पोहोचलेला असेल असा माझा समज होता. मी आता माहिती घेतली. त्या बाबतीत काय झाले ते आता माननीय मंत्री महोदय सांगतीलच.

सभापती महोदय, अकोला महानगरपालिका क्षेत्रातील जठारपेठ येथील नझूल सिट नं.75-सी, भूखंड क्र. 03 येथील जमीन मालक श्री. जसपालसिंग नागरा यांनी हॉटेलच्या बाजूला असलेल्या मोकळ्या जागेवर एका तीन मजली उंच अशा मंगल कार्यालयाचे अनधिकृत बांधकाम केलेले आहे. सदर अनधिकृत बांधकामाबाबत रहिवाशांकडून तक्रारी प्राप्त झाल्यानंतर संपूर्ण इमारतीच्या संदर्भात दोन-तीन वर्षापूवी महानगरपालिकेने चौकशी केली. महानगरपालिकेने त्यासंदर्भात चौकशी केल्यानंतर संबंधित जमीन मालकाच्या बेकायदेशीर बांधकामाची जी माहिती दिली फार गंभीर होती. लग्नाचा मंडप हा आता 1 वर्षापूर्वी बांधलेला आहे परंतु गेल्या पंधरा वर्षापासून त्यांनी मंजूर बांधकामाच्या चारपट बेकायदेशीर बांधकाम त्या ठिकाणी बांधलेले आहे. सदरहू बांधकामामध्ये 3857.27 चौ.मी. अनधिकृत बांधकाम केलेले आहे. संबंधित जी कागदपत्रे आहेत ती माननीय मंत्री महोदयांकडे दिलेली आहेत. जो मंजूर नकाशा होता त्याप्रमाणे 2021.88 चौ.मी. बांधकाम त्यांना मंजूर केले होते. त्यामध्ये जो तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला आहे त्याप्रमाणे परवानगी होती. प्रत्यक्षात बांधकाम 6115 चौ.मी.

...8..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

इतके झालेले आहे. म्हणजे त्या इमारतीमध्ये अतिरिक्त बांधकाम 3857.27 चौ.मी. झालेले आहे. गेली दहा बारा वर्षे ते बांधकाम तसेच आहे. त्यांना महानगरपालिकेने जी नोटीस दिली त्यामध्ये असे म्हटले आहे की, मंजूर नकाशाप्रमाण् आपल्याला 2 चटईक्षेत्र निर्देशांक देण्यात आला होता. त्यांनी व्यापलेला निर्देशांक 6 आहे. म्हणजे आपण 4 चटईक्षेत्र निर्देशांक अतिरिक्त वापरलेला आहे. संबंधित महानगरपालिकेने हे बांधकाम तातडीने 7 दिवसात पाडावे अशी नोटीस दिली. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, 1949 च्या कलम 207 अन्वये 11.8.2009 साली नोटीस दिली. त्यामध्ये असे म्हटले आहे की, 7 दिवसात या अनधिकृत बांधकामाबाबत स्पष्टीकरण करावे अन्यथा महापालिका सदर अनधिकृत बांधकामाबाबत निष्कासनाची कारवाई करील. ही नोटीस 2009 साली दिली आणि आता 2011 साल संपत आले तरी काहीही कारवाई झालेली नाही. ते 7 दिवस कधीच संपून गेले.

त्यावेळचे अधिकारी अत्यंत हुशार होते. त्यांना असे वाटले की, आपण ही नोटीस दिल्यानंतर ते न्यायालयामध्ये जातील म्हणून त्यांनी त्यांच्या संबंधित कायदा खात्याला अगोदरच असे लिहून कळविले की, या संदर्भामध्ये सदर प्रकरणामध्ये अवैध बांधकाम पाडण्याच्या आदेशाविरुध्द स्थगनादेश मिळविण्याची शक्यता आहे. सदर परिस्थितीचा विचार करता जिल्हा न्यायालयामध्ये कॅव्हेट दाखल करणे योग्य होईल. कॅव्हेट दाखल करण्याच्या आदेशार्थ सादर अशा प्रकारचे त्यामध्ये म्हटले आहे. म्हणजे अशा प्रकारचे आदेश त्यावेळी दिले. एवढी काळजी घेतली होती. याचा अर्थ हे बांधकाम पाडले पाहिजे असा निर्धार असताना देखील ते पाडले गेलेले नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

एखाद दुसरी खोली बांधली तर आपण समजू शकतो. एखाद दुसरा मजला बांधला तरीही समजू शकतो. पण 2 चटई क्षेत्राची परवानगी असतानाही 6 चटई क्षेत्र बांधकाम करुन गेल्या 10 वर्षांपासून ते वापरत आहेत. त्याबाबत शासनाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही. नोटीस दिल्यानंतर सर्व थांबविले जाते. या संदर्भात शासनाने याबाबत तातडीने कारवाई करावी असे मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाच्या निदर्शनास आणतो. मंत्री महोदयांच्या निदर्शनास मी यापूर्वीच आणलेले आहे. पुन्हा एकदा सभागृहाच्या माध्यमातून ही बाब मी शासनाच्या निदर्शनास आणत आहे. मंत्री महोदयांकडून मला उत्तराची अपेक्षा आहे.

------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर परिसरात बॉम्बस्फोटाचा कट रचल्याचे उघडकीस येणे

**मु. शी.** :दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर परिसरात बॉम्बस्फोटाचा कट रचल्याचे उघडकीस येणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"पुण्यातील जर्मन बेकरी बॉम्ब स्फोटातील आरोपींकडून शहरातील दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर परिसरात बॉम्बस्फोट करण्याचा कट रचल्याचे नुकतेच माहे डिसेंबर, 2011 मध्ये उघडकीस येणे, सदर बॉम्बस्फोट प्रकरण केवळ एका फुल विक्रेत्याच्या सावधानतेमुळे टळलेला आहे असे असताना राज्यभरातील प्रमुख देवस्थानचा विचार करता पुरविण्यात आलेली सुरक्षा व्यवस्था अतिअल्प असून काही देवस्थानात अशी व्यवस्थाच नसल्याचे उघडकीस येणे, त्यामुळे देवस्थान स्थळांच्या सुरक्षिततेचा निर्माण झालेला प्रश्न, याबाबत देवस्थानांचे सखोल परीक्षण करुन त्यांना पुरेशा प्रमाणात सुरक्षा व्यवस्था पुरविण्यात यावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे."

------

3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेणे

**मु. शी.**:अतिरिक्त ठरलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सामावून घेणे याबाबत श्री.रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्री.रामनाथ मोते यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"शासनाने शासनमान्य अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमध्ये 500 पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असल्यामुळे सुमारे 193 शाळांना प्रत्येकी एक लिपिक व एक चतुर्थश्रेणी कर्मचारी मंजूर केला आहे. सभापती महोदय, नवीन पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव गेली 6-7 वर्षे प्रलंबित होता. आता शासनाने पदांना मान्यता देताना अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन करुन ही पदे भरण्याचा निर्णय घेतला असल्याने 6-7 वर्षे काम केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेतून बाहेर पडावे लागेल. एका बाजूला माध्यमिक विभागात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची शेकडो पदे मंजूर होत असताना अतिरिक्त ठरलेल्या कर्मचाऱ्यांना सामावून घेतले जात नाही. आता प्राथमिक शाळांमध्ये नवीन पदे देताना अतिरिक्त ठरलेल्यांना सामावून घ्यावे आणि कामावर असलेल्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कामावरुन काढून टाकावे अशा प्रकारची भूमिका शासनाने घेतलेली आहे.

खाजगी अनुदानित प्राथमिक शाळांमधील अतिरिक्त शिक्षकेतरांना माध्यमिक विभागातील रिक्त पदांवर सामावून घेण्याबाबत प्राधान्याने विचार व्हावा ही विनंती आहे व नवीन 193 पदांवरील कार्यरत असलेल्या प्राथमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांना संरक्षण द्यावे अशी पुनश्च विनंती या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाला करीत आहे."

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** :पुणे शहरातील मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना वसतिगृहातून निकृष्ट दर्जाचे जेवण देण्यात येणे

**मु. शी.** :पुणे शहरातील मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना वसतिगृहातून निकृष्ट दर्जाचे जेवण देण्यात येणे याबाबत श्री.अनिल भोसले वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"देशातील विद्येचे माहेरघर म्हणून ओळखले जाणाऱ्या पुणे शहरात लाखो मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्टया मागास असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय करण्यात येणे, तथापि, असलेली वसतिगृहे अपुरी असून त्यांची मोठ्या प्रमाणात दुरवस्था असणे, निकृष्ट प्रतीचे जेवण देण्यात येणे, तसेच विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सामुग्रीचा अभाव व अपुऱ्या असलेल्या वसतिगृहामुळे केवळ 10 वी 12 वीच्या विद्यार्थ्यांचे निकाल लागल्यानंतर केवळ 10 दिवसातच प्रवेश पूर्ण होऊन मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना प्रवेश न मिळाल्याने खाजगीरित्या महागडया हॉटेलमध्ये राहून शिक्षण घ्यावे लागणे, परिणामी त्यांना पडत असलेला आर्थिक भुर्दंड याबाबत पुणे शहरात मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या विद्यार्थ्यांसाठी जादा वसतिगृहे उभारण्याची तसेच असलेल्या वसतिगृहाची दुरवस्था सुधारण्याची मागणी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाकडे करीत आहे."

----

5.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : वाडा तालुक्यातील औद्योगिकरणासाठी स्थानिकांच्या जमिनी घेतल्यानंतर तेथील आदिवासी तरुणांना अल्प नोकऱ्या मिळणे

**मु. शी.** : वाडा तालुक्यातील औद्योगिकरणासाठी स्थानिकांच्या जमिनी घेतल्यानंतर तेथील आदिवासी तरुणांना अल्प नोकऱ्या मिळणे याबाबत श्री.किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"वाडा तालुक्यात औद्योगिकरणासाठी येथील स्थानिकांच्या जमिनी घेतल्या गेल्या, जेणे करुन बेरोजगारी कमी होईल, येथील तरुणांना नोकऱ्या लागतील व दुर्गम भागातील आदिवासी ग्रामस्थांचे जीवनमान सुधारेल ही अपेक्षा फोल ठरत असून, फारच थोड्या स्थानिक तरुणांना नोकऱ्या मिळाल्या आहेत, त्याही कंत्राटी पध्दतीनुसार मिळालेली नोकरी किती दिवस टिकेल याची शाश्वती नसल्याने तरुणांमध्ये निराशा आहे. तसेच रासायनिक कारखान्यांच्या प्रदुषणामुळे शेतीला धोका निर्माण झाला, सांडपाण्याच्या निचऱ्याची योग्य व्यवस्था नसल्याने शेत जमिनीत पाणी शिरुन जमीन नापीक होत असून, आग, धूर सोडणाऱ्या रोलींग मिलमधून उत्सर्जित होणाऱ्या हानीकारक वायूंमुळे स्थानिकांच्या आरोग्याला बाधा निर्माण होणे, तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळांच्या नियमांना कारखान्यांकडून धाब्यावर बसविले जात असून वाडयातील गोरगरीब रहिवाशांची फसवणूक झाल्याचे चित्र असल्याने याबाबत तातडीने शासनाने उपाययोजना करणेबाबत मी विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू आहे."

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील औद्योगिकरणासाठी स्थानिकांच्या जमिनी घेतल्या गेल्या. तेथील बेरोजगारी कमी होईल असा उद्देश होता. दुर्गम व आदिवासी भागातील ग्रामस्थांचे जनमान सुधारेल, तरुणांना नोकऱ्या लागतील. ही कामे बाजूला राहिली व ठराविक लोकांना हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या लोकांना नोकऱ्या लागल्या, पण तेथील

6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

रासायनिक कारखान्यांच्या प्रदुषणामुळे शेतीला धोका निर्माण झाला आहे, सांडपाण्याच्या योग्य निचऱ्याची सोय नसल्यामुळे शेत जमिनीत पाणी घुसून जमीन नापीक झालेली आहे. त्याच प्रमाणे उत्सर्जित होणाऱ्या वायूमुळे स्थानिकांच्या आरोग्याला बाधा निर्माण झाली आहे. यावरुन असे दिसत आहे की, औद्योगिकरण करीत असताना स्थानिकांना नोकऱ्या मिळाल्या नाहीत, रोजगार मिळाला नाही, त्याचबरोबर असलेली शेती नापीक झाली, स्थानिकांचे आरोग्य खराब झाले म्हणजे वाड्यातील गरीब आदिवासी जनतेची फसवणूक झाल्याचे चित्र निर्माण झालेले आहे याबाबत शासनाने तातडीने उपाययोजना करावी यासाठी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

--------



अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

**पृ. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत जल वाहतूक सुरु करणे

**मु. शी.** : सिंधुदुर्ग जिल्ह्यात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत जल वाहतूक सुरु करणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"छत्रपती शिवाजी महाराजांनी संपूर्ण समुद्रात मध्यभागी सिंधुदुर्ग किल्ल्याची बांधणी केली. त्यामुळेच राज्य शासनाने संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा हा देशात पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केला. कालच केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने चिपी येथील विमानतळाला परवानगी दिलेली आहे. ही एक अतिशय खूष खबर आहे. हा किल्ला पाहण्यासाठी देशी/परदेशी पर्यटकांची रीघ वाढली आहे. आता परदेशी पर्यटकांची आणखी झपाट्याने वाढ होणार आहे. किल्ल्याच्या चारही बाजूस समुद्राच्या जोराच्या लाटा सुरु असतात. जल वाहतूक छोटे-छोटे पडाव, होड्या इत्यादी मार्गे होते. जोराच्या लाटांमुळे बोट जोरात हलते. पर्यटक घाबरतात, त्यांच्या छातीत धडधड होते. तीन-चार वर्षांपूर्वी पडावातून प्रवास करताना मा.ज्योतिर्भास्कर जयंतराव साळगांवकर, मालवणचे माजी नगराध्यक्ष श्री.भाई पै, साहित्यिक श्री.अरविंद म्हापणकर यांची बोट बुडाली. ते पाण्यात बुडाले, आजूबाजूच्या होडीवाल्यांनी त्यांना वाचविले. तरी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळानी परदेशी (250 सिटर्सच्या) 2-3 बोटी मार्फत जल वाहतूक त्वरित सुरु करावी, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे. कृपया स्वीकृत करण्यात यावी."

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

8....

NTK/

**पृ. शी.** : राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणात झालेली घट

**मु. शी.** : राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणात झालेली घट याबाबत श्री.मोहन जोशी वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : मा□□□य सदस्य श्री.मोहन जोशी यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मोहन जोशी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"माहे डिसेंबर, 2011 च्या प्रथम सप्ताहात महाराष्ट्र राज्यातील गुन्हेगारांना शिक्षा होण्याच्या प्रमाणात शेवटचा क्रमांक मिळाल्याची उघड झालेली बाब, राज्यात अनेक वर्षांपासून भारतीय दंड विधानाच्या कलमान्वये दाखल होणाऱ्या गुन्ह्यांमध्ये वाढ होत असणे, हुंडाबळी, खून, आर्थिक व मालमत्तेशी संबंधित, रस्ते अपघात वाढले असणे, सदोष तपास, तपासीय अधिकाऱ्यांवर वाढत असलेला दबाव, प्रलंबित खटल्यांमध्ये होणारी वाढ, परिणामी शिक्षेचे प्रमाण राज्यात अत्यल्प असणे, महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात केवळ पुरावा नसल्यामुळे व सदोष तपासामुळे गुन्हेगारांना शिक्षा होत नसणे, पोलिसांकडे तपासासाठी पुरेसा वेळ नसणे, सर्वाधिक काळ कायदा व सुव्यवस्था, बंदोबस्त व इत्यादि मध्ये जात असणे, तपास अधिकारी व सरकारी वकील यांच्यामध्ये समन्वयाच्या अभाव असणे, परिणामी गुन्हेगारांना शिक्षा होण्याचे प्रमाण अत्यल्प असून पोलिसांचा गुन्हेगारांवर वचक राहिलेला नाही. गुन्हेगारांना हमखास शिक्षा होण्यासाठी न्यायसहाय्यक यंत्रणा पुरेशी बळकट करण्याची निर्माण झालेली तातडीची आवश्यकता व या प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

-------

( काही सन्माननीय सदस्य विशेष उल्लेखाची सूचना मांडण्यासाठी परवानगी मागतात. )

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, यापुढे माझ्याकडे ज्या सन्माननीय सदस्यांनी लेखी स्वरुपात विशेष उल्लेखाच्या सूचना दिलेल्या नसतील त्यांना मी संधी देणार नाही. कृपया माझ्या चांगल्या व गोड स्वभावाचा गैरफायदा घेऊ नये.

यानंतर श्री.गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी**</u>

**पृ. शी.** : स्वयंसेवी संस्थांमार्फत बालगृह,बालसदन,बालकाश्रम, अनाथालय यातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व मूल्यांकनाच्या 75 टक्के घरभाडे मिळणे बाबत.

**मु. शी.** : स्वयंसेवी संस्थांमार्फत बालगृह,बालसदन,बालकाश्रम, अनाथालय यातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व मूल्यांकनाच्या 75 टक्के घरभाडे मिळणे बाबत याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य ॲड उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांमार्फत बालगृह, बालसदन, बालकाश्रम, अनाथालय, अनुरक्षणगृह चालविले जातात. त्या संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी व मूल्यांकनाच्या 75 टक्के घरभाडे मिळावे यासाठी संस्था चालक, लातूर यांची मागणी आहे. ही मागणी खूप वर्षापासून आहे. शेवटी स्वयंसेवी संस्था चालक संघ, लातूर व महिला व बालविकास स्वयंसेवी कर्मचारी संघ,अंबेजोगाई यांनी माननीय उच्च न्यायालय, औरंगाबाद येथे रिट पिटीशन 10727, 10504 नुसार याचिका दाखल केली. सदर याचिकेत उच्च न्यायालयाने चार मिहिन्याच्या आत मूल्यांकनाच्या 75 टक्के घरभाडे व वेतनश्रेणीप्रमाणे पगार लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. मा.आयुक्त, महिला व बालविकास यांनी शासनावर किती आर्थिक भार पडेल याचा अहवाल शासनाकडे (जा.क्र.म.बा.वि.आ./बावि/का-5/11-12/564,दि.29.4.2011) सादर केला आहे. सचिव, महिला व बालकल्याण यांनी प्रतिज्ञापत्र देऊन सहा महिन्याची मुदत वाढवून देण्यात यावी अशी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

विनंती केली आहे. तेव्हा वेतनश्रेणीप्रमाणे पगार व मूल्यांकनाने 75 टक्के घरभाडे देण्याचा तत्काळ निर्णय होण्याससाठी शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना.

सार्वजनिक व महत्वाच्या व निकडीच्या बाबीवर विशेष उल्ल्‍ेखाची सूचना देत आहे. याबाबतीत शासनाने सत्वर कार्यवाही करावी अशी मी विनंती करते.

----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**:राज्यातील विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षेच्या निकालास होत असलेला विलंब.

**मु.शी.** राज्यातील विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध परीक्षेच्या निकालास होत असलेला विलंब याबाबत श्री. जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□□य सदस्य श्री.जयवंतराव जाधव यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.जयवंतराव जाधव ( नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, राज्यातील विद्यापीठातर्फे घेतल्या जाणाऱ्या प्रत्येक परीक्षेचा निकाल पंचेचाळीस दिवसात लावणे कायद्याने बंधनकारक असूनही विविध परीक्षांच्या निकालांना विलंब होत असणे, विद्यापीठस्तरावरील विविध वादग्रस्त निकालांची परंपरा राज्य तंत्रशिक्षण मंडळाने पाळल्याने इंजिनिअरींगच्या शेवटच्या सत्रात फेरमूल्यांकनाचा पूर्ण निकाल जाहीर न झाल्यामुळे काही विद्यार्थ्यांना डिसेंबरच्या पहिल्या सप्ताहातील इंजिनिअरींगच्या परीक्षेस पुन्हा बसावे लागणे, फेरमूल्यांकनातील निकालाच्या विलंबामुळे विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेच्या फेऱ्यात अडकण्याची आलेली वेळ, नाशिक येथील महावीर पॉलिटेक्निकच्या तिसऱ्या वर्षाच्या पॉलिटेक्निक परीक्षेतील फेरतपासणीमध्ये 40 विद्यार्थ्याच्या निकालात फरक पडणे, मात्र हा निकाल उशिरा लागल्यामुळे विद्यार्थ्यांना पदवीच्या प्रवेशास मुकावे लागणे. पुणे विद्यापीठाने सुध्दा मास्टर ऑफ जर्नालिझमच्या निकालामध्ये इंटर्नल मार्क समाविष्ट न केल्याचे घडकीस आल्याने गुणपत्रिका परत मागविण्याची आलेली वेळ, अशा अनेक चुकांमुळे व विद्यापीठातील परीक्षा विभागांच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थ्यांना मन:स्ताप सहन करावा लागणे, परिणामी तंत्रशिक्षण मंडळाचे निकाल वेळेवर लावण्याबाबत व निकालातील चुकांना आळा घालून विद्यापीठाचा कारभार सुधारणा करण्यासाठी शासनाने कार्यवाही करावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शेतीच्या धर्तीवर मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मच्छीमारांना आर्थिक मदत देण्याबाबत.

**मु. शी.** : शेतीच्या धर्तीवर मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मच्छीमारांना आर्थिक मदत देण्याबाबत याबाबत श्री.राजन तेली, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : मा□□य सदस्य श्री. राजन तेली यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. राजन तेली ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, देशाला कोट्यावधी रुपयांचे उत्पन्न मिळवून देणाऱ्या मच्छीमार समाजाच्या अस्तित्वाचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असणे, मासेमारी बंदीच्या काळात मछीमारांना मोठा आर्थिक फटका बसत असल्यामुळे त्यांना शेतकऱ्यांप्रमाणे नुकसानभरपाई द्यावी अशी जोरदार मागणी कोळी समाजाकडून होत आहे. समुद्र हीच कोळी समाजाची शेती असून त्यावरच त्यांचा उदरनिर्वाह चालतो. पावसाळयातील चार महिने मासेमारी बंदीच्या काळात मच्छीमार बेरोजगार बनतात. तसेच कायदे धाब्यावर बसवून ज्यावेळी बहुराष्ट्रीय कंपन्या करीत असलेल्या बेसुमार मासेमारीमुळे मत्स्य दुष्काळाची परिस्थिती निर्माण होते, त्यावेळी मच्छीमारांना शासनाकडून मोठया प्रमाणात आर्थिक मदत केली जाते. तामीळनाडूमध्ये मासेमारी बंदीच्या काळात नाखवांना दिल्या जाणाऱ्या आर्थिक मदतीसाठी मोठी वाढ केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने राज्यातील मच्छीमारांचे हाल लक्षात घेऊन शासनाने शेतीच्या धर्तीवर मत्स्य दुष्काळ जाहीर करावा आणि इतर राज्याप्रमाणे मच्छीमार (कोळी) समाजाला आर्थिक कदत देण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

-----------

5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात कायदे विषयक साक्षरता निर्माण करणे.

**मु.शी.** :राज्यात कायदे विषयक साक्षरता निर्माण करणे याबाबत श्री.भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये कायदे विषयक साक्षरता निर्माण करण्याची नितांत आवश्यकता आहे. विशेषत: लोकप्रतिनिधी व जागरुक नागरिकांसाठी घटनेचा अभ्यास करणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायत कार्यालयांना राज्य शासनाच्या वतीने " राज्य घटनेची प्रत" देण्याची व्यवस्था करावी, अशी विनंती विशेष उल्लेखाच्या निमित्ताने शासनास करीत आहे.

-----------

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S- 6

ABG/ प्रथम श्री. खंदारे 14:35

**पृ.शी.**: महानगरपालिका (तिसरी सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. XLIX OF 2011

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATION ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.)

श्री. भास्कर जाधव ( नगरविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 49- मुंबई महानगरपालिका अधिनियम,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** :विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 49-मुंबई महानगरपालिका अधिनियम,मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम,1948 यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील ज्या महानगरपालिका आहेत, त्या महानगरपालिकांमध्ये त्यांच्या मागणीनुसार शासनाकडून आयुक्त किंवा अतिरिक्त आयुक्त या श्रेणीतील अधिकाऱ्यांची नेमणूक केली जाते. या पदांव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्यांची नियुक्ती राज्य शासनाकडून केली जात नाही. कधी कधी वित्त विभागाचा अधिकारी किंवा एखादा नगररचनाकार किंवा एखादा एडीडीपी पाठविला तर त्या महानगरपालिकेला आवश्यकता वाटली तर त्या महानगरपालिका त्या अधिकाऱ्यांना हजर करुन घेतात. त्यांना जर आवश्यकता नसेल तर त्या महानगपालिका सदर अधिकाऱ्यांना हजर करुन घेत नाहीत. त्या अधिकाऱ्यांची आवश्यकता नाही असे वाटू लागले तर त्या महानगरपालिका त्या अधिकाऱ्यांना मुक्त देखील करतात. ही एक बाजू आहे, तशी दुसरी

7...



श्री.भास्कर जाधव...

देखील बाजू आहे. महानगरपालिकेमध्ये अतिशय चांगल्या दर्जाचे, हुषार असलेले अधिकारी कार्यरत आहेत. त्या अधिकाऱ्यांची एकदा महानगरपालिकेमध्ये नेमणूक झाली तर त्यांना सेवानिवृत्तीपर्यंत त्यांना तेथेच रहावे लागते. तेथील लोकांना पदोन्नती देऊन महानगरपालिकेचा कारभार त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चालवावा लागतो. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून खूप मोठया प्रकारचे प्रकल्प राबविले जात आहेत. सदर प्रकल्पांची कामे करण्यासाठी राज्य शासनाकडून आणि केंद्र शासनाकडून तरतूद उपलब्ध करुन दिली जाते. नवीन नवीन प्रकल्प उभारले जात आहेत, त्या नवीन प्रकल्पांतर्गत नवीन नवीन कल्पना सुध्दा राबविल्या जाव्यात अशी अपेक्षा केंद्र व राज्य सरकारची असते. परंतु त्या ठिकाणी लागलेले कर्मचारी, हळूहळू पदोन्नतीने वरच्या पदापर्यंत जातात, त्यांना बाहेरच्या एकंदरीत नवीन तंत्रज्ञानाचा आवाका अवगत नसतो. म्हणून अपेक्षित असलेला रिझल्ट मिळत नसतो.

महोदय,दुसरी बाजू अशी असते की, काही कर्मचारी हे अत्यंत हुषार असतात. परंतु ते शासनाचे कर्मचारी नसल्यामुळे त्यांना महानगरपालिकेच्या बाहेर जाता येत नाही. त्यांना तेथेच रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या बुध्दीमत्तेचा उपयोग किंवा त्यांच्या बुध्दीमत्तेची झेप आहे, त्याचा आवाका मोठा असून सुध्दा, त्याचा राज्य शासनाला उपयोग करुन घेता येत नाही. या नियमातील तरतुदीमुळे त्या कर्मचाऱ्यांचा उपयोग करुन घेता येत नाही. या विधेयकात दोन्ही बाजूने व्यवस्था केलेली आहे. एका बाजूला राज्य शासन अशा प्रकारचे अधिकारी, मग ते वित्त विभागाचे अधिकारी असतील, बांधकाम विभागाचे अधिकारी असतील, सिंचन विभागातील अधिकारी असतील, इंजिनिअर्स असतील, असे वेगवेगळया संवर्गातील अधिकारी असतील, त्यांची शासनाने नियुक्ती करावी. हा एक संवर्ग तयार करावा. तशा प्रकारची पदनिर्मिती करावी. एखाद्या महानगरपालिकेमध्ये कर्मचारी उपलब्ध नसेल आणि ती जागा चार महिने रिक्त राहिली तर त्यानंतर तेथील महानगरपालिकेने जर मागणी केली तर शासनाचा अधिकारी, कर्मचारी तेथे जाऊ शकतो. ही जशी बाब आहे. तसे त्या महानगरपालिकेमध्ये चांगल्या दर्जाचा अधिकार असेल, तर त्याला राज्यातील कोणत्याही महानगरपालिकेमध्ये जाता येते. अशा प्रकारे दुहेरी व्यवस्था या विधेयकामध्ये केलेली आहे.

8...



श्री.भास्कर जाधव....

महोदय, नगरपालिकेसंदर्भात संवर्ग पूर्वीच केलेला आहे. महानगरपालिकांसाठी हा नवीन संवर्ग तयार होतो आहे. हे अत्यंत चांगले विधेयक आहे. या विधेयकामध्ये जी तरतूद करण्यात आली आहे, त्या तरतुदीचा गाभा मी या ठिकाणी नमूद केलेला आहे. चांगले कर्मचारी महानगरपालिकेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जाऊ शकतात, महानगरपालिकेमध्ये वेगवेगळया संवंर्गातील कर्मचारी नियुक्ती पासून सेवानिवृत्ती अडकून पडत होते. तो कर्मचारी आता या कायद्यातील तरतुदीमुळे बाहेर पडू शकतो...

यानंतर श्री. भोगले...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते..... 14:45

श्री.भास्कर जाधव........

तो सुध्दा बाहेर सेवा करण्यासाठी जाऊ शकतो. तो शासनाच्या केडरमध्ये आल्यामुळे शासन सेवेमधील ज्या काही तरतुदी आहेत त्या त्याला लागू होतील आणि त्याचे फायदे त्याला मिळू शकतील. डायरेक्ट आय.ए.एस.सेवेमधून नियुक्त होणारे अधिकारी आणि पदोन्नतीने नियुक्त होणारे आय.ए.एस.अधिकारी यांचा दर्जा एकच आहे. त्याच पध्दतीने या पदावर काम करणारे अधिकारी कालांतराने त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार सचिव पदापर्यंत पदोन्नत होऊ शकतील. एकंदरीत कामकाजाच्या पध्दतीप्रमाणे आणि अनुभवाच्या जोरावर त्यांना हे शक्य होणार आहे. अशा प्रकारची चांगली तरतूद या विधेयकामध्ये करण्यात आली आहे. या विधेयकाला सभागृहाने एकमताने संमती द्यावी. माननीय सदस्यांच्या काही सूचना असतील तर निश्चितपणे त्या संदर्भात खुलासा केला जाईल, त्या सूचनांचा आदर केला जाईल अशी ग्वाही देतो. पुन्हा एकदा सभागृहाला विनंती करतो की, अत्यंत चांगल्या प्रकारचे हे विधेयक आहे, अनेक वर्षापासून सभागृहाच्या माध्यमातून जी मागणी केली जात होती त्या मागणीचा आदर करुन हे विधेयक आणले असल्यामुळे या विधेयकाला सभागृहाने पाठिंबा द्यावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-49 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक-49 संमत झाले आहे.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक.

**मु.शी.**:

L.A. BILL NO. XLIII OF 2011

( A BILL TO PROVIDE FOR THE MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(प्रश्न पुन्हा प्रस्तुत झाला........

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल या विधेयकावर माझे विचार मांडताना मी व्याख्या 2 मधील (ख) यातील क्रमांक-2 संदर्भात मत व्यक्त करीत होतो. कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील काम थांबविण्यास किंवा बऱ्याच प्रमाणात ते कमी होण्यास ज्या कोणत्याही वर्तणुकीचा परिणाम होण्याचा संभव असेल किंवा कोणतीही वर्तणूक अत्यावश्यक सेवेच्या संदर्भात शासन राजपत्र काढल्यानंतर घोषित केली जाईल ती वर्तणूक कारणीभूत ठरेल असे विधेयकामध्ये नमूद केले आहे.

सभापती महोदय, अनेक कारखान्यांमध्ये किंवा आस्थापनांमध्ये संघर्ष होत असतात. कार्यालयामध्ये काम करण्याची पध्दत अशी असते की, केलेल्या कामाचा दैनंदिन लेखाजोखा ठेवला जात नसतो. एखादे काम केले किंवा कोणते काम केले याची नोंद नसते. कर्मचाऱ्यांची अधिकाधिक काम करण्याची पध्दत असते. परंतु ज्या कारखान्यामध्ये निर्मिती केली जाते त्या ठिकाणी मात्र कामगार संघटना आणि मॅनेजमेंट यांच्यामध्ये लेखी करार केला जातो. त्या करारानुसार नियमाच्या पुढे जाऊन काम करण्याची क्षमता निर्माण केली जाते. ज्यावेळी संघर्ष होतो त्यावेळी मात्र तातडीने मालक संघर्ष मिटवित नसेल, अडेलतट्टूपणा करीत असेल, दुर्लक्ष करीत असेल तर संबंधित कामगार संघटनेच्या वतीने मालकाला नोटीस देऊन कामगार नियमानुसार काम करतील असे कळविले जाते. नियमानुसार काम म्हटल्यानंतर जे काम ठरवून दिलेले आहे त्या पलीकडे कामगार काम करणार नाहीत. या विधेयकानुसार हे कारण काम थांबविण्यास कारणीभूत ठरु शकते. बैठा संप केला तर प्रॉडक्शन कमी होते. काही अंशी ही तरतूद स्वीकृत करण्यासारखी आहे. परंतु बऱ्याच वेळेला नियमानुसार काम करणार असे म्हटले आणि प्रॉडक्शन कमी झाले तर ती बाब अत्यावश्यक सेवेमध्ये अंतर्भूत करण्याचा या विधेयकामुळे

...3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

सरकारला अधिकार मिळणार आहे.

मी काल बजाज ऑटो कंपनीचे उदाहरण दिले. बजाज ऑटो कंपनीमध्ये एका दिवसात क्षमतेपेक्षा एक स्कूटर जास्त निर्माण केल्याच्या प्रश्नावरुन मॅनेजमेट आणि कामगार युनियन यांच्यात संघर्ष निर्माण झाला. 2000 कामगारांना कामावरुन कमी करण्यात आले आणि तेथील कामगार युनियनचा अस्त झाला. आता त्या कारखान्यात कंत्राटी कामगार नेमले गेले आहेत. त्या कामगारांना काहीही भवितव्य नाही. तेव्हा कराराप्रमाणे असे घडते. शासनाने अत्यावश्यक सेवेसंबंधी हे विधेयक सभागृहापुढे मंजुरीसाठी आणले आहे त्यानुसार कोणत्या सेवा अत्यावश्यक ठरणार आहेत हे ठरविण्याचा अधिकार सरकारने आपल्याकडे घेतला आहे. ज्यावेळी व्यापकता निर्माण होते त्यावेळी सरकारच्या हेतूबद्दल शंका निर्माण होते. अत्यावश्यक सेवेमुळे भविष्यात काय घडणार आहे, कोणता उत्पात घडणार आहे?

सभापती महोदय, महानगरपालिका, जिल्हा परिषदा आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या संदर्भात या विधेयकाला फार महत्व आहे. या संदर्भात मंत्री महोदयांनी खुलासा करणे आवश्यक आहे. 14 डिसेंबर, 2011 पासून शासकीय कर्मचाऱ्यांनी शासनाला संपाची नोटीस दिली होती. परंतु शासनाने संघटनेच्या नेत्यांना बोलावून तडजोड केली आणि संप सध्या तरी स्थगित केलेला आहे. हे कसे घडले, त्यांना कोणती आश्वासने दिली, ज्यामुळे हा संप थांबला हे सभागृहाला कळले पाहिजे. शासकीय कर्मचाऱ्यांच्या मागण्या काय आहेत? ज्यावेळी अशा प्रकारचा कायदा तयार केला जातो आणि शासकीय सेवा ही अत्यावश्यक सेवा ठरवून कायद्याचा बडगा उभारला जातो त्यावेळी ज्या प्रशासकीय यंत्रणेला या प्रश्नासंबंधी निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले आहेत त्यांच्या बाबतीत काय करणार आहात असा प्रश्न निर्माण होतो. एखादी बाब किती काळ प्रलंबित ठेवायची? त्यामुळे मोठया प्रमाणात असंतोष निर्माण झाला आणि त्याची प्रतिक्रिया संपाच्या रुपाने उमटणार असताना त्यांच्या संपावर बंदी घालण्याचा अधिकार शासन स्वत:कडे घेते तेव्हा अशी परिस्थिती निर्माण व्हायला कारणीभूत असलेल्या प्रशासकीय यंत्रणेबाबत या विधेयकामध्ये काहीही भाष्य केलेले नाही. मी शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली. तेव्हा मला असे कळले की, 14 डिसेंबर पासून सुरु होणार असलेला संप सध्या तरी तहकूब झालेला आहे. गेल्या पाच वर्षाच्या काळात शासकीय कर्मचारी त्यांच्या विविध प्रलंबित असलेल्या मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करीत आहेत.

नंतर श्री.खर्चे...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 14:55

श्री. दिवाकर रावते ........

पाच वर्षांचा कालावधी हा कमी नाही. शासन अशा प्रकारे लोकांना दम देते, स्वत: मात्र काही करीत नाही. अशीच शासनाची प्रवृत्ती असेल तर अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक हा कायदा आणण्याचा नैतिक अधिकार शासनाला कसा पोहचतो हेच मला समजत नाही. गेल्या पाच वर्षांपासून सरकारचेच कर्मचारी त्यांच्या विविध मागण्यांसाठी पाठपुरावा करीत आहेत, त्यासाठी शासन एका शब्दानेही बोलण्यास तयार नाही आणि अगतिकतेला येऊन कसे तरी त्यांचा संप रद्द करायला लावते. संप रद्द झाल्यानंतर मात्र अत्यावश्यक सेवा हा कायदा करुन पुन्हा जर त्या कर्मचाऱ्यांनी संप केला तर त्यांचे कंबरडे कसे मोडायचे यासाठीच हा कायदा हत्यार म्हणून वापरला जाईल यात शंका नाही. शासनाने केंद्र शासनाच्या कर्मचाऱ्यांना ज्या सवलती मिळतील, जी पगारवाढ मिळेल ते सर्व देण्याचे मान्य केले तर प्रश्नच येत नाही. पण केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळून चार-पाच वर्षे उलटून जातात तरी देखील आपल्या कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर विचार करण्याचा या शासनाचा मानस दिसत नाही. आता मात्र अत्यावश्यक सेवेच्या नावाखाली दडपशाही करुन काम करणार असाल तर कोणत्या संविधानाच्या माध्यमातून आपण हे विधेयक सभागृहाच्या मान्यतेसाठी आणत आहात याचाच मला संभ्रम आहे. या कर्मचाऱ्यांच्या मागण्या काय आहेत याचे सविस्तरपणे निवेदन शासनाकडे त्यांच्या युनियनच्या माध्यमातून दिलेलेच आहे. त्यात केंद्राप्रमाणे महागाई भत्ता, निवृत्तीचे वय 58 वरुन 60 वर्षे जे सध्या केंद्रात आहे. या त्यांच्या मागण्या आहेत. या मागण्या मान्य करुन घेण्यासाठी मी उभा नाही कारण त्यांचे नेते त्यासाठी सक्षम आहेत. माझा मुद्दा असा आहे की, आपल्याच कर्मचाऱ्यांना शासन पाच पाच वर्षे न्याय देत नाही तर कोणत्या नैतिकतेतून हे विधेयक सभागृहात मान्यतेसाठी आणत आहेत याचा खुलासा झाला पाहिजे.

महोदय, सभागृहात मघाशी दुधाचा विषय लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून चर्चेला आला होता. दूध हे अत्यावश्यक सेवेत मोडते. मुंबईत लाखो लिटर दुधाची गरज असते व ते उपलब्ध झाले नाही तर मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो म्हणून दूध हे अत्यावश्यक सेवेत घेतलेले आहे, पण त्याबाबतही संघर्ष चालू आहे. अत्यावश्यक सेवेत दुधाचा समावेश केल्यानंतर त्याचा पुरवठा करणारे मालक मात्र त्याचा फायदा घेताना दिसत आहेत. स्थानिक दूध विक्रेत्यांना जे कमिशन द्यावयाचे असते ते वाढवून मिळावे अशी त्यात त्यांची मागणी आहे. तसेच दूध मालकाचे म्हणणे

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

आहे की, एकदा वितरकाने दूध घेतल्यानंतर ते संपले नाही तर त्याच्याच अंगावर ते पडेल, कुठल्याही परिस्थितीत परत घेतले जाणार नाही आणि अशाच जाचक अटींसाठी या दूध वितरकांनी आंदोलन केले होते. अशा वेळेस दूध अत्यावश्यक सेवेत घेतल्यानंतर मात्र या प्रश्नाबाबत कोणत्या पध्दतीने विचार करणार आहात हा खरा प्रश्न आहे.

महोदय, या विधेयकाच्या कलम 2 च्या पोट कलम 4 च्या पोट कलम (2) मध्ये असे म्हटलेले आहे की, "पोट कलम (1) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे ज्यांच्यावर परिणाम होत असेल अशा व्यक्तिंच्या निदर्शनास आणण्यासाठी राज्य शासनास त्जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने ती प्रसिध्द करण्यात येईल." म्हणजे शासनाला जसे वाटेल त्याप्रमाणे, जे योग्य वाटेल तेव्हा प्रसिध्द करु असे म्हणावयाचे आहे. शासनाला योग्य वाटेल तो मार्ग, कायदा असा मुक्त नसतो, तो ठराविक चाकोरीतून जात असताना त्याची अमलबजावणी करताना जसे अनुभव येतात त्यानुसार भविष्यात दुरुस्त्या करण्यात येतात. किंवा तशा सूचना आल्यानंतर कायद्यात बदल केले जातात. पण जी रीत शासनाला योग्य वाटेल त्या रितीने ती प्रसिध्द करण्यात येईल याचा अर्थ मात्र स्पष्ट होत नाही. याचाच अर्थ शासनाला ती रीत ठरविण्याचा अधिकार मिळाला आहे. तसेच शासन नेहमी ठामपणे आणि निर्णायक कायदा करीत असते, अशा प्रकारचा व्हेग स्वरुपाचा कायदा कधीच नसतो अशा दोन्ही बाजूंनी याला फाटे फुटू शकतात, त्यामुळे शासनाची ही कायदा करण्याची पध्दती योग्य नाही एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

यानंतर पोटकलम 4 च्या पोट कलम (5) मध्ये "राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या सचिवालयीन कर्मचारी वर्गामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत" असा उल्लेख केलेला आहे. ज्या सभागृहात आपण नेहमी पाहतो की, विधी मंडळाचे कर्मचारी यांच्या कामाची वेळ जरी 10.45 ते 5.30 वाजेपर्यंत असली तरी त्यातील एकही कर्मचारी रात्री 9.00 पूर्वी कार्यालयातून उतरताना दिसला नाही, हे सत्य आहे. तसेच मी या विधान मंडळात सभासद म्हणून आल्यापासून पाहतो की, कोणत्याही कर्मचाऱ्याने आगाऊपणा केल्याचे मला तरी आठवत नाही, अथवा त्यांच्याबद्दल कोणी कधी तक्रार केल्याचे सुध्दा आठवत नाही. या कार्यालयात आम्ही आमदार म्हणून मिरवित असतो तेव्हा पाहतो की, ते रात्रंदिवस येथे झटतात. त्यांचे सेवेच व्रत असताना त्यांच्या कामाची

...3



PFK/ पूर्वी श्री. भोगले..... 14:55

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

वेळ जरी मी वर सांगितल्याप्रमाणे असली तरी त्या वेळेत ते कधी घरी जाताना दिसत नाही. आपण पाहतो की, विधानसभेचे कामकाज रात्री दोन ते तीन वाजेपर्यंत चालते तेव्हा ते कर्मचारी कधी घरी जातात, आणि पुन्हा सकाळी आपण येथे येण्यापूर्वी कार्यालयात तयारी करुन बसलेले असतात. अधिवेशन कालावधीत इतके काम करुन त्यांना वेगळ्या काही सवलती मिळतात असे नाही तर फक्त अधिवेशनानंतर दोन दिवस सुट्टी मिळते, तेवढाच त्यांना दिलासा असतो. या कर्मचाऱ्यांना भत्ता किती मिळतो हे मला माहीत नाही आणि मी कधी त्या खोलात सुध्दा गेलो नाही. पण अर्थसंकल्पीय अधिवेशन एवढ्या उशीरापर्यंत चालत असते तेव्हा मात्र त्यांना उशीरापर्यंत थांबावे लागते. कार्यालयात पैसे मिळण्यासाठी थांबणे वेगळे असते पण केवळ अपरिहार्यता आणि आपल्या नोकरीचा भाग म्हणून इच्छा असो वा नसो थांबणे वेगळे असते. शासन अशा प्रकारचे विधेयक मान्यतेसाठी आणताना वेळेवरच आमच्याकडे विधेयकाची कॉपी देते. नियमानुसार सात दिवस अगोदर सर्व विधेयकाच्या प्रती मिळाव्यात अशी अपेक्षा असते. जेणेकरुन सभासदांना त्या विषयाची माहिती मिळविणे, त्याचा अभ्यास करणे सोईचे होईल. तसेच काही उपसूचना किंवा सुधारणा द्यावयाच्या असतील तर त्या देता येतील. आज सुध्दा तसेच झाले. अगदी वेळेवर विनियोजन विधेयक सभागृहात आणले आणि केवळ सभापतींचा मान ठेवण्यासाठी म्हणून आम्ही अशा वेळेवर आणलेल्या विधेयकांना सुध्दा मान्यता देतो, याची जाणीव शासनाने ठेवली पाहिजे.

महोदय, याच पोटकलम 5 च्या (क) मध्ये "विधान परिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष" असा एकेरी उल्लेख केलेला आहे. हे सर्वात जास्त आक्षेपार्ह उल्लेख आहेत. वास्तविक विधानसभेचे माननीय अध्यक्ष व विधान परिषदेचे माननीय सभापती ही दोन्ही स्थाने सर्वोच्च अशीच आहेत. आमदार ज्याप्रमाणे सभागृहात वस्तुस्थिती सांगत असतात ती ग्राह्य धरली जाते त्याचप्रमाणे माननीय अध्यक्ष व माननीय सभापती यांच्याकडे इतक्या तुच्छतेने आपण पाहतो हे सुध्दा शासनाच्या लक्षात येत नाही, याचेच आश्चर्य वाटते.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. जुन्नरे

श्री. दिवाकर रावते ...

ही वाक्य रचना आपल्याला योग्य वाटते काय ? विधान परिषदेच्या माननीय सभापतींचा तसेच विधान सभेच्या माननीय अध्यक्षांचा एकेरी उल्लेख करणे आपल्याला योग्य वाटते ? कलम 5 मधील पोट कलम (क) मध्ये विधानपरिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करुन, राज्य विधानमंडळाच्या सभागृहाच्या सचिवालयीन कर्मचारी वर्गामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत." सन्माननीय सभापती व सन्माननीय अध्यक्षांच्या अपरिहार्य सेवेत असतील ते अतिरिक्त सेवेत धरले जाणार आहेत असे कर्मचारी कोण आहेत ? या ठिकाणी काम करणारे लिपिक असतील, प्रतिवेदक असतील, अधिकारी असतील त्यामध्यें सचिव, उप सचिव येतात काय याचा आम्हाला काही एक अर्थबोध होत नाही. तुम्ही काय ठरवलेले आहे याची माहिती विधेयकात क्लिअर असली पाहिजे. माननीय सभापती व माननीय अध्यक्षांच्या सेवेत असलेल्या कोणत्या कर्मचा-यांना तुम्ही अत्यावश्यक सेवेत धरणार नाही ? अत्यावश्यक सेवेत कोण असणार व कोण नसणार हे तुम्ही कसे काय ठरवणार आहात ? ठराविक पदावर काम करणा-याच्या व्यतिरिक्त जे असतील ते अत्यावश्यक सेवेत येणार नाही.

सभापती महोदय, विधान मंडळाच्या खर्चाला मर्यादा किंवा अमर्यादा आहे यापेक्षाही विधान मंडळला ऑडिट नाही. माननीय राज्यपाल महोदयांचा खर्च तसेच विधान मंडळाचा खर्च अपरिहार्य खर्च म्हणून त्यावर चर्चा केली जात नाही, त्यासंबंधीची चौकशी केली जात नाही व ऑडिटही केले जात नाही. असे असतांनाही विधान मंडळाच्या कर्मचा-यांना तुम्ही अत्यावश्यक सेवेत का घेतले आहे ? आम्हाला यासंदर्भात उपसूचना मांडावयाची असेल तर ती आम्ही मांडू शकत नाही. सकाळी कामकाजात विधेयक दाखविल्यावर सायंकाळच्या वेळी विधेयकावर चर्चा केली जाते. उप सूचना द्यावयाची असेल तर ती आम्हाला 48 तास अगोदर द्यावी लागते. तुमच्याकडे बहुमत असल्यामुळे हे विधेयक मंजूर होईल हे सर्वांना माहिती आहे. चर्चेच्या दरम्यान किंवा चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्य विधेयकाच्या संदर्भातील उणिवा दाखवित असतात.

सभापती महोदय, आमच्या माननीय सभापती व माननीय अध्यक्षांचा विधेयकात एकेरी उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु न्यायालयाच्या बाबतीत काळजी घेण्यात आलेली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

"उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश" असा आदरपूर्वक उल्लेख करण्यात आलेला आहे. कलम 4 मधील पोट कलम 5 च्या (ख) मध्ये असे म्हटले आहे की, "उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांच्या विनंती नुसार असेल ते खेरीज करुन उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत" पोट-कलम (1) किंवा पोट-कलम (3) अन्वये कोणताही आदेश काढता येणार नाही.

सभापती महोदय, या विधेयकात ज्या बाबी दिलेल्या आहेत त्या मला अतिशय खटकत आहेत. विधेयकातील एकेरी शब्द कसे थांबवावयाचे, कसे बदलावयाचे हे काही समजत नाही. माननीय विधान परिषदेच्या सभापतींचा व माननीय विधान सभेच्या अध्यक्षांचा अनादर करणारी काही वाक्ये या विधेयकात असतांना देखील आम्ही या विधेयकावर चर्चा करावी काय ? अनादर करणारे वाक्य बदलण्यासाठी आम्हाला उपसूचना कशी देता येईल हे मला कळेनासे झालेले आहे. त्यामुळे यासंदर्भात आपल्याकडूनच मार्गदर्शन होणे अत्यंत आवश्यक आहे.

---

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ प्रथम श्री. खर्चे... 15:05

**पृ.शी.** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिलची साडेबारा एकर जागा मिळणे

**मु.शी.** : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आंतरराष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिलची साडेबारा एकर जागा मिळणे याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचा ठराव

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री ) सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील ठराव मांडू इच्छितो.

"भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक उभे करण्यासाठी चैत्यभूमी,दादर येथील एनटीसीच्या मालकीची साडेबारा एकर जमीन केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनास विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचा सर्व खर्च राज्य शासन करील."

सभापती महोदय, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी चैत्यभूमी, दादर येथील इंदू मिलची जागा मिळण्याच्या संदर्भातील चर्चा सभागृहात अनेक दिवसापासून सुरु असल्यामुळे मी आपल्या अनुमतीने ठराव मांडू इच्छितो. भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य राष्ट्रीय स्मारक मुंबई येथील चैत्यभूमी येथे करण्यासाठी राज्य शासनाने स्वत: पुढाकार घेतलेला आहे. यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समितीची स्थापना सन 2002 मध्ये करण्यात आली होती. तसेच या सुकाणू समितीने याबाबतीत काही काम देखील केलेले आहे. या सुकाणू समितीची पुनर्रचना पुन्हा सन 2010 मध्ये झाली होती. या कामासाठी राज्य शासनाने आतापर्यंत 21 कोटी रुपयांचा निधी मुंबई महानगरपालिकेला उपलब्ध करुन दिलेला आहे. चैत्यभूमी येथे महापरिनिर्वाण दिनाच्या दिवशी भेट देण्यासाठी देशभरातून लाखो श्रध्दाळू येत असतात तसेच आपण सुध्दा त्या ठिकाणी जात असतो. चैत्यभूमीच्या शेजारी असलेल्या इंदू मिलच्या सर्व जागेमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक व्हावे याबाबत आपल्या सर्वांच्या मनामध्ये एकमत आहे. केवळ आंबेडकरी जनताच नाही तर महाराष्ट्रातील सर्व जनता किंबहुना देशातील संपूर्ण जनता त्यांच्या पुढे नतमस्तक होत असते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रयत्नामुळेच या देशातील लोकशाही सुदृढपणे चालली आहे, अशा थोर डॉ. बाबासाहेबांची स्मृती अजरामर रहावी याचा विचार देशातीलच नव्हेतर जगातील बहुसंख्य

....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ......

लोकांच्या मनात असेल. ज्या ज्या ठिकाणी शोषित समाज आहे त्यांना डॉ. बाबासाहेबांच्या कामाची प्रेरणा मिळावी यासाठी चैत्य भूमीवर डॉ. बाबासाहेबांचे भव्य स्मारक झाले पाहिजे, असे आपल्या सर्वांचे मत आहे.

चैत्यभूमीच्या विकासाचा एक भाग म्हणून एनटीसीच्या मालकीची सुमारे 12.5 एकरची सर्वच्या सर्व जमीन राज्य शासनाला विनामूल्य हस्तांतरीत करावी. ही जमीन मिळाल्यानंतर राज्य शासन त्या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक करेल याबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे प्रयत्न केला असून या कामात पुढाकार घेतलेला आहे. यासंदर्भात मी स्वत: 9 ऑगस्ट, 2011 रोजी माननीय पंतप्रधांनाना पत्र लिहिलेले आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय पंतप्रधानांना तसेच माननीय वस्त्रोद्योग मंत्र्यांना अनेक वेळा भेटून माहिती सुध्दा दिलेली आहे. वस्त्रोद्योग सचिवांबरोबर दोन बैठकाही झालेल्या आहेत. या जमिनीच्या संदर्भात एनटीसी कडून जो प्रस्ताव आला होता तो 12.5 एकर जमिनीचा त्रिभाजनाचा प्रस्ताव होता. यामधील 4 एकर जमीन राज्य शासनाला स्मारकासाठी द्यावी व उर्वरित 8.5 एकर जमिनीमध्ये एनटीसी व्यापारी विकास करेल, त्यातील प्रिमियमची रक्कम राज्य शासन घेणार नाही आणि त्याच्या मोबदल्यातच राज्य शासनाला 4 एकर जमीन मोफत दिली जाईल, अशा प्रकारची चर्चा तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये झाली होती.

महोदय, सन 2002 मध्ये जेव्हा सुकाणू समिती गठित झाली होती त्या समितीने चैत्यभूमीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभे केले व नंतर सन 2010 मध्ये नवीन सुकाणू समिती गठीत झाली त्या नवीन सुकाणू समिती समोर हा विषय चर्चेमध्ये होताच. इंदू मिलची सर्व जागा राज्य सरकारची आहे. गिरण्या प्रस्थापित करण्यासाठी शासनाने खाजगी सूत गिरण्यांना जमिनी दिल्या परंतु नंतर त्या आजारी पडल्या व त्या जमिनी केंद्र सरकारने अधिग्रहित केल्या. खरे म्हणजे या जागेवर एनटीसीची मालकी असली तरी मूळ जागा राज्य सरकारची आहे. आजारी सूत गिरण्या विकून एनटीसीने खूप पैसे मिळविलेले आहेत. त्यामुळे महान राष्ट्रीय स्मारकासाठी इंदू मिलची सर्वच्या सर्व जमीन मिळावी यासाठी राज्य सरकारचे प्रयत्न सुरु आहेत, तसेच

...5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण ......

केंद्र शासनाकडे पाठपुरावाही सुरु आहे. महाराष्ट्र शासन केंद्र सरकारच्या संपर्कात आहेच पण तरी देखील विधी मंडळाचे अधिवेशन संपल्यावर एक शिष्टमंडळ घेऊन मी माननीय पंतप्रधांना भेटून महाराष्ट्रातील जनतेच्या भावना, विधी मंडळाच्या भावना त्यांच्या समोर मांडणार आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

त्याबाबतीत तातडीने निर्णय घ्यावा अशा प्रकारची विनंती करणार आहे. किंबहुना आग्रही भूमिका मांडणार आहे. या संदर्भात कुठल्याही प्रकारचे राजकारण करून कायदा हातात घेण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, अशी नम्र विनंती मी सर्व राजकीय पक्षांना करू इच्छितो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीला अभिवादन करून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला व त्यांच्या कार्याला शोभेल असे भव्य स्मारक चैत्यभूमीच्या पावन भूमीवर व्हावे व ते स्मारक शासन उभारेल अशी मी ग्वाही देतो. या कामी आपण सर्वांनी शासनाला सहकार्य करावे अशी मी विनंती करतो.

ठराव एक मताने संमत झाला.

........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक.

**मु.शी.**:

L.A. BILL NO. XLIII OF 2011

( A BILL TO PROVIDE FOR THE MAINTENANCE OF CERTAIN ESSENTIAL SERVICES AND THE NORMAL LIFE OF THE COMMUNITY; AND TO PROVIDE FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

(चर्चा पुढे सुरु........

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या विधेयकाची चर्चा पुढे नेण्यापूर्वी एक खुलासा होणे अत्यंत आवश्यक आहे. या विधान मंडळामध्ये आपल्या नेतृत्त्वाखाली हे विधेयक चर्चेला आलेले आहे. या विधान मंडळाचे सर्व अधिकार आपल्याला आहेत. आपल्या निदेशानुसारच आम्ही या विधेयकावर बोलत आहोत. आपले स्थान सर्वोच्च आहे. विधान सभा सभागृहात माननीय अध्यक्षांचे सर्वोच्च स्थान आहे. या महाराष्ट्रात न्यायाधीशांपेक्षा सर्वोच्च स्थान हे आपले आहे. न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयासंबंधी आपल्याला अपील करता येते. मात्र, माननीय सभापतींनी दिलेल्या निर्णयावर अपील करता येत नाही. आपला निर्णय शिरसावंद्य मानून आम्ही काम करीत असतो म्हणूनच राज्य शासनाने येथे त्वरित खुलासा केला पाहिजे. या विधेयकात माननीय सभापती व माननीय अध्यक्ष यांचा एकेरी उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे या विधेयकाला उप सूचना कशी मांडावी हे मला कळत नाही. तेव्हा यासंबंधी सचिव खात्याने किंवा राज्य शासनाने मार्गदर्शन करावे. तरच मला पुढे काम करता येईल. विधान सभेचा अध्यक्ष आणि विधान परिषदेचा सभापती असा एकेरी उल्लेख करण्यात आला आहे. त्या ऐवजी विधान परिषदेचे माननीय सभापती व विधान सभेचे माननीय अध्यक्ष असा उल्लेख असायला हवा. अशा प्रकारची सूचना आपण मांडावी. ती मंजूर केल्यानंतरच आपल्याला पुढे जाता येईल. एवढ्या अवमानित पद्धतीचे विधेयक मी पुढे नेऊ इच्छित नाही व मला ते नेणे जमणारे नाही.

सरकारने उप सूचना मांडली तर काय होईल ते बिल पुन्हा



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सरकारने उप सूचना मांडली तर काय होईल? ते बिल पुन्हा खालच्या सभागृहात जाऊन पुन्हा मंजूर होऊन येईल. विधान परिषदेच्या माननीय सभापती व विधान सभेच्या माननीय अध्यक्षांच्या संबंधी असा केलेला उल्लेख आम्ही तरी पुढे रेटून नेऊ शकत नाही. हे वाचताना देखील मला वेदना होतात. पण ते अपरिहार्य आहे. वाचल्याशिवाय ते कोणालाही कळणार नाही, सांगितल्या शिवाय समजणार नाही. त्यामुळे यात बदल होणे अत्यंत आवश्यक आहे. यासंबंधी सचिवांनी मार्गदर्शन करावे. ही उप सूचना शासनाने मांडली तर त्यास आम्ही जरूर मदत करू. अशी उप सूचना मांडली तरच या विधेयकावरील चर्चेला काही तरी अर्थ राहील असे माझे मत आहे. तेव्हा कृपया आपण मार्गदर्शन करावे एवढे बोलून मी थांबतो.

**सभापती** : विधान परिषदे समोर आलेल्या बिलाच्या माध्यमातून माननीय अध्यक्ष विधान सभा व माननीय सभापती विधान परिषद यांचा एकेरी उल्लेख आला असल्या संबंधीचा आपला मुद्दा मी मघाशी ऐकला होता. तोच मुद्दा आपण आता देखील मांडला आहे. हा उल्लेख संसदीय परंपरेच्या दृष्टीने आक्षेपार्ह आहे ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा यासंबंधी शासनाने गंभीर नोंद घेणे गरजेचे आहे. ही नोंद घेत असताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांनी जी दुरूस्ती सुचविली आहे ती किरकोळ असली तरी महत्त्वाची आहे. ती लवकरात लवकर दुरूस्त कशी होईल या दृष्टीने आपण प्रयत्न करावा.

श्री.रामराजे नाईक-निंबाळकर : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विधेयकाला दुरूस्ती आल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही. सरकारने गंभीर दखल घ्यावी असे आपण म्हटलेले आहे. शासनाने गंभीर दखल घेऊन दुरूस्तीसह हे बिल सभागृहापुढे आणले पाहिजे. आपल्या हाऊसमध्ये दुरूस्ती स्वीकारल्यानंतर ते बिल खालच्या सभागृहात पाठवून द्यावे. तो पर्यंत आपल्याला या विधेयकावर चर्चा करता येणार नाही.

**सभापती** : महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयकातील खंड 4 मधील पोट कलम (5) (क) मध्ये विधान परिषेदचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करून, राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचारीवर्गामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत अशा प्रकारची तरतूद करण्यात आली आहे. त्यासंबंधीचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आताच केला असल्यामुळे मी सभागृहाचे लक्ष म.वि.प.नियम 134



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती** .......

कडे वेधत आहे. यात नमूद करण्यात आले आहे की,. "विधान सभेकडून विधेयक संमत करण्यात आले असेल त्याबाबतीत, सभापतींना, विधेयकात उघड उघड दिसत असलेल्या चुका दुरूस्त करण्याचा आणि विधान परिषदेने स्वीकारलेल्या सुधारणेच्या परिणामस्वरूप असतील असे अन्य फेरफार करण्याचा अधिकार असेल. सभागृहा समोर ही जी बाब मांडलेली आहे ती दुरूस्त होण्याच्या दृष्टीने मी आदेश देत आहे.

श्री.दिवाकर रावते : धन्यवाद सभापती महोदय. पोट-कलम 5 (ख) मध्ये उच्च न्यायालयाचा उल्लेख केलेला आहे. त्यासंबंधी मी माझे मत व्यक्त केले आहे. आता येथे माझे मित्र सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर उपस्थित आहेत. तथापि, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप आता येथे उपस्थित नाहीत. आता त्यांचा विषय येत आहे. ह्या दोघा सन्माननीय सदस्यांनी विविध कारखान्यांमध्ये संघटना चालविल्या आहेत. कारखान्याच्या मालकाने टाळेबंदी जाहीर केली तर काय होईल त्या संदर्भातील आता विषय सुरू झालेला आहे. सरकारने या विधेयकात अपरिहार्य सेवेची व्याप्ती कशी वाढविली आहे ते पहा. जुन्या विधेयकामध्ये ही तरतूद नव्हती. जुने विधेयक रद्द करून आता शासनाने नवीन विधेयक आणले आहे.

खंड 5 पोट कलम (5) मध्ये नमूद केले आहे की, कोणताही मालक, आस्थापनेच्या सबंधात या कलमान्वये अवैध असणारी टाळेबंदी सुरू करील, चालू ठेवील किंवा अन्य प्रकारे तिच्या पुर:सरणार्थ वर्तणूक करील तर, तो दोष सिद्धीनंतर सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन हजार रूपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल. कामगारांचे लाखो रूपये बुडवून एखाद्या मालकाने संप केला, टाळेबंदी जाहीर केली, कामबंदी जाहीर केली तर त्याला फक्त दोन हजार रूपयांची शिक्षा आहे. त्या मालकाचा चहाचा रोजचा खर्चच दोन हजार रूपयांचा असेल.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्या मालकाचा रोजचा विडी-काडी, चहापानाचा खर्च 2 हजार रुपये असतो. मघाशी मी उल्लेख करीत असतांना कामगारांकडून प्रॉडक्शन कमी होण्याची कोणतीही वर्तणूक झाली. म्हणजे जर त्यांनी प्रॉडक्शन कमी केले, निर्मिती कमी केली तर त्या संबंधीचा उल्लेख या ठिकाणी जोडला जात आहे. या ठिकाणी मालकाला फक्त 2 हजाराचा दंड करण्याचा उल्लेख करण्यात आला आहे. हजारो कोटी रुपयांची उलाढाल करणाऱ्या कारखान्याच्या मालकाला दोन लाख किंवा पाच लाख रुपयांचा दंड कां केला नाही? कारखान्यातील एखाद्या कामगाराला कामावरुन काढून त्याच्या आयुष्याची माती करुन त्या ठिकाणी कंत्राटी कामगार भरणाऱ्या मालकावर दंड लावण्याची आपली जबाबदारी नाही? आज या देशामध्ये अशाप्रकारची प्रवृत्ती निर्माण झाली आहे. त्यामुळे या संपूर्ण औद्योगिक क्षेत्रामध्ये कामगार आता असुरक्षित झालेला आहे. माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर, भाई जगताप हे कामगार संघटनेमध्ये काम करतात, त्यांना संपाचा अनुभव असल्यामुळे ते या शिक्षेचे अधिक चांगल्या प्रकारे विश्लेषण करु शकतील.

सभापती महोदय, त्यानंतर कलम 6 मध्ये कामगारांच्या बाबतीत म्हटले आहे. "आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही आस्थापनाच्या हजेरीपटावर ज्याचे नाव आहे" यामध्ये अत्यावश्यक सेवा कोणती हे त्यांनी ठरवावयाचे आहे. उदा.एखादा औषध निर्मितीचा कारखाना अत्यावश्यक सेवेमध्ये आहे. याचे कारण औषध ही गरजेची वस्तू असल्यामुळे औषधाची निर्मिती झाली पाहिजे. त्याचप्रमाणे सरकारच्या निविदेमध्ये मंजूर झालेल्या वस्तूंची निर्मिती करुन तिचा पुरवठा करणे, आदिवासी आश्रमशाळेतील मुलींसाठी शासनाने जाहीर केलेल्या पॅकेजमधील वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी त्या वस्तूंची निर्मिती करणाऱ्या कारखान्याचा मालक माझे कामगार वस्तूंची निर्मिती करीत नाहीत, मला सतावत आहेत अशावेळी त्या वस्तूंची निर्मिती करणारी क्रिया ही अत्यावश्यक सेवा म्हणून जाहीर होणार. म्हणजेच तो कारखानदार हा सरकारी पुरवठादार असल्यामुळे त्या ठिकाणी या अत्यावश्यक सेवेचे कलम लावले जाईल. या मध्ये मंत्री महोदयांना कदाचित गंमत वाटत असेल. आज आपण या सभागृहामध्ये आहोत,उद्या येथून जाऊ परंतु हे कलम या विधेयकामध्ये टाकून व त्याचा अशाप्रकारे अर्थ लावून कामगारांची वाट लावण्याची किमया आपल्या सरकारी अधिकाऱ्यांमध्ये असते. आपल्याला अभिप्रेत असलेले न घडता त्यांच्याकडून विपरीत घडविले जाते. विपरीत घडते म्हणून सरकार चालते, नाही तर सरकारला नव-नवीन कायदे आणण्याची संधी मिळाली नसती.

श्री. दिवाकर रावते...

एखादा अधिकारी कायद्यामध्ये विपरीतता निर्माण करीत असल्यामुळे या कायद्यामध्ये काही तरी गडबड झाली आहे असे आपल्या लक्षात येते त्यावेळी आपल्याला नव्याने सुधारणा आणावी लागते. विधिमंडळामध्ये कायदा करणारी व्यवस्था ही कायम नसून ती सारखी बदलत असते. त्यामुळे या ठिकाणी नवीन आलेल्या व्यक्तीला या कायद्यामध्ये त्रुटी आहेत असे वाटते त्याकरिता मग सुधारणा आणावी लागते.

सभापती महोदय, मध्यंतरी कृषी विकास महामंडळाकडील मोकळी पडून राहिलेली कसदार जमीन नव्याने कायदा आणून पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळाला देऊन टाकण्यात आली . काद्याच्या बाबतीत मी आज या ठिकाणी जे काही म्हणत आहे ते कदाचित वेडेपणाचे असू शकेल. मंत्री महोदय कदाचित म्हणतील की आमच्या मनामध्ये असे काही नाही. आपण वेगळेच काही तरी सांगत आहात. या कायद्याच्या बाबतीत तुम्हाला आणि आम्हाला काय वाटते या पेक्षा या कायद्याचा वापर करणारे अधिकारी त्याचा कसा वापर करतात आणि त्यामधून कोणत्या गोष्टी जन्माला घालतात हे महत्वाचे आहे.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती माननीय श्री. मोहन जोशी)**

म्हणून या ठिकाणी "मालक" आणि "आस्थापना" हा शब्द आला आहे. या कायद्यातील अभिप्रेत असलेल्या अर्थाप्रमाणे ही बाब आता महानगरपालिकेपुरती मर्यादित राहिलेली नाही, नगरपालिकेपुरती मर्यादित राहिलेली नाही, जिल्हा परिषदेपुरती मर्यादित राहिलेली नाही, फायर ब्रिगेड पुरती मर्यादित राहिलेले नाही, दूध व पाणी वितरण करणाऱ्या यंत्रणेपुरती मर्यादित राहिलेली नाही, विधानपरिषदे पुरती मर्यादित राहिलेली नाही तर ज्या ठिकाणी कामगार आणि मालक यांचा संबंध आहे, त्या क्षेत्रापर्यन्त हा कायदा थेट पोहोचला आहे. त्यानुसार कलम 6 मध्ये म्हटले आहे की, "आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही आस्थापनेच्या हजेरीपटावर ज्याचे नाव आहे अशा कोणत्याही कामगारांच्या (बदली कामगार किंवा नैमित्तिक कामगार याव्यतिरिक्त)" या कलमामध्ये हे वाक्य अत्यंत हुशारीने टाकले आहे. मी मघाशी तात्पुरते लागलेले किंवा बदली कामगार यांच्या संदर्भात सांगितले.

मुंबईतल्या गिरण्या आता संपलेल्या आहेत, त्या गिरण्यांमध्ये एकेकाळी जातू कामगार होते. हा जातू कामगार दहा ते बारा वर्षे काम करीत रहावयाचा त्यानंतर त्याला गिरणी कामगार म्हणून मान्यता मिळावयाची. लोक आपल्याला जातू कामगार म्हणतात यामध्ये त्याला समाधान वाटत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होते. याचे कारण केव्हा तरी आपण गिरणी कामगार होऊ याची त्याला खात्री वाटत होती. तसेच, पुढे असे म्हटले आहे की, "अपरिहार्य कामबंदीला, वीज टंचाई किंवा नैसर्गिक आपत्ती यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणांमुळे मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास," म्हणजे हा कामगार संप करणार आहे असे त्या मालकाला वाटल्यास "त्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाव्दारे तसे करता येईल." सभापती महोदय, या कायद्याचे हात कारखान्याच्या मालकापर्यन्त पोहोचले आहेत. या कायद्यात कामगार पुढाऱ्यांसाठी देखील भयानक शिक्षा केलेली आहे. या कामगारांच्या पुढाऱ्यांना शिक्षा देत असतांना मालकाला फक्त 2 हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा दिली आहे, त्याला कधी तुरुंगवास होणारच नाही. परंतु तो कामगार उद्ध्वस्त होईल, देशोधडीला लागेल यादृष्टीने कायद्यात करण्यात आलेली तरतूद मला अतिशय गंभीर स्वरुपाची वाटत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. भाई जगताप आक्रमकपणे बोलतात तो त्यांचा स्वभाव आहे. माननीय सदस्य श्री. किरण पावसकर हे त्यांच्या स्वभावाप्रमाणे हळू बोलतात, थंडपणे बोलतात. माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे मुठी वगैरे आवळून बोलतात, कामगारांपुढे गेल्यानंतर केस पिंजारतात. आपण आजकाल दूरदर्शनच्या चॅनेलवर जावयास लागल्यापासून असे काही चालावयाचे नाही हे आपल्याला आता समजले आहे. आता माझ्यापुढे फक्त तुम्हीच आहात, तुरुंगात कोण कोण जाणार आहे? माननीय सदस्य श्री.किरण पावसकर जाणार नाहीत. हे कलम वाचण्यापूर्वी मी घटनेच्या कलमाकडे वळतो. घटनेच्या कलम 19 (क) मध्ये म्हटले आहे की, "सर्व नागरिकांसाठी," म्हणजे त्यामध्ये कामगार आणि मालक हे सुध्दा अभिप्रेत आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "सविसंग, अधिसंग वा संग बनविण्याचा" म्हणजेच त्यांनी इंग्रजीमध्ये असे म्हटले आहे की, "formation of associations or unions". म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, हा जो घटनादत्त अधिकार प्राप्त झालेला आहे त्यावर गदा आणणारे हे विधेयक आहे.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये कामगारांच्या पुढाऱ्यांकडून चिथावणी वगैरे देण्याबाबत शास्तीची तरतूद केली आहे. या बाबतीत कलम 8 मध्ये असे म्हटले आहे की, "या अधिनियमान्वये जो बेकायदेशीर असेल अशा संपास चिथावणी देणाऱ्या, त्यात भाग घेण्यास इतर व्यक्तींना उद्युक्त करणाऱ्या किंवा अन्य प्रकारे त्यांच्या पुर:सरणार्थ वागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यन्त असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यन्त असू शकेल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

एवढया दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील". म्हणजेच मालकाला सहा महिने कारावासाची शिक्षा आणि हजारो कामगारांच्या हक्कासाठी लढा देणाऱ्या कामगार पुढाऱ्याला मात्र एक वर्षाची कारावासाची आणि किंवा दोन हजार रुपये दंड किंवा दोन्ही शिक्षा सुनावल्या जातील. लाखो कुटुंबाच्या हिताकरिता एखाद्या वेळी चिथावणी देणे, बोलणे, भांडणे, झगडणे हे कामगार पुढाऱ्यांचे काम असते, कर्तव्य असते. याचे कारण घटनेने त्यांना दिलेल्या अधिकारानुसार ते आपल्या कामगारांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत असतात.

सभापती महोदय, त्यानंतर कलम 9 मध्ये "बेकायदेशीर संपाना वित्तीय सहाय्य देण्याबद्दल शास्ती" अशी तरतूद करण्यात आली आहे. या कलमाचे विश्लेषण कसे केले आहे या बाबत माननीय आमदार श्री. भाई जगताप यांच्याकडून मला मार्गदर्शन हवे आहे. या कलमात असे म्हटले आहे की, "या अधिनियमान्वये बेकायदेशीर असलेल्या संपाच्या पुरःसरणार्थ किंवा त्यास पाठिंबा देण्यासाठी जाणुनबुजून जी व्यक्ती कोणताही पैसा खर्च करील किंवा पुरवील तिला, दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यन्त असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयापर्यन्त असू शकेल एवढया दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील". सभापती महोदय, मला माननीय आमदार श्री. भाई जगताप यांचा स्वभाव माहीत आहे. मी असे काही कामगार नेते पाहिले आहेत की, अनेक कामगार संपावर गेल्यामुळे त्यांची उपासमार होते त्यावेळी त्या कामगारांचा घर खर्च चालावा म्हणून ते आपल्याकडील निधीमधून त्या कामगारांना काही आर्थिक मदत करीत असतात. याचा अर्थ ते संप फोडण्यासाठी मदत करतात असा होत नाही. एकदा संप सुरु झाल्यानंतर तो निर्णय होऊन मिटेल तेव्हा मिटेल, परंतु कामगारांची उपासमार होऊ नये म्हणून आपल्या तिजोरीमधून पैसे देणारे कामगार पुढारी या कायद्यातील तरतुदीनुसार दोषी ठरतील असे मला वाटते.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

या लोकांना पगार देऊ शकत नाही पण त्यांचा संसार उद्‌ध्वस्त होऊ नये या साठी महिन्याला 2-5 हजार रुपयांची मदत देण्यात येते आणि ही गोष्ट मुंबई महानगरपालिकेच्या युनियनचे अध्यक्ष श्री.शरद राव देखील करतात, आमच्या युनियनचे लोक त्यांना मदत करतात, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप सुध्दा अशा प्रकारे मदत करतात. अशा प्रकारे सगळयाच युनियन मदत करीत असतात. कारण युनियन पुढाऱ्यांना असे वाटते की, आपल्या आदेशामुळे जर हे कर्मचारी रस्त्यावर आले असतील तर अशा वेळी त्यांचा घरखर्च चालावा आणि त्यांना आपल्या घरामध्ये रेशन भरता यावे म्हणून ते त्यांना मदत करीत असतात आणि हे आपले कर्तव्य आहे या भावनेने करतात. परंतु आता तो दोष म्हणून धरला आहे. याबाबत सांगावयाचे तर आता कामगारांवर बंधन आलेच आहे, पण कामगार पुढाऱ्यांच्या बाबतीत अत्यंत निर्भत्सना करणारा असा....मला माफ करा पण हा शब्द संसदीय आहे की असंसदीय आहे हे मला माहिती नाही. पण याबाबत बोलताना "निर्भत्सना" हा एकच शब्द मला सूचत आहे. एखादे कर्तव्य करणाऱ्या माणसाला अशा प्रकारे कमी उल्लेखून त्याला शिक्षेस पात्र बनविणे ही त्याच्या कार्य कर्तृत्वाची निर्भत्सना ठरते असे मला वाटते.

सभापती महोदय, याठिकाणी शिस्तभंगाच्या कारवाई खेरीज कलम 7, 8 व 9 अन्वये करण्यात येणारी कारवाई असे म्हटलेले आहे म्हणजे पुन्हा कारवाई आहेच. यावरुन पहा हे सगळे कसे लाईन लावून पुढे चालले आहेत. याठिकाणी कलम 10 मध्ये असे म्हटलेले आहे की, "कोणतीही व्यक्ती तिच्या सेवेच्या किंवा नोकरीच्या अटी व शर्तीमुळे शिस्तभंगाच्या स्वरुपातील ज्या कोणत्याही कारवाईला किंवा तिच्या अनुषंगाने होणाऱ्या ज्या कोणत्याही परिणामाला उत्तरदायी होईल. त्या कारवाईला किंवा परिणामाला कलमे 7, 8 किंवा 9 याअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कारवाई मुळे बाधा पोहोचणार नाही व ती त्यांना अतिरिक्त म्हणून राहील." म्हणजे आता याठिकाणी कामगारांच्या, कामगार नेत्यांच्या विरोधामध्ये असा प्रवास सुरु झाला आहे. मग हा गुन्हा कसा आहे? याठिकाणी मालकाच्या बाबतीत उल्लेख केला नाही. जर त्याने अचानक टाळेबंदी केली किंवा बेकायदेशीरपणे कामगारांना कामावरुन काढून टाकले तर सहा महिने सजा आणि दोन हजार रुपये दंड करण्याचे यामध्ये आहे.पण यामध्ये कामगार पुढाऱ्यांच्या बाबतीत आणि कामगारांच्या बाबतीत कलम 11 मध्ये म्हटलेले आहे **"फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास याठिकाणी कायद्याच्या पलीकडे जाऊन सुमोटो अधिकार दिला म्हणजे फौजदारी संहितेच्या पलीकडे जावयाचे. एखाद्या व्यक्तीने जर या**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . . .

**अधिनियमाखाली कोणताही अपराध केला असेल असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल म्हणजे त्याने तसे केले आहे असे नाही पण केवळ संशय, अशा कोणत्याही व्यक्तीस, अधिपत्राशिवाय (वॉरंट) अटक करता येईल."** अशा प्रकारचा अधिकार फौजदारी आचारसंहिता बाजूला सारुन पोलिसांना पूर्णपणे दिलेला आहे. म्हणून या विधेयकावर बोलत असताना मी सुरुवातीलाच म्हटले की, या देशातील स्वतंत्र नागरिकांना या घटनेने अधिकार दिलेला आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या संदर्भात आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी जे काही उद्‌गार काढले आहेत, त्याच्या बरोबर विरुध्द हा कायदा समोर आलेला आहे. या देशातील लोकशाही वाचविण्याचे महान कार्य करणाऱ्या आदरणीय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावर स्मारक व्हावे म्हणून आम्ही ठराव मांडला आणि सर्वांनी हूं की चूं न बोलता तो एकमताने संमत केला.कारण याबाबत काही बोलण्याचा प्रश्नच येत नाही, तो एक आदराचा विषय होता. परंतु त्याच संविधानाची ऐशी की तैशी करणारा कायदा येतो, कारण ते चालूच आहे. त्यांनी या कायद्यावरील चर्चा थांबवूनच निवेदन केले. हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान आहे काय ? श्री.अण्णा हजारे हे दिल्लीला गेले आणि त्यांनी उपोषण केले. पण ते कोणाला थांबवता आले नाही. याचे कारण काय ? कारण याबाबत संविधानाने अधिकार दिलेला आहे. मला या राज्यात, देशात आंदोलन करण्याचा अधिकार आहे पण ते विध्वंसक असता कामा नये, कायदा हातात घेणारे असता कामा नये. म्हणून हा देश महात्मा गांधी यांचा आहे असे म्हटले जाते. महात्मा गांधीच्या माध्यमातून कोणत्याही बाबीसाठी आंदोलन करुन त्याचा निषेध व्यक्त करण्याचा या देशाच्या घटनेने पूर्णपणे अधिकार दिलेला आहे. मग जर एखाद्या कामगाराने आपल्या हितासाठी, आपल्या भवितव्यासाठी, आपल्या मागण्यांसाठी अशा प्रकारचे वर्तन केले तर या कायद्यामध्ये सर्वांना म्हणजे कारखाने, अमुक-तमुक किंवा औद्योगिक क्षेत्र इ.आणले असून आता अत्यावश्यक काय आहे हे सरकार ठरविणार आणि याबाबत निर्णय घेणार. मग त्याप्रमाणे या कायद्याचा अंमल होणार आहे.

सभापती महोदय,कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर मग ते या अत्यावश्यक बाबींमध्ये आणणार. मग मालक नोटीस देणार. म्हणून यामध्ये विधी मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा समावेश करण्याबाबत माझा आक्षेप आहे. आम्ही येथे पहातो आणि आपल्यालाही माहिती असेल. याविषयी याठिकाणी सदनातील कोणीच असहमत असणार नाही. मला कधी-कधी तर असा प्रश्न पडतो

की, जर या विधीमंडळामध्ये नवरा-बायको काम करीत असतील तर ते घरी काम कसे करीत असतील? कारण दोघांनाही घरी जाण्यास उशीर होतो. या कार्यालयातील महिला देखील उशीरा घरी जातात. अशा वेळी तुम्ही आमच्या विधीमंडळाच्या कर्मचाऱ्यांवर देखील बंधन आणले. येथील कर्मचाऱ्यांनी कधी संप केल्याचे मला आठवत नाही. अशा प्रकारे संप कधी केला आहे की नाही हे मी त्यांना आता येथून विचारु शकत नाही. पण माझ्या आठवणीमध्ये येथील कर्मचाऱ्यांनी कधीच संप केलेला नाही. आता सदनामध्ये जर सन्माननीय माजी सदस्य श्री.बी.टी.देशमुख असते तर असे काही झाले आहे की नाही याबाबत 50 वर्षातील आठवणी सांगू शकले असते. तेव्हा या कायद्याच्या अंतर्गत कोणाला आणावयाचे आहे? मंत्रालयातील सरकारी अधिकारी दुखावतील म्हणून येथील कर्मचाऱ्यांनाही बरोबर घेऊ या. मला वाईट वाटले. याबाबतीत मी माननीय मंत्री महोदयांना दोष देणार नाही.कदाचित तुमच्याही ही बाब लक्षात आली नसेल.पण जीवनामध्ये मी कडवटपणा जपणारा माणूस आहे. कधी-कधी ते योग्य किंवा अयोग्य असू शकते.

सभापती महोदय, आज माननीय सभापतींना सदनामध्ये स्वत:च्या बाबतीत सूचना मांडण्याची वेळ आली. मला असे वाटते की, स्वातंत्र्यानंतर एखाद्या कायद्यामध्ये स्वत:च्या संदर्भात सूचना मांडण्याची वेळ पहिल्यांदाच आली असावी. एवढे बेदरकारपणे होत असेल तर ते बरोबर नाही. असा कायदा करणारे विधी विभागाचे बेदरकार सचिव कोण आहेत? त्यांना जाब विचारावा, ज्यांनी इंग्रजीचे मराठीमध्ये भाषांतर केले त्या संबंधित खात्याच्या सचिवांना विचारा. याठिकाणी अवमान झाला आहेच. पण माननीय सभापती यांनी सांभाळून घेतले आणि कायद्यामध्ये तरतूद असल्यामुळे ते आता सगळे बदलतील. पण ज्यांच्यामुळे हे सर्व घडले, त्यांना तुम्ही किमान विचारणार आहात की नाही? निवडणुकीबाबत घोळ घालणाऱ्या अधिकाऱ्यांना जसा जाब विचारण्यात आला तसे संबंधितांना विचारणार आहात की नाही? असे होता कामा नये, कारण ही अत्यंत गंभीर बाब आहे. याबाबतीत आम्हाला सदनामध्ये संबंधितांच्या नावानिशी कळले पाहिजे की, अमुक नावाच्या अधिकाऱ्यावर सरकारने कारवाई केली आहे. कारण आमच्याकडून जरा काही चूक झाली तर आम्हाला येथे निलंबित केले जाते. माननीय सभापतींचा शाब्दिक अवमान केला ही अत्यंत गंभीर बाब आहे आणि त्यामुळे काल पाच सन्माननीय सदस्यांना निलंबित करण्यात आले. म्हणून चारही बाजूने गुलामगिरी निर्माण हा कायदा आणलेला आहे.

सभापती महोदय, मात्र या कायद्यातील काही तरतुदींची गरज आहे.शासनाला अत्यावश्यक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सेवेबाबत काही अधिकार असले पाहिजेत हे मान्य आहे.पण ते किती असावेत? ते अमर्याद असावेत काय ? हा वादाचा विषय आहे. मी आता माझे भाषण आवरते घेतो. या विधेयकावर बोलण्यासारखे खूप आहे.याबाबत कितीही बोलले तरी ते संपणार नाही.पण भाषण संपवित असताना या कायद्याला आमचा ठाम विरोध आहे असे माझे मत मांडतो आणि मी आजच सांगतो की, आपण ज्यावेळेला "अनुकूल" आणि "प्रतिकूल"अशी सदनामध्ये विचारणा कराल तेव्हा आमचे "अनुकूल" मत नोंदविण्यास विसरु नका आणि फक्त कागदावरील बघून वाचू नका. आमच्याकडेही थोडे लक्ष द्यावे. आम्ही "पोल""पोल" म्हणेपर्यंत थांबू नका हे आजच जाहीर करतो. आमचा याला विरोध असेल आणि आम्ही मतदानाच्या वेळी हा विरोध स्पष्टपणे दाखवू. धन्यवाद.

----

. . . .वाय-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

20-12-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Y-5

APR/ 15:35

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी विधेयक क्रमांक 43 बाबत विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी हे विधेयक वाचले आणि कालपासून पहात आहे. परंतु मनामध्ये अनेक शंका येत आहेत. पहिली सहज शंका मनामध्ये येते की, आम्ही पुरोगामी महाराष्ट्र म्हणून मिरवत आहोत आणि अशा या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे विधेयक येऊ शकते काय? येथे कामगार आणि मालक यांच्यातील संघर्ष जगाच्या सुरुवातीपासून सुरु आहे आणि तो जगाच्या अंतापर्यंत रहाणार आहे. पण कामगार हा गुलाम नसतो तर तोही एक माणूस असतो. त्यालाही भारतीय घटनेने सर्व अधिकार प्रदान केलेले आहेत. मात्र आपण याठिकाणी घटनेच्या विरोधात कायदा करीत आहोत आणि त्यामधून आपण त्याच्या हक्काचा, अधिकारांचा संकोच करीत आहोत या विषयाकडे लक्ष देण्याची नितांत आवश्यकता होती. हे सर्व करीत असताना या विधेयकाचे जे शीर्षक आहे, त्यामध्ये "विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक" असे म्हटलेले आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे ..... 15:45

श्री. भगवान साळुंखे..

या विधेयकाचे शीर्षक लक्षात घेतले तर अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याकरिता तरतूद असे म्हटले आहे. या दोन घटकांचा विचार केला तर त्याची यादी या विधेयकात देता आली असती. अत्यावश्यक सेवा या-या आहेत आणि या सेवा सोडून उर्वरित सेवा असा उल्लेख करता आला असता परंतु जाणीवपूर्वक या विधेयकाची व्याख्या करीत असताना खंड 2. मध्ये (क) व (ख) आणि त्यामध्ये (एक), (दोन), (तीन), (चार) असे भाग केलेले आहेत. प्रामुख्याने (चार) आणि (पाच) मध्ये सर्वच सेवा अंतर्भूत केलेल्या आहेत. महात्मा गांधी यांनी असहकाराचे तत्व दिले. आंदोलनाचे तत्व दिले. सविनय कायदेभंगाचे तत्व दिले. त्यातून स्वातंत्र्य प्राप्त झाले आणि संपूर्ण जगाला संदेश देण्यात आला की, आपले म्हणणे विशिष्ट पध्दतीने मांडून ते जर मान्य झाले नाही पण त्यामध्ये जर योग्यता असेल तर ते मांडण्यासाठी आग्रह धरणे आणि तो आग्रह धरण्याचा भाग म्हणून आंदोलन, असहकार, सविनय कायदेभंग वगैरे सगळे त्यामध्ये अंतर्भूत आहे.

सभापती महोदय, कामगार वर्ग सहजासहजी उठला आणि लगेच संपावर गेला, उठला लगेच लाक्षणिक उपोषणाला बसला, उठला आणि लगेच काळयाफिती लावल्या असे कधीही होत नाही. तो जेव्हा कामाला लागतो तेव्हा तो प्रोढावस्थेला आलेला असतो. त्याची रोजीरोटी त्याच्याशी निगडित असते. मी जे काम करीत आहे त्याचे मी दाम घेतो आणि मी जो दाम घेतो त्यासाठी मला काम केले पाहिजे, याचे भान त्याला असते. पण जेव्हा त्याच्या असे लक्षात येते की, मला कमी वेतन दिले जात आहे, पण काम जास्त करुन घेतले जात आहे, माझ्यावर अनेक प्रकारचे जुलूम केले जात आहेत त्यामुळे मी अडचणीत येत आहे तेव्हाच तो कामगार संघटनेच्या माध्यमातून असेल किंवा व्यक्तिगत पातळीवर आपले म्हणणे मांडण्यास तयार होतो. व्यक्तिगत पातळीवर आपले म्हणणे मांडल्यानंतर एक व्यक्ती कोणत्याही प्रश्नाला वाचा फोडू शकत नाही म्हणून ती व्यक्ती समुहाबरोबर वाचा फोडण्याचा प्रयत्न करते त्याला संघटना असे म्हणतात. या सभागृहातील बहुसंख्य माननीय सभासद कोणत्या ना कोणत्या तरी संघटनेच्या माध्यमातून अनुभव घेत या ठिकाणी आलेले आहेत. आपण संघटना करतो, मग कामगारांनी संघटना करुच नये, आपले म्हणणे मांडूच नये, असाच अर्थ या संबंध विधेयकातून ध्वनित होत आहे. म्हणून घटनेने प्रदान केलेल्या संघटना विषयक अधिकारावर अतिक्रमण करणारे हे विधेयक आहे, असे माझे ठाम व स्पष्ट मत आहे. म्हणून हे विधेयक घटना विरोधी आहे. एका अर्थाने ते मागेच घेतले पाहिजे.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे. . .

पण विधानसभेने पारित केलेले असल्यामुळे आता त्या विधेयकाला आपण केवळ दुरुस्त्या सुचवू शकतो, हे मी समजू शकतो.

सभापती महोदय, या विधेयकामध्ये ज्या शिक्षेच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्या अशा आहेत की, "एक वर्षाचा कारावास, दोन वर्षाचा कारावास आणि टाळेबंदी करणाऱ्याकरिता सहा महिन्याचा कारावास." टाळेबंदी करणे यामध्ये टाळेबंदी करण्याच्या कारणांचा शोध घेण्याची तरतूद या विधेयकामध्ये नाही किंवा याचे अधिकार पोलीस विभागाला देण्यात आलेले आहेत. त्यामुळे पोलीस विभाग इंडियन पिनल कोडच्या पध्दतीने चौकशी करणार असेल तर त्या कामगारांना कसा न्याय मिळणार? हा ही मोठा प्रश्न निर्माण होतो. म्हणून मी या विधेयकाचा अमानवी विधेयक असाचा उल्लेख करीन. या विधेयकामध्ये असलेल्या तरतुदी या कामगारांवर, नौकरशाहीवर आणि जे कोणी काम करीत आहेत, त्यांच्या सर्व अधिकारावर गदा आणणाऱ्या आहेत. म्हणून त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरुध्द त्यांना बोलण्याचे, विषय मांडण्याचे असलेले स्वातंत्र्य हिरावून घेणारे हे विधेयक आहे. या विधेयकाला विरोध करणे हे मी माझे कर्तव्य मानतो व माझे भाषण पूर्ण करतो.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, मी नेमक्या तीन-चार मुद्यांवर बोलणार आहे.

सभापती महोदय, अत्यावश्यक सेवांच्या कायद्यात काही बदल सुचविण्यात आलेले आहेत. मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे की, एका अस्तित्वात असलेल्या कायद्याचा गैरफायदा घेऊन कामगारांना, कामगार चळवळीला किंवा कामगारांच्या अस्तित्वात असलेल्या कायद्यालाच बगल देण्याची भूमिका विशद करण्यात आलेली आहे, याचे मला आश्चर्य वाटते तसेच चिंतासुध्दा वाटते. या विधिमंडळाने अनेक कायदे केलेले आहेत. लोकोपयोगी कायदे केलेले आहेत. हा कायदा करण्यात येत असताना अत्यावश्यक सेवांच्या संदर्भात एक कायदा अस्तित्वात आहे. त्या कायद्यातील त्रुटी दूर करणे हे मी समजू शकतो. त्या कायद्याचा आपल्याला वाईट अनुभव आलेला आहे हे ही मी समजू शकतो. मी कर्मचाऱ्यांचा आणि कामगारांचा प्रतिनिधी असलो तरी सांगू इच्छितो की, कित्येक वेळेला आतताईपणे अनेक घटना घडलेल्या आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये झालेल्या संपाचा विचार केला तर मुंबई महानगरपालिकेमध्ये नेमके पावसाळयाच्या तोंडावर संप करण्यात येतात. त्यामुळे त्या संपाचे समर्थन कोणीही करणार नाही. आम्ही कामगार क्षेत्रातील असलो, कामगार नेते असलो तरी आम्ही देखील समर्थन करणार नाही. आपल्याकडे वर्षभर वेळ असताना आणि त्यावर चर्चा करण्याची संधी असताना, त्या बाबतीत आपली भूमिका मांडण्याचा आपला हक्क अबाधित असताना, अगदी पावसाळ्याच्या तोंडावर संपूर्ण शहरातील लोकांना वेठीस धरणे हे माझ्या सारख्या कामगार नेत्याला कधीही मान्य नव्हते आणि या पुढेही राहणार नाही. परंतु या एका गोष्टीचा आधार घेऊन या कायद्यामध्ये जे बदल सूचविण्यात आलेले आहेत ते केवळ अन्यायकारक नाहीत तर ते अतिशय घातकसुध्दा आहेत, हे मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी बऱ्याच गोष्टींचा परामर्ष घेतलेला आहे मी त्या बाबतीत खोलात जाणार नाही. परंतु या कायद्यामध्ये जे महत्वाचे बदल सुचविलेले आहेत त्यातील मला आश्चर्यचकीत करणारा बदल असा आहे की, या राज्याचे जसे कामगारांसाठी कायदे आहेत तसेच या देशाचे सुध्दा आहेत. इंडस्ट्रिअल डिस्प्युट ॲक्ट, हा कामगार चळवळीचा आत्मा आहे. त्यामध्ये जरी काही तरतुदी असल्या तरी त्या तरतुदी डावलून कायदा कसा करता येईल? कोणाच्या सुपीक बुध्दीतून हे निघाले आहे, हे मला कळत नाही.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.. .

आमची बुध्दी कदाचित तुमच्या इतकी तीव्र नसेल परंतु आमचा अनुभव नक्कीच तुमच्यापेक्षा जास्त आहे. आमचा अनुभव आम्ही कासोटीवर घासून घेतलेला आहे. मी 24 वर्षापासून कामगार चळवळीत काम करीत आहे. माझे सहकारी 20-20 वर्षे काम करीत आहेत. आम्हाला आलेल्या अनुभवातून मी बोलत आहे. मी माननीय मंत्री महोदयांचे लक्ष या विधेयकाच्या खंड 12 कडे वेधू इच्छितो. यामध्ये असे म्हटले आहे की,"मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, 1946, औद्योगिक विवाद अधिनियम, 1947 किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यात, या अधिनियमाच्या किंवा तदन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही अंतर्भूत असले तरीही," सभापती महोदय, हे कसे शक्य आहे?  या देशातील कामगार चळवळ ही 131 वर्षांची जुनी चळवळ आहे. ज्या कामगारांनी आपले रक्त सांडून, आपली डोकी फोडून कित्येक वेळा संघर्ष करुन हे कायदे अस्तित्वात आले, हे सर्व कायदे बाजूला ठेवून, कारवाई करण्यात येणार असेल किंवा तसे अधिकार देण्यात येणार असतील तर ते कसे देता येतील? एखादा नवीन कायदा करण्यात येत असताना आलेला अनुभव वाईट असेल परंतु तो अनुभव वाईट आहे म्हणून अस्तित्वात असलेली सर्व यंत्रणा मोडीत काढावयाची आणि नवीन कायदा तयार करावयाचा, अशा प्रकारचा हेतू यामधून सूचित होतो तो अयोग्य आहे, हे मला  मुद्दाम सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, या कायद्यात संपाच्या बाबतीत मोठया प्रमाणात भाष्य करण्यात आलेले आहे पण टाळेबंदी बाबत फक्त एका वाक्यात भाष्य करण्यात आलेले आहे. कामगारांनी काय करु नये, कामगार नेत्यांनी काय करु नये, कामगारांनी हे करु नये, ते करु नये, हे सर्व ठीक आहे. तसे कायदे आज ऑलरेडी आहेतच. मद्रास हायकोर्टाने संप बेकायदेशीर आहे असे रुलिंगच दिलेले आहे, ते तुम्हाला आणि आम्हाला नाकारता येणार नाही. सुप्रीम कोर्टानेसुध्दा काही अंशी अशा प्रकारचा सूर लावून निर्णय दिलेले आहेत. असे असताना टाळेबंदीच्या बाबतीत या कायद्यामध्ये असे भाष्य करण्यात आलेले आहे की, "कोणताही मालक, आस्थापनेच्या संबंधात, या कलमान्वये अवैध असणारी टाळेबंदी सुरु करील, चालू ठेवील किंवा अन्य प्रकारे तिच्या पुर:सरणार्थ वर्तणूक करील तर, तो, दोषसिध्दीनंतर, सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढया कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढया दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल." शिक्षा ही सिम्बॉलिक असावी, या मताशी मी काही अंशी सहमत होईन.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भाई जगताप ...

गुन्ह्याच्या एकंदरीत तीव्रतेच्या दृष्टीने मी त्याच्या बाबतीत सहमत होईन. त्यांनी कामगारांवर एखादी कारवाई करावयाची आणि त्यांची कारवाई किंवा त्यांनी एखादे उचललेले पाऊल बेकायशीर सिध्द झाल्यानंतरच शिक्षा होते याचे मला चांगले ज्ञान आहे. परंतु अशा प्रकारची टाळेबंदी बेकायदेशीर सिध्द झाल्याची एकही घटना झालेली नाही. फक्त मी एक केस लढलो होतो ती मला माहीत आहे. ती ओटीस एलिव्हेटरची केस ही या देशातील 131 वर्षाच्या कामगार चळवळीमधील एकमेव घटना आहे की, ज्यामध्ये आम्ही सुप्रीम कोर्टापर्यंत दावे दाखल केले आणि ती टाळेबंदी बेकायदेशीर आहे असे सिध्द करु शकलो. ही संपूर्ण देशातील एकमेव घटना आहे. आता जर असे झाले तर यांना शिक्षा तर दूरच राहिली. अशा प्रकारे टाळेबंदी करावयाची, आम्हाला कामगार नको, त्यांच्याकडून लिहून घ्यावयाचे की, आम्ही काम करु, एवढेच नव्हे तर आपण सांगाल ते काम करु, काही कामगारांना हेतुपुरस्सर बाहेर ठेवावयाचे आणि मग कॉन्ट्रक्ट पध्दतीच्या कामगारांना मागच्या दाराने घुसवावयाचे, असे धोरण सर्रास मालक मंडळी अवलंबित आहेत.

आपल्याकडे अत्यावश्यक सेवेचा कायदा सुस्पष्ट आहे. फॅक्टरीमध्ये सुध्दा जर बॉयलर अटेंडन्ट असेल तर तो अत्यावश्यक सेवेमध्येच येतो. फॅक्टरीमध्ये सुध्दा अशी काही खाती आहेत की जी अत्यावश्यक सेवेमध्ये येतातच. मग आता याचा आडोसा घेऊन सगळ्या कामगारांना यामध्ये भरडण्याचा हा कसला डाव आहे, हे मला खरोखरच न कळण्यासारखे आहे. या टाळेबंदीच्या बाबतीमध्ये सुध्दा आपण यामध्ये आणखी एक फार हुशारी केलेली आहे की, दोषसिध्दीनंतर सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षास पात्र ठरेल. यामध्ये 'किंवा' शब्द कशाला पाहिजे ? जर दोष सिध्द झाला तर यामध्ये 'किंवा' शब्द कशाकरिता ? त्याने दोन हजार रुपये भरावयाचे आणि सांगावयाचे की, मी हे केले, असे कसे चालेल ? जर एवढा मोठा गंभीर गुन्हा जो हजारो कामगारांच्या आयुष्याशी निगडित आहे, राज्याच्या विकासाशी निगडित आहे, देशाच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे, त्या मालकांनी टाळेबंदी करावयाची आणि दोष सिध्द झाल्यानंतर त्यांनी दोन हजार रुपये भरुन निसटून जावयाचे, हे कसे काय चालेल ? म्हणून तो

..2...

RDB/

श्री. भाई जगताप ....

'किंवा' शब्द त्या ठिकाणी नसावा. त्या दोन्ही शिक्षा एकाच वेळी त्याला लागू असाव्यात. मी असे म्हणणार नाही की, सहा महिन्याची शिक्षा सहा वर्षाची करा. मी असे म्हणालो की, शिक्षा सिम्बॉलिक असली पाहिजे. परंतु त्या शिक्षेची जरब किंवा त्याची भीती ही त्या कामगारांना, कर्मचाऱ्यांना किंवा त्या मालकाला असेल. ती भीती राहावयास पाहिजे. त्यामुळे या ठिकाणी 'किंवा' शब्दाच्या ऐवजी 'व' असा शब्द आला पाहिजे जेणेकरुन या दोन्ही गोष्टी लागू होतील.

दोन हजार रुपयांच्या दंडाची जी तरतूद केलेली आहे त्याबाबत माझी आपल्याला विनंती आहे की, तो दंड 2 लाख रुपयांपर्यंत असला पाहिजे जेणेकरुन त्यांना कोठे तरी याची झळ पोहोचली पाहिजे. त्यांना असे वाटता कामा नये की, हा दंड तर काहीच नाही. ते ताजमहाल हॉटेलमध्ये बसले तर 2 हजार रुपयांचा एक चहा पितात. त्यांच्यासाठी दोन हजार रुपये हा मोठा विषय नाही. त्यामुळे या दोन्ही शिक्षा एकत्रितरीत्या कामगारांसाठी सुध्दा आणि मालकांसाठी सुध्दा असाव्यात. मी यामध्ये दुजाभाव अजिबात करणार नाही. कामगार जर बेशिस्त असेल किंवा त्याची बेशिस्ती शाबित झाली असेल तर त्याला सुध्दा पाठीशी घालण्याची भूमिका आम्ही घेणार नाही. कारण आज या देशामध्ये किंवा या कामगार चळवळीमध्ये बदलत्या परिस्थितीनुसार आम्ही आमची मते किंवा आम्ही आमच्या पध्दती सुध्दा बदललेल्या आहेत. आपणा सगळ्यांना हे जाणवत असेल, आपल्याला माहीत असेल. आपण सगळे या प्रवाहातील आहोत. मल्टी स्किलींग हा विषय या देशामध्ये कधीच नव्हता. आपण ग्लोबलायझेशन स्वीकारल्यानंतर फार मोठा गहजब या देशामध्ये झाला. अनेक लोकांनी त्यावर मते प्रदर्शित केली, विरोध केला. डाव्यांनी तर त्यावर संसदेत आणि तत्सम सगळ्या राज्यांमध्ये प्रचंड गहजब केला. पण या राज्यातील सगळ्या कामगार पुढाऱ्यांनी कामगारांना हे सांगण्याची हिंमत सुरुवातीपासून ठेवली की, आपल्याला काळानुसार बदलावे लागेल. एका पुरोगामी राज्याचे नेतृत्व करीत असताना, पुरोगामी राज्याच्या कामगारांचे नेतृत्व करीत असताना या सगळ्या गोष्टी आपल्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे आणि त्या दृष्टीने आम्ही आपल्याला विनंती करीत आहोत.

या ठिकाणी आणखी एक जी महत्वाची गोष्ट आहे त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. पण त्यांनी सांगितले की, भाई, आपण यावर सविस्तर बोलावे. यामध्ये एक गोष्ट आपण

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप .....

लक्षात घ्यावी की, संप असेल, टाळेबंदी असेल किंवा काम बंद आंदोलन असेल याला काही तरी कारण असल्याशिवाय ते होत नाही. कारण हा कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा एका कामगाराचा प्रश्न नसतो. तो सार्वजनिक प्रश्न असतो. ज्या घटनेच्या कलमाचा त्यांनी उल्लेख केला त्या कलमाने आम्हाला तो अधिकारच दिलेला आहे. आज घटना बाजूला ठेऊन आपल्याला दुसरा कायदा बनविता येणार नाही. घटनेला अपेक्षित असलेला, अभिप्रेत असलेलाच कायदा आपल्याला बनवावा लागेल. घटनेच्या विपरित कायदा आपल्याला बनविता येणारच नाही, असा माझा ठाम विश्वास आहे. म्हणून आज ज्यावेळेला अशा प्रकारची आंदोलनाची भूमिका कामगार घेत असतात किंवा कामगार पुढारी घेत असतात व ज्यावेळेला ते आंदोलन एका मर्यादेपेक्षा जास्त वेळ चालते त्यावेळेला त्यांच्या संसाराचे काय होणार याचा कधी तरी कोणी विचार केला आहे का ? मला आठवते की, स्व. डॉ. दत्ता सामंत नेहमी सांगावयाचे की, सहा महिन्याचे रेशन भरुन नंतरच माझ्याकडे या. याला आपण चिथावणी समजणार का ? उद्या जर आम्ही किंवा आमच्यापैकी कोणीही तसे सांगितले, कोणी कामगार पुढाऱ्यांनी जर सांगितले की, अलीकडच्या काळामध्ये आपल्याला फार जपून आंदोलने करावी लागतील आणि तुमची मानसिक तयारी असली पाहिजे तर ही आमची चिथावणी झाली का ? अशा वेळेला यामध्ये आपण नमूद केलेले आहे की, त्यांना आर्थिक मदत करणाऱ्या लोकांना सुध्दा दोषी समजून त्यांच्यावर कारवाई करणार ? ही कारवाई कशी काय करणार हे मला समजत नाही. मग जर कोणतीही युनियन असेल किंवा त्यांचा कोणताही नेता असेल, जर उद्या कामगारांची मुले रस्त्यावर येत असतील, त्यांच्या मुलांची फी भरली जात नसेल, त्या कामगाराचा मुलगा जर शाळेतून काढला जात असेल आणि त्याला एखाद्या संघटनेने मदत केली, एखाद्या नेत्याने मदत केली तर आपल्या दृष्टीने तो दोषी ठरणार आहे. मग जर त्याला त्यामध्ये तुम्ही दोषी ठरवून शिक्षेचे प्रावधान करीत असाल तर ते अयोग्य आहे. ही जी काही कलमे आहेत ती यातून पूर्णत: वगळण्यात यावीत अशी माझी आपल्याला नम्र विनंती आहे.

या ठिकाणी आणखी एक गोष्ट मला मुद्दाम सांगावीशी वाटते. यामध्ये कलम 11 मध्ये "फौजदारी प्रक्रिया 1973 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी" असा उल्लेख केलेला आहे. म्हणजे

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. भाई जगताप ....

आपल्याकडे तसा कायदा आहे. "कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास एखाद्या व्यक्तीने या अधिनियामाखालील कोणताही अपराध केला आहे असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अधिपत्राशिवाय (वॉरंट) अटक करता येईल." या बाबतीत मला वेगळा शब्द वापरावयाचा आहे पण मी तो शब्द वापरणार नाही. मी अडचणीत येणार नाही, कामगारांच्या बाबतीत तर अजिबात येणार नाही. कष्टकऱ्यांच्या बाबतीत जरी मी अडचणीत आलो तरी बेहतर पण मी माझी मते मांडणार. काहीही जरी झाले तरी तुम्हाला हे करता येणार नाही. आपण नवीन कायद्याचे गठन करीत असताना असलेले अधिकार जर काढून घेत असाल तर ते योग्य नाही. कायद्याची प्रक्रिया आपणा सर्वांना ज्ञात आहे. एखादा कायदा जर कालबाह्य होत असेल तर त्यामध्ये आपण सुधारणा करतो आणि तो कायदा अधिक चांगला आणि प्रभावी बनवितो. परंतु यामध्ये कायदा प्रभावी बनविण्यासारखे काही नाही. म्हणून ही सगळी कलमे अंतर्भूत करुन जर हे विधेयक येत असेल तर मी सरकार पक्षाचा जरी असलो तरी याला माझा विरोध आहे. ही जी तीन-चार कलमे आहेत त्याला माझा ठाम विरोध आहे.

आताच्या परिस्थितीत फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 हा जो पोलिसांचा कायदा आहे किंवा अधिनियम आहे, त्यानुसार त्यांना अधिकार आहेत आणि ते असावयास पाहिजे. तो अधिकार आम्ही काढून घेत नाही परंतु तो अधिकार असताना सुध्दा अधिकचे जर तुम्ही असे काही दिले तर आज बाहेर जे मोर्चे आलेले आहे त्यांना दंडे लावून त्या सगळयांना आत टाकतील. मोर्चा काढण्याचा अधिकार सुध्दा राहणार नाही. कारण आपल्या दृष्टीने ते कायदा तोडल्यासारखेच झाले. म्हणजे जर उद्या आम्ही असे सांगितले की, आमचा प्रश्न सुटत नाही त्यामुळे आम्ही विधानसभेवर मोर्चा घेऊन जातो, युतीच्या काळामध्ये मी अनेकदा मोर्चे घेऊन गेलेलो आहे, आम्ही जर मोर्चा घेऊन जातो म्हटले तर उद्या जर हा कायदा लागू झाला किंवा या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाले तर आम्हाला तसे काहीही करता येणार नाही.

यानंतर श्री. गिते ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

राज्यातील कष्टकऱ्याच्या काही भावना आहेत, त्यांचा जो काही आवाज आहे, तो या विधेयकामुळे दबला जाणार आहे. कष्टकऱ्यांना आपल्या मागण्या कायदेशीरदृष्टीने मागण्याचा अधिकार या विधेयकातील तरतुदीमुळे राहणार नाही असे मला वाटते. या विधेयकावर मी अनेक तास बोलू शकतो. परंतु तसे मी करणार नाही. या कायद्यातील 8, 9,10,11 आणि 12 ही कलमे वगळण्यात यावीत अशी माझी शासनास विनंती आहे किंवा कायद्यातील त्या कलमांमध्ये जो बदल दर्शविलेला आहे, तो बदल नसावा अशी माझी स्पष्ट भूमिका आहे.

महोदय, या विधेयकाचा हेतू तितकासा शुध्द आणि स्पष्ट नाही असे मी मुद्दाम या ठिकाणी सांगू इच्छितो. अशा प्रकारचे विधेयक आणून शासन त्यांच्या मुलभूत अधिकारावर गदा आणत असाल तर कष्टकऱ्यांसाठी त्या तरतुदी अन्यायकारक होतील, पर्यायाने या देशाच्या औद्योगिक शांतीला, औद्योगिक विकासाला सुध्दा या माध्यमातून कोठे तरी खीळ बसेल याची शासनाने नोंद घ्यावी. मी मघाशी या विधेयकातील चार कलमांचा उल्लेख केला, त्यास मी विरोध दर्शवितो. हे विधेयक जसेच्या तसे स्वीकारले जाऊ नये, किंबहुना ते संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठवावे. त्या समितीमध्ये या विधेयकावर सखोल व व्यापक अशी चर्चा होऊ द्यावी. समितीमध्ये चर्चा करुन या विधेयकात अनेक गोष्टींचा अंतर्भाव करता येईल. म्हणून हे विधेयक संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात यावे अशी मी शासनास विनंती करतो आणि या विधेयकावरील माझे मनोगत पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र, जय कामगार.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन 2011 चे वि.स.वि.क्रमांक 43 वर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. विवक्षित अत्यावश्यक सेवा व समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्यासाठी तरतूद करण्याकरिता आणि त्याच्याशी संबंधित किवा तद्नुषंगिक बाबी यासाठी तरतूद करण्यासाठीचे हे विधेयक आहे. या विधेयकाच्या अनुषंगाने सन्माननीय ज्येष्ठ सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. या राज्यातील 50 टक्के लोकांसाठी असलेले हे विधेयक आहे. या विधेयकाची व्याखा एका वाक्यात सांगता येईल. त्यासाठी मी एक उदाहरण या ठिकाणी देऊ इच्छितो. पाण्याचे वागणे किती विसंगत असते, पोहणाऱ्याला बुडवून, प्रेताला तरंगत ठेवते. अशी परिस्थिती महाराष्ट्रातील कामगारांची आणि ट्रेड युनियन ॲक्टीव्हीटीज स्कील करण्याची आहे. या विधेयकाचा उद्देश चांगला असेल. अत्यावश्यक सेवांच्या बाबतीत, जनहिताच्या दृष्टीने सर्वसामान्यांना कोणत्याही संपाचा, कोणत्याही ट्रेड युनियन ॲक्टीव्हीटीजचा त्रास होऊ नये, त्यांचा उपद्रव होऊ नये. म्हणून सरकारने हे एक चांगले पाऊल उचललेले असावे. नाण्याला दोन बाजू असतात. एका बाजूला अधिकाऱ्यांनी चांगला अभ्यास केला असेल. पण दुसरी बाजू अधिकाऱ्यांनी न अभ्यास करता तशीच ठेवलेली आहे. हे जुने विधेयक होते, त्यात कालांतराने काही बदल आणावे लागतात,याची सगळयांना कल्पना आहे. पूर्वी संगणक नव्हते. संगणक आल्यानंतर त्यासंदर्भात सायबर लॉ करण्यात आला.

महोदय,आपण सायबर लॉ वर खूप अभ्यास केला आहे. त्या अनुषंगाने काही नियम बनविले आहेत. संगणकाच्या माध्यमातून लोकांना उपद्रव होऊ नये, कोणी त्यांना त्रास देऊ नये म्हणून सायबर लॉ आपण तयार केला आहे. यापूर्वी अत्यावश्यक सेवा होत्या, त्यावेळी देशात एक नारा होता. रोटी, कपडा आणि मकान असा तो नारा होता. पूर्वी अत्यावश्यक सेवा लिमिटेड होत्या. आता अत्यावश्यक बाबीत अन्न, वस्त्र आणि निवारा याच गोष्टी राहिलेल्या नाहीत. आपले अत्यावश्यक सेवेचे स्वरुप देखील मोठया प्रमाणात बदलले आहे. अत्यावश्यक सेवेमध्ये पूर्वी रुग्णालये होती, पोलीस विभाग होता, विमान सेवा होती, अग्निशमन दल होते, परिवहन होते. परंतु आता अत्यावश्यक सेवेमध्ये या अनेक गोष्टी आलेल्या आहेत. विजेची गरज आम्हाला मोठया

3..

प्रमाणात आहे. पाणी पुरवठयाची गरज देखील मोठी आहे. स्वच्छतेची गरज देखील तेवढीच आहे. मोबाईल फोनच्या सेवा ही बाब देखील आता अत्यावश्यक सेवेमध्ये आलेली आहे. एखादा विभाग कोणत्या तरी कारणावरुन बंद पडला आणि तिकडची हॉटेल्स बंद पडली तर पोलीस स्टेशनला सांगितले जाते की, हॉटेल्स हया अत्यावश्यक सेवेत येतात. कारण लोकांना हॉटेल्स बंदच्या दिवशी जेवण मिळू शकत नाही. या अत्यावश्यक सेवेमधून कोणीही सुटलेले नाही. या विधेयकामध्ये सेवेला महत्व दिलेले आहे. सेवेकरीला महत्व दिलेले नाही. त्याला शासन शिक्षा ठोठावणार आहे. आपण सेवेला महत्व देत आहात, परंतु त्यासाठी सेवेकरी नसेल तर कोणत्या जनतेला तुम्ही सेवा देणार आहात ? त्याला दोन वर्षे कारागृहात टाकणार असाल, दोन हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावणार असाल तर आपणाकडे सेवेकरी म्हणून सेवा करण्यासाठी कोण येईल हा एक महत्वाचा प्रश्न आहे.

महोदय, आम्ही आजपर्यंत ट्रेड युनियनमध्ये एकच बोलत होतो की, कंत्राट पध्दत बंद करा. या कंत्राट पध्दतीमुळे कामगारांची कंबर मोडली गेली. कंत्राट पध्दतीत एखादा 25 वर्षाचा मुलगा कामास लागला असेल तर तो वयाच्या 40 वर्षापर्यंत कंत्राट पध्दतीतच काम करतो. त्यानंतर त्यास कायम स्वरुपी नोकरीत सामावून घेतले जाईल की नाही हे त्याचे भविष्य अधांतरीच राहते. त्याला पी.एफ.मिळणार नाही, त्याला ग्रॅज्युटी मिळणार नाही, त्याला रिटायरमेंट बेनिफिट मिळणार नाहीत. या विषयी कोणी विचार करावा हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. प्रत्येक वेळी विधिमंडळाचे अधिवेशन सुरु होते, त्यावेळी कंत्राट पध्दतीने काही कर्मचारी घेतले जातात. अनेक वर्षापासून ते कंत्राट पध्दतीने काम करीत आहेत. त्या कर्मचा-यांना आपण कायम करु शकत नाही. कोणाचे सरकार येणार, कोण कर्मचारी कायम होणार, यासाठी त्यांचे वय थांबत नाही. त्या कर्मचाऱ्यांचे वय वाढत चालले आहे, त्या कर्मचा-यांना न्याय कधी दिला जाणार आहे ? कामगार आयुक्त, कामगार मंत्री, कामगार न्यायालय, इंडस्ट्रीयल डिस्प्युट शासनाला ठेवावयाचे नाहीत काय ? एकीकडे कंत्राट पध्दतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपण न्याय देऊ शकत नाही. कायम होण्यासाठी जे कर्मचारी न्यायालयात गेले आहेत, ते गेल्या 15 वर्षापासून लेबर कोर्टाच्या बाहेर उभे आहेत. एक मालक आपल्याकडून चार वकील पाठवित असेल. परंतु ट्रेड युनियनवाल्यांना एक, दोन वकील कोर्टात पाठवावयाचे असतील तर त्याची फी देण्यासाठी त्यांच्या नाकात दम येतो. यानंतरची परिस्थिती तर फारच भयानक असेल. विकसनशील देशाकडून एक मॅसेज आला होता. तो अतिशय

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर..

महत्वाचा होता. चिपर, बेटर ॲन्ड फास्टर. सगळीच माणसे चायनाच्या मागे धावली होती. त्यानंतर चायनाच्या प्रॉडक्टचे काय झाले ? कमीत कमी पैशांमध्ये, कमीत कमी वेळेमध्ये तुम्हाला सगळयाच गोष्टी जास्त प्रमाणात हव्या असतील तर त्याचा काही उपयोग नाही. पाच,दहा वर्षानंतर असे परिवर्तन झाले आहे की, माझ्या घरात प्रॉडक्ट नसले तरी चालेल, परंतु चायनाचे प्रॉडक्ट माझ्या घरी नको असे लोक आता म्हणू लागले आहेत. पाच, दहा वर्षात आपणाला असे म्हणावे लागेल की, आम्हाला सेवा हवी होती. परंतु सेवा करण्यासाठी आम्हाला सेवेकरीच मिळत नाही.

महोदय, संप करणाऱ्यांची बाजू मांडणाऱ्यांपेक्षा मी दुसरी एक बाजू या ठिकाणी मांडतो. या सभागृहात सन्माननीय सदस्यांनी कामगारांना वाचविण्यासाठी, कामगार संघटनांना वाचविण्यासाठी, कामगार संघटनांना मारक कसे आहे यादृष्टीने आपले विचार मांडले. मी त्यापुढे जाऊन सांगतो की, या विधेयकाच्या अनुषंगाने इएसआयएस सवलत आपण राज्यामध्ये देतो आहोत. परंतु त्या सवलतीचा लाभ खरोखरच कर्मचाऱ्यांना दिला जातो काय ? इएसआयएसचे पैसे बुडविणारे किती तरी आहेत ? पी.एफ.ची परिस्थती पहा, त्यासाठी व्हिजीलन्स विभाग ठेवावा लागला आहे. मालकांच्या मागे उभे राहून अशा प्रकारचा कायदा करणार असलो तर कर्मचाऱ्यांचा पी.एफ.चा शेअर न भरणारे अनेक उद्योजक आपणास मिळतील.पी.एफ.आयुक्तांच्या कार्यालयात गेलो तर अनेक फायली आपल्याला दिसून येतील. अनेक उद्योजक कर्मचाऱ्यांचे पी.एफ.आयुक्तांकडे भरत नाहीत. त्यामुळे नोकरी सोडल्या नंतर, सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना पी.एफ.ची रक्कम मिळत नाही. ॲक्सीडेंटल बेनिफिट असेल तर आजही एखाद्या युनियन लिडरला दरवाज्यावर जाऊन भांडावे लागते.

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.गिते 16:15

श्री.किरण पावसकर........

त्या पध्दतीने रिटायरमेंट बेनेफिट न मिळालेल्या अनेक कंपन्यांची नावे देता येतील. रिटायरमेंट नंतर पाच-पाच, सात-सात वर्षे कायद्याने देय असलेले फायदे कामगारांना मिळालेले नाहीत. त्यासाठी युनियन नेते भांडताना दिसतात. दुसरी बाजू मालकांची आहे. त्याबद्दल अनेकदा वृत्तपत्रातून वाचावयास मिळाले. बांधकाम व्यवसायाचे उदाहरण देता येईल. कोणत्याही कंपनीत अपघात झाल्यानंतर जर कामगाराला मृत्यू आला तर त्या कामगारांच्या वारसांना नियमानुसार देय असलेली कोणत्याही पध्दतीची मदत मिळत नाही. युनियन नेत्यांनी अशा वेळी काय करावे? ट्रेड युनियन नेते किंवा तेथे असलेल्या युनियनच्या नेत्याने कोणत्या पध्दतीने कामगारांना न्याय मिळवून द्यायचा? न्याय मिळवून देण्यास गेलो, उत्स्फूर्त बंद झाला तर पुन्हा ज्यांनी चिथावणी दिली त्याला दोन वर्षे कारावासाची शिक्षा होणार आहे. म्हणजे अपघातामुळे मृत्यू झालेल्या कामगारांच्या वारसांना न्याय मिळवून देण्यासाठी कोर्टात जा म्हणून सांगायचे का? त्यांना मिळणाऱ्या 5 ते 10 लाख रुपयांसाठी त्यांना वकिलाला 2-4 लाख रुपये फी द्यावी लागणार आहे. ही परिस्थिती या कायद्यामुळे येणार असेल तर होते ते कायदे चांगले असे कामगारांना म्हणावे लागेल. मालकांसाठी, मॅनेजमेंटसाठी किंवा आस्थापनांसाठी विरोध करण्याकरिता संप करावासा वाटतो तो संप करुं नये म्हणून हा कायदा करण्यात येत आहे. जेणेकरुन ट्रेड युनियन ॲक्टिव्हीटीमध्ये काम करणे शक्य होणार नाही असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, या कायद्याच्या कलम 8 मध्ये म्हटले आहे की, "या अधिनियमान्वये जो बेकायदेशीर असेल अशा संपास चिथावणी देणाऱ्या, त्यात भाग घेण्यास इतर व्यक्तींना उद्युक्त करणाऱ्या किंवा अन्यप्रकारे त्याच्या पुर:सरणार्थ वागणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, दोषसिध्दीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील" आणि माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी उल्लेख केल्याप्रमाणे अटक करण्यासाठी वॉरंटची गरज भासणार नाही. कलम 11 मध्ये म्हटले आहे की, अटक करण्यासाठी वॉरंटची गरज नाही. शासनाने पोलीस अधिनियम तयार केला आहे. तो अधिनियम पायदळी तुडविणार आहात. या देशामध्ये कोणालाही अटक करण्यासाठी वॉरंटची गरज असताना या कायद्यामध्ये अशी गरज पडणार नाही अशी तरतूद केली आहे. पोलिसांना असलेले अधिकार का काढून घेत आहात? या पध्दतीने काम होणार असेल तर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर........

मालकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी, मॅनेजमेंटविरुध्द संप करण्याची परिस्थिती का येते याचा विचार केला पाहिजे. अशी वेळ येऊ नये यासाठी उपाययोजना केल्या पाहिजेत. हे उपाय फक्त युनियन नेत्यांपुरते किंवा कामगार संघटनांपुरते केले जाणार असतील तर भविष्यामध्ये कोणतीही कामगार संघटना उभी राहणार नाही. मग ती संघटना शिक्षकांसाठी असो वा कामगारांसाठी असो. अशा संघटनेमध्ये कोणीही काम करु शकणार नाही.

सभापती महोदय, आज देशात जेट एअरलाईन्स किंवा एअर इंडियाकडे जेवढी विमाने आहेत तेवढ्या सायकली कोणाच्या घरामध्ये नसतील. जेट एअरलाईन्सकडे 120 एअरक्राफ्ट आहेत. कायद्याचे बोट दाखवून त्या कंपनीत काम करणारे सर्व कर्मचारी ऑन कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर घेतले जातात. कारण कंपनीची एअरक्राफ्टची संख्या वाढत गेली. त्या कंपनीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना हायर ॲण्ड फायर बेसीसवर हवे असेल तर काम करा किंवा निघून जा अशा परिस्थितीतून जावे लागत आहे. जास्तीत जास्त फायदा मिळविणारी कंपनी असताना तेथील कामगारांना आपण न्याय देऊ शकत नाही. अत्यावश्यक सेवेमध्ये एव्हीएशन इंडस्ट्रीचा अंतर्भाव असेल तर तेथे संप करणे शक्य होणार नाही, मोर्चे काढता येणार नाहीत, कंपनीच्या गेटसमोर कामगारांना बसता येणार नाही. आमचे नियम लागू होत नाहीत त्यामुळे तुम्ही केंद्र सरकारकडे जा असे सांगितले जाते. केंद्र सरकारकडे दाद मागण्यासाठी दिल्लीपर्यंत कामगार संघटना जाऊ शकत नाही. याचा अर्थ एव्हीएशन इंडस्ट्रीमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना तुम्ही न्याय देऊ शकणार नाही. त्यांना न्याय देण्यामध्ये ट्रेड युनियन कमी पडते आहे. एअर इंडियामध्ये तीच परिस्थिती आहे. महाराजा आता वाकत चालला आहे. तो महाराजा एवढा वाकल्यानंतर आता त्या कंपनीच्या 7 उपकंपन्या तयार झाल्या. यापूर्वी एअर इंडिया ही देशातील एक महान कंपनी होती. ज्या कंपनीचा या विधेयकावर बोलताना सभागृहात जरुर उल्लेख करावा लागेल. देशातील ही एकमेव कंपनी आहे, ज्या कंपनीने भारतीय क्रिकेट संघाचा कप्तान महेंद्रसिंग धोनी असेल, पद्मश्री धनराज पिल्ले असेल अशा महान खेळाडूंना आपल्या सेवेमध्ये घेण्याची परंपरा पाळली आहे. देशातील मान्यवर खेळाडूंना या कंपनीने आपल्या कुशीत सामावून घेतले. त्यांची आर्थिक बाजू सांभाळली. या कंपनीची परिस्थिती आज अतिशय खालावली आहे. आज एक कंपनी बरोबर चालत नसताना एअर इंडिया एक्स्प्रेस नावाची नवीन कंपनी काढण्यात आली. त्यानंतर आणखी

..3..



SGB/ पूर्वी श्री.गिते 16:15

श्री.किरण पावसकर........

एक तिसरी कंपनी काढली. नवीन कंपनी काढून एअर इंडियाला नेस्तानाबूत करण्यात आले. केंद्राचा अधिनियम आला त्या अधिनियमानुसार एव्हीएशन इंडस्ट्री अत्यावश्यक सेवेमध्ये आली. परिणामी त्या कंपनीत काम करीत असलेले सर्व खेळाडू आणि कर्मचारी सेवा सोडून निघून जातील आणि आता वेगवेगळ्या छोट्या कंपन्या स्थापन करुन कंपनी सुरु आहे असे वरवर दिसते. हीच परिस्थिती या विधेयकामुळे या राज्यात निर्माण होणार आहे. राज्यातील छोट्या छोट्या कंपन्यांची अशी अवस्था होणार आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचा एक लौकिक आहे. महाराष्ट्र राज्य औद्योगिक क्षेत्रात सर्वात पुढे आहे. मुंबई शहराकडे औद्योगिक नगरी म्हणून पाहिले जाते. संपूर्ण देशातून लोक आपल्या उदरनिर्वाहासाठी, चांगली नोकरी मिळविण्यासाठी या शहरात धाव घेत असतात. यापुढे कोणताही कामगार काम करण्यासाठी मुंबईत येण्यास धजावणार नाही. ट्रेड युनियनकडे कोणताही कामगार येणार नाही. ट्रेड युनियन ॲक्ट रद्द करण्याची वेळ येणार आहे. या कायद्यामुळे कामगारांसाठी लढा देण्याकरिता, कोणताही कामगार किंवा कामगारांचा नेता पुढे येणार नाही. एखादा कामगार कंपनीतील अपघातामुळे मृत्युमुखी पडला तर 10 कामगार कंपनीच्या गेटसमोर उभे राहणार नाहीत. कारण दोन वर्षाची सजा भोगण्यासाठी ते जेलमध्ये जातील. कामगारांचा नेता भाषण करण्यासाठी पुढे येणार नाही. कारण तुम्ही त्याला चिथावणी दिली म्हणून अटक करणार आहात. या कायद्यानुसार कामगारांना नेस्तनाबूत केले जाईल. ट्रेड युनियन ॲक्टिव्हीटी संपुष्टात येईल असे हे विधेयक आहे. म्हणून मी शासनाला विनंती करतो की, जी शिक्षेची तरतूद केली आहे, त्यासाठी अटक वॉरंटची गरज नाही असे म्हटले आहे. दोन वर्षे कारावासाची शिक्षा दिली जाणार आहे. अशी परिस्थिती का उद्‌भवली? चिथावणी ठरविणार कोण? एखाद्याने शिवी दिली तर ती सांगता येत नाही किंवा सिध्द करता येत नाही. परंतु हात उगारला तर बोटे दिसतात असा हा प्रकार आहे. ज्यांच्यासाठी कायदे बनवित आहात त्यांना पोलीस स्टेशनमध्ये किंवा कोर्टामध्ये जाऊन न्याय मिळविता येईल का? त्यांची पुरेशी आर्थिक क्षमता नाही. जनजीवन विस्कळीत होऊ नये म्हणून संपावर बंदी घालावी असे सरकारला वाटत असले तरी अशी परिस्थिती कोणामुळे उद्‌भवली? त्यांच्यावर कठोर कारवाई केली पाहिजे. मालकांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला असता तर देशामध्ये कॉन्ट्रॅक्ट पध्दती सुरु झाली नसती. आज 75टक्के

..4..



श्री.किरण पावसकर........

कामगार ऑन कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर काम करीत आहेत. या पध्दतीला आळा घालता आला असता. ईएसआयएस, ॲक्सीडेन्टल किंवा रिटायरमेंट बेनिफिटसाठी भांडण्याची वेळ आली नसती. फायदे वेळेवर मिळाले असते तर युनियन नेत्यांना आस्थापनेच्या गेटवर जाण्याची गरज भासली नसती. चिथावणी देण्याची किंवा संप करण्याची गरज भासली नसती. संपाला चिथावणी दिली म्हणून कामगार नेत्याला दोन वर्षासाठी जेलमध्ये जावे लागणार आहे.

सभापती महोदय, एखाद्या मैदानामध्ये किंवा इमारतीमध्ये फटाके वाजविले तर पोलीस येतात आणि ताबडतोब संबंधितांना पकडून नेतात. परंतु ज्या कारखान्यामधून ते फटाके आले त्या कारखान्यावर बंदी घातली असती तर मैदानावर जाऊन फटाके फोडण्याची वेळ आली नसती. लोकांचे जनजीवन सुरळीत चालावे या दृष्टीने किंवा संपामुळे लोकांचे नुकसान होऊ नये असे वाटत असेल तर या कायद्यामध्ये योग्य ती सुधारणा करणे आवश्यक आहे. फक्त कापड गिरणी कामगारांचा 1982 मध्ये संप सुरु झाला. लाखो कामगार देशोधडीला लागले. ती घटना डोळ्यासमोर ठेवून ही कृती केली जात असेल तर ते फार घातक आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .......

कारण तो संप इतका मोठ्या प्रमाणात होता की, त्यात लाखो कामगार बेकार झाले, संपूर्ण जनरेशन खराब झाली, मुलांना पुढील शिक्षण घेताआले नाही. तशा पध्दतीचा संप, एवढा मोठा संप आजपर्यंत कधी झालेला दिसत नाही. हा कायदा शासन राज्यात लागू करुन कामगारांचा काम करण्याचा जो मुलभूत अधिकार आहे तो अधिकारच काढून घेत आहे अशी भीती वाटायला लागली आहे. तसेच ट्रेड युनियन ॲक्टिव्हीटीज सुध्दा पूर्णपणे संपविण्याचा प्रयत्न यातून होताना दिसत आहे. या कायद्यात जी कठोर स्वरुपाची कलमे घातलेली आहेत ती कठोर कलमे कमी करुन शेवटी ज्या सर्व सामान्य माणसाचे जनजीवन चांगले होण्यासाठी आपण हा कायदा करीत आहोत त्यात कामगार आणि त्याचे कुटुंब सुध्दा येतेच आणि हीच संख्या राज्यात जास्त आहे. अत्यावश्यक सेवेत या सर्व गोष्टी आलेल्या आहेत म्हणून ज्यांच्यासाठी आपण हा कायदा करीत आहोत त्यांनाच तो मारक ठरु शकतो. माझी शासनाला अशी विनंती आहे की, या विधेयकात पुष्कळ अशा गोष्टी आहेत की, त्यामध्ये सुधारणा करण्याची गरज आहे. जर शासनाला कडक अमलबजावणीच करावयाची असेल तर मॅनेजमेंट, आस्थापना यांच्यावर सुध्दा तेवढाच बंधनकारक राहिला पाहिजे अशी विनंती करतो. तसेच कुठल्याही प्रकारे कामगारांचे व जनतेचे जीवनमान सुरळीत चालावे अशाच सुधारणा या कायद्यात कराव्यात. चुकीच्या पध्दतीने कायदा करताना किमान आमच्या सारख्या लोकांनी, ज्यांनी ट्रेड युनियनमध्ये काम केलेले आहे अशा लोकांना बरोबर घेऊन आवश्यक त्या सुधारणा कराव्यात, अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

---------

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, विधानसभा विधेयक क्र. 43 च्या संदर्भात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी अत्यंत मौलिक विचार सभागृहात व्यक्त केलेले आहेत. त्यावर माझे विचार थोडक्यात व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, मी सुरुवातीलाच हे विधेयक शासनाने मागे घ्यावे अशी मागणी करणार आहे. कारण या विधेयकात केवळ सुधारणा करुन किंवा त्याला आणखी मलमपट्टी करुन चालणार नाही किंवा ते लागू करण्यासारखे नाही तर पुन्हा आणिबाणीची परिस्थिती निर्माण करण्यासारखे हे विधेयक आहे. हे विधेयक पास होऊन त्याचे कायद्यात रुपांतर झाले तर एक प्रकारचा "काळा कायदा" त्यातून तयार होणार आहे. शासनाचा यामागचा हेतू अत्यंत संशयास्पद असाच असल्याचे या विधेयकावरुन स्पष्ट होते. एक प्रकारे कामगारांची मुस्कटदाबी करणारे हे विधेयक असून आपण अगोदरच आणिबाणीचा काळ पाहिलेला आहे. आणिबाणीच्या परिस्थितीत बोलण्यावर, लिखाणावर तसेच व्यक्तिस्वातंत्र्यावर सुध्दा बंदी घातली होती त्या आणिबाणीला विरोध करुन पुन्हा आपण लोकशाहीची स्थापना या देशात केली आणि हुकूमशाहीसदृश्य परिस्थिती निर्माण करणाऱ्या लोकांना बाजूला हटवून पुन्हा लोकशाही नांदायला लागली.

महोदय, मी सुरुवातीलाच म्हटले की, हे विधेयक आणण्यामागची शासनाची भूमिका स्तुत्य आणि स्वच्छ दिसत नाही तर ती एक प्रकारे दडपशाहीची भूमिका दिसत आहे. यातून शासनाचा हेतू असा दिसतो की, आम्ही काहीही केले तरी काहीच होऊ शकणार नाही, कसेही वागलो तरी आमच्याविरुध्द "ब्र" सुध्दा कोणी काढू शकत नाही. यातील सर्वच कलमे अत्यंत धोकादायक आहेत. कलम-2 मध्ये तर कोणतीच सेवा या अत्यावश्यक सेवेतून सुटलेली नाही. त्यात जल, वाहतूक, बस, पाणी, सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, सरकारी कर्मचारी अशा विविध सेवा अंतर्भूत केलेल्या आहेत. अधिवेशन काळात या सभागृहाच्या आजूबाजूच्या परिसरात आपापल्या मागण्यांसाठी निरनिराळे मोर्चे आलेले असतात. त्या मोर्चांना सामोरे जरी गेलो तरी आम्हाला या कायद्याचा आधार घेऊन अटक केली जाऊ शकते अशी तरतूद या विधेयकात केलेली आहे. मग चिथावणी कोणी तरी दिली आणि कोणी नेतृत्व केले म्हणजे अंध व अपंग लोकांच्या मोर्चाला जरी सामोरे जाऊन नेतृत्व केले तरी आम्ही शिक्षेस पात्र होऊ शकतो.

......3

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. संजय केळकर ......

महोदय, कंत्राटी कामगार आज राज्यात सर्वच ठिकाणी म्हणजे हॉस्पिटल्स, निरनिराळी सरकारी कार्यालये यामध्ये काम करताना दिसून येतात. अशा कंत्राटी कामगारांनी त्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी, त्यांच्या हक्कासाठी सुध्दा संप करावयाचा नाही काय याचा खुलासा होणे आवश्यक आहे. त्यांना आठ महिन्याचा पगार दिला नाही तरी देखील त्यांनी शांततामय मार्गाने धरणे किंवा आंदोलन करायचे नाही, लोकशाही पध्दतीने आपले म्हणणे मांडावयाचे नाही तर त्यांनी तसेच मरायचे. अशा प्रकारचा कायदा करुन त्याची अंमलबजावणी झाली नाही तरी त्याविरुध्द बोलायचे नाही अशी भूमिका सुध्दा या विधेयकातून घेतलेली दिसत आहे. परवा सभागृहात पुरवणी मागण्यांच्या अनुषंगाने मी मागणी केली होती की, रुग्णालयातील कंत्राटी कामगारांना चार महिन्यांपासून पगारच मिळालेला नाही. अशा कायद्यामुळे तर त्यांच्या मागण्या सभागृहात मांडण्याचाही आम्हाला हक्क राहणार नाही असे वाटायला लागले. तसेच आम्ही त्यांना घेऊन आंदोलन करायचे नाही असाही त्याचा अर्थ होतो. त्यामुळे केवळ ट्रेड युनियनच नव्हे तर संपूर्ण कामगार क्षेत्राला सुध्दा अपायकारक असाच हा कायदा शासन करीत आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. संपूर्ण राज्यातील अर्ध्याहून जास्त लोकसंख्या असलेल्या जनतेवर या विधेयकाचा विपरित परिणाम होणार आहे.

महोदय, भविष्य निर्वाह निधीची देणगी वेगवेगळ्या विभागात अद्यापही मिळालेली नाही. या विधेयकाचे कायद्यात रुपांतर झाल्यानंतर मात्र अशा देय मागण्यांबाबत बोलण्याची सुध्दा सोय राहणार नाही. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते हे नेहमी शिक्षकांच्या मागण्या सभागृहात मांडत असतात. त्या शिक्षक संघटनेच्या वतीने बोलण्याचाही आम्हाला अधिकार राहणार नाही, त्या मागण्याही बंद कराव्या लागतील. म्हणजे "हम करे सो कायदा" असाच हा प्रकार होताना दिसत आहे. शासनाच्या मते "आम्ही म्हणू तेच तुम्हाला करावे लागेल, आम्ही म्हणू ते धोरण आणि आम्ही म्हणू तेच तोरण" अशा प्रकारचा हुकूमशाहीकडे नेणारा हा कायदा "काळा कायदा" म्हणून अस्तित्वात येईल. कोणीही काहीच करावयाचे नाही, सरकार ठरविल त्याची अंमलबजावणी झाली नाही तरी त्याविरुध्द आवाज उठवावयाचा नाही अशीच शासनाची यात भूमिका दिसून येते. असे शासन करायला निघाले तर ज्या वेठबिगारीचा कायदा करुन आपण ती बंद

.....4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर .......

केली तीच वेठबिगारी पुन्हा निमंत्रित करण्याच हा प्रकार आहे. मिनिमम वेजेस प्रमाणे पगार मिळाला नाही तर आम्ही आवाज उठवितो पण आता शासनाच्या कायद्याची अंमलबजावणी झाली नाही, मिनिमम वेजेसनुसार पगार किंवा मजुरी मिळाली नाही तरी गप्पच बसायचे अशातलाच हा प्रकार आहे. एका बाजूला सरकारने कायदा करावयाचा आणि दुसऱ्या बाजूने त्याची अंमलबजावणी होत नसली तरी बोलायचे नाही. म्हणजे "सहन होत नाही आणि सांगताही येत नाही" अशीच परिस्थिती या कायद्यामुळे निर्माण होणार आहे. अशा प्रकारचा कायदा राज्यातील जनतेसाठी अत्यंत धोकादायक ठरणार आहे म्हणून यातील जी कठोर कलमे आहेत ती केवळ काढून चालणार नाही. आताच राज्यातील पोलीस स्टेशन्स एखाद्या संस्थानासारखी झालेली आहेत. काही पोलीस अधिकारी चांगले काम करतात, सर्वच अशी आहेत अशातला भाग नाही. पण काही ठिकाणी मात्र ते म्हणतील की अमक्याला अटक करायची तर ते करतात. त्यानंतर मग तुम्ही कोर्टात जा, जामीन मिळवा हे प्रकार होत राहतात, त्यांना जी कलमे लावायची ती लावून मोकळे होतात अशी परिस्थिती आहे.

या कायद्याच्या माध्यमातून तर कलम 11 मध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास एखाद्या व्यक्तिने या अधिनियमाखालील कोणताही अपराध केला आहे असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, अधिपत्राशिवाय अटक करता येईल असे म्हटले आहे. याचा अर्थ कोणावर थोडा संशय असला किंवा नसला आणि पोलिसाला वाटले तरी सुध्दा त्या व्यक्तीला पोलीस अटक करु शकतील अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ...

अशा प्रकारची तरतूद विधेयकामध्ये करण्यात आलेली आहे. सभागृहाचे सन्माननीय सदस्य अत्यावश्यक सेवेत येणा-या कर्मचा-यांच्या संदर्भात काही बोलले तर आपल्याला सुध्दा या कायद्यान्वये अटक होऊ शकेल. संशय निर्माण झाला म्हणून पोलीस अटक करु शकतील. त्यामुळे हे विधेयक प्रगतिशील राज्याला काळिमा फासणारे आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या कायद्यामुळे आणीबाणी येऊ शकते. या कायद्यामुळे लोकांची मुस्कटदाबी होणार आहे. त्यामुळे हे विधेयक संयुक्त समितीकडे तरी पाठवावे, नाही तर हे विधेयक तातडीने मागे घ्यावे अशी मागणी करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी प्रथम आपले आभार व्यक्त करतो. सन 2011 चे वि.स.वि. क्रमांक -43, महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण विधेयक, 2011 सभागृहाच्या मंजुरीसाठी आलेले असून या विधेयकाला ठाम विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, एक तासापूर्वी या राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री या सभागृहात आले होते. इंदू मिलची जमीन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी देण्याच्या संदर्भातील चांगला निर्णय सभागृहात त्यांनी घोषित केला आहे. ज्या डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आम्हाला घटना दिली, हक्क दिले, समाजाला विशिष्ट प्रकारचे अधिकार दिलेले असतांना त्या घटनेची पायमल्ली करणारे विधेयक या सभागृहात मंजुरीसाठी आलेले आहे. खरे म्हणजे हा विचित्र योगायोग आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. या विधेयकाच्या संदर्भात अनेक ज्येष्ठ सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. या विधेयकाचा व्यापक विचार केला तर या राज्यातील सर्वसामान्यांची मुस्कटदाबी करणारा, घटनेने जनतेला न्याय हक्कासाठी जी आयुधे दिलेली आहे त्यावर बंदी आणणारे हे विधेयक आहे. खरे म्हणजे या कायद्याला सर्व स्तरातून विरोध होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, विधेयकातील उद्देश व कारणांमध्ये म्हटले आहे की, शासनाच्या, तसेच स्थानिक प्राधिकरणाच्या कर्मचा-यांच्या आणि अत्यावश्यक सेवामधील कर्मचारीवर्गाच्या न्याय मागण्या, समस्या व गाऱ्हाण्यांच्या बाबतीत महाराष्ट्र शासनाने नेहमीच वास्तववादी व सहानुभूतीपूर्ण दृष्टिकोन स्वीकारला आहे. तथापि, कर्मचा-यांच्या काही मागण्या या काही वेळा अव्यवहार्यच नव्हे तर अवाजवी सुध्दा असतात, अशा सर्वच मागण्या मान्य करणे शासनाला शक्य होत नाही".

सभापती महोदय, राज्यातील सर्वसामान्य जनतेची अडचण निर्माण होऊ नये व शासनास ही अडचण हाताळण्यात कोणतीही अडचण येऊ नये यासाठी शासनाने हे विधेयक येथे मांडलेले आहे. आवश्यक सेवा व अत्यावश्यक सेवा असे दोन वर्ग असू शकतात. माझी कल्पना अशी आहे की, ज्याच्याशिवाय आपण जीवन जगू शकत नाही अशा सेवा अत्यावश्यक सेवा समजल्या गेल्या पाहिजेत. पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा, दूध, वीज या सेवा अत्यावश्यक सेवेत येऊ शकतात. परंतु या विधेयकाचा विचार केला तर सर्व प्रकारच्या सेवा अत्यावश्यक सेवेमध्ये येऊ शकतील की, काय अशा प्रकारची भीती तयार झालेली आहे.

..3..

श्री. रामनाथ मोते...

सभापती महादय, या विधेयकामध्ये ज्या अत्यावश्यक सेवांचा उल्लेख केलेला आहे त्यामध्ये सर्वसामान्यांचे दैनंदिन जीवन ज्या मुळे विस्कळित होऊ शकते, ज्या गोष्टींचा पुरवठा न झाल्यामुळे अडचणी निर्माण होऊ शकतात या सर्व गोष्टी अत्यावश्यक सेवेत येऊ शकतात. रस्त्यावर वर्तमान पत्र विक्रेते असतात त्यांना कमिशन कमी प्रमाणात मिळते म्हणून त्यांनी वर्तमान पत्राचा पुरवठा केला नाही तर ते वर्तमानपत्र विक्रेतेही अत्यावश्यक सेवेत येऊ शकतील, भाजीपाला विक्रेते सुध्दा अत्यावश्यक सेवेत येऊ शकतील.

सभापती महोदय, कामगारांचे व मालकांचे जे काही वाद होतात त्यासाठी कायदे अस्तित्वात आहेत. परंतु हे कायदे डावलून, त्यांना बाजूला सारुन त्यासंदर्भातील विषय या विधेयकामध्ये येत असतील तर हे विधेयक लागू होऊ शकेल अशा प्रकारची तरतूद या विधेयकात केलेली असून ती अन्यायकारक आहे.

सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांकडून जाणून घ्यावयाचे आहे की, महाराष्ट्रात अनेक शिक्षण संस्था आहेत व त्यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर लाखो कर्मचारी आहेत. शिक्षण क्षेत्राला स्वतंत्र शिक्षण कायदा मिळालेला आहे. महाराष्ट्र खाजगी सेवाशर्ती अधिनियम 1977 असून त्या अनुषंगाने 1981 ची नियमावली आम्हाला मिळालेली आहे. शिक्षकांनी कसे काम करावे, शिक्षकांच्या सेवाशर्थी काय आहेत, शिक्षकांची आचार संहिता काय आहे, कोणत्या बाबतीत शिक्षकाला शास्ती होऊ शकते यासंदर्भातील सर्व गोष्टी 1981 व 1977 मधील कायद्यातील नियम 22 मध्ये दिलेल्या आहेत. शिक्षकांच्या कामांच्या संदर्भात, कर्तव्याच्या संदर्भात सर्व तरतुदी आमच्या कायद्यात असतांना सुध्दा या विधेयकाच्या अनुषंगाने आमच्या शिक्षकांना तसेच संस्था चालकांना आपण विधेयकाच्या परिघात आणले जाईल की, काय असे वाटावयास लागले आहे. जर या विधेयकातील तरतुदी शिक्षकांना तसेच संस्था चालकांना लागू होणार असतील तर गंभीर असे प्रश्न निर्माण होऊ शकतील.

सभापती महोदय, आज शिक्षण क्षेत्रात अत्यंत वाईट परिस्थिती आहे. काही संस्थाचालक शिक्षकांना पुरेसा पगार देत नाहीत, पालकांकडून लाखो रुपयांच्या देणग्या घेतात,

..4..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

डिपॉझिट घेतात, अव्वाच्या सव्वा फी घेतात परंतु शिक्षकांना मात्र 5-6 हजार रुपये पगार देतात. यासंदर्भातील सर्व माहिती शासनाला असतांना देखील शासन मात्र शिक्षकांची काहीच काळजी घेत नाही. चालवा तुमची शाळा, करा फी गोळा अशा प्रकारचे धोरण या राज्य सरकारचे आहे. शाळेतील शिक्षक शिक्षित असले पाहिजेत, त्यांची मान्यता घेतली पाहिजे परंतु शिक्षकांना पगार किती दिला पाहिजे, शिक्षकांना पूर्ण पगार मिळतो का, याचा शासनाने विचार केला पाहिजे. जे द्वी-पदवीधर आहेत व त्यांना जर 5-6 हजार रुपये पगार मिळत असेल तर ते योग्य आहे काय ? शासकीय नियमा प्रमाणे शिक्षकांना वेतन देणे संस्था चालकांना बंधनकारक आहे. जर शिक्षकांना योग्य पगार मिळत नसेल, सेवा पुस्तक दिले जात नसेल, अन्य सुविधा दिल्या जात नसेल म्हणून शिक्षकांनी काम बंद आंदोलन सुरु केले तर त्यांच्यावर कारवाई होणार का ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

उद्या एखाद्या शाळेतील 50 शिक्षकांनी, 100 शिक्षकांनी त्यांना पुरेसे वेतन देत नाही, सेवा पुस्तक देत नाही, अन्य सुविधा देत नाही, अशा प्रकारचा विषय उपस्थित झाल्यामुळे आंदोलन केले, काम बंद आंदोलन केले तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. अर्थात आमच्या संघटनेचे नेहमीचे धोरण असते की, आंदोलन करताना विद्यार्थ्यांचे व पालकांचे नुकसान होता कामा नये. परंतु, टोकाची भूमिका घेऊन अशा प्रकारचा मुद्दा निर्माण झाल्यामुळे, एक वेगळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे आमच्या शिक्षकांनी आपल्या न्याय्य हक्कासाठी उद्या आंदोलन केले तर या कायद्याच्या अनुषंगाने आपण कारवाई करणार आहात काय ? असा प्रश्न माझ्या समोर उभा आहे. तेव्हा या संबंधी माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा अशी या निमित्ताने सूचना करणार आहे.

या विधेयकातील तरतुदी नुसार एखाद्या मालकाने टाळेबंदी केली तर त्याच्यावर कारवाई होऊ शकते. आमच्या एखाद्या संस्थाचालकाने शाळा बंद केली तर त्याचे देणेघेणे शासनाला काहीही नाही. त्या शाळेला अनुदान मिळत नसेल तर ती शाळा त्या संस्था चालकाने चालवावी किंवा बंद करावी हा त्यांच्या मर्जीचा विषय आहे. उद्या शाळा बंद पडून आमचे शिक्षक वाऱ्यावर आले, रस्त्यावर आले, त्यांच्या नोकऱ्या गेल्या, नोकरी पासून वंचित व्हावे लागले, त्यांचा जीवन जगण्याचा हक्क हिरावून घेतला म्हणून त्या दृष्टिकोनातून त्यांनी आंदोलन केले तर त्याबाबत शासन संस्था चालकांवर काही कारवाई करणार आहे काय ? संस्था चालकांवर केवळ दोन हजार रूपयांचा दंड आकारून किंवा सहा महिन्याची शिक्षेची तरतूद करून हा प्रश्न सुटणार नाही.

शिक्षण क्षेत्रामध्ये 1977 चा कायदा असताना, 1981 ची नियमावली असताना शिक्षकांना खरोखरच अत्यावश्यक सेवेमध्ये आणणार काय ? असा माझा प्रश्न आहे. माझ्या माहिती प्रमाणे हे शासनाचे सेवक नाहीत. त्यांच्या नेमणुका शासनाकडून होत नाहीत. हे शिक्षक स्थानिक स्वराज्य संस्थांचे एम्प्लॉयी नाहीत. हे खाजगी कर्मचारी आहेत. त्यांच्या नेमणुका संस्था चालकांकडून होत आहेत. एका धर्मादाय संस्थेकडून होत आहेत. त्यामुळे शिक्षकांना आपण अत्यावश्यक सेवेमध्ये आणू शकत नाही. जर आपण शिक्षकांना या विधेयकाच्या व्याख्येच्या व्याप्ती मध्ये घेणार असाल तर ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

अत्यंत दुर्दैवी ठरणार आहे आणि त्याला आमचा सक्त विरोध राहणार आहे. चोऱ्या करणारे, खून करणारे, दरोडे टाकणारे, विध्वंसक कृत्य करणारे जे आहेत त्यांना जामीन मिळतो. आमच्या कामगारांनी, शिक्षकांनी काही आंदोलन केले किंवा आपल्या न्याय्य हक्कासाठी लढा दिला तर त्यांच्या विरोधात आपण अजामीनपात्र गुन्हा दाखल करणार आहात, त्याला बेलसुद्धा मिळू शकणार नाही, अशा प्रकारची अत्यंत क्रूर तरतूद या विधेयकात करण्यात आली आहे.

सभापती महोदय, अधिकारपत्राशिवाय अटक करण्याचे अधिकार आपण पोलिसांना दिलेले आहेत. केवळ चिथावणी दिली म्हणून किंवा त्यामुळे एखादे कृत्य घडले म्हणून शिक्षकाला, कामगाराला, मजुराला अटक करण्याचे अधिकार पोलिसांना दिलेले आहेत. ही बाब अत्यंत गंभीर आणि आक्षेपार्ह आहे. या विधेयकावर बोलताना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी खूप सुंदर विचार मांडले आहेत. त्यांनी प्रत्येक कलमाची चिरफाड केली आहे. त्यांनी, तसेच सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी मांडलेले मुद्दे फार महत्त्वाचे आहेत. त्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्याचे मी समर्थन करतो. हे जे विधेयक आहे त्याचे अत्यंत विपरित परिणाम आपल्या समाज व्यवस्थेवर होणार आहेत. या समाज व्यवस्थेमध्ये विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या ज्या सेवा आहेत त्यांना हा कायदा लागू होतो की काय, अशा प्रकारची गंभीर भीती निर्माण झाली आहे म्हणून मी वि.स.वि.क्रमांक 43 ला विरोध करतो. हे विधेयक अन्याय करणारे, अत्याचार करणारे, कामगारांचे शोषण करणारे, कामगारांचे हक्क हिरावून घेणारे असल्यामुळे शासनाने ते मागे घ्यावे अशा प्रकारची विनंती करतो आणि या विधेयकाला ठाम विरोध करतो. धन्यवाद.

.................

यानंतर श्री.देववदत्त...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस.क्यू. जमा ( विधानसभा द्वारा निर्वाचित ) : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री मोते जी ने इस बिल में किए गए प्रावधानों की वजह से शिक्षकों को होने वाली परेशानियों से संबंधित कुछ संदेह यहां पर व्यक्त किए. मैं कहना चाहूंगां कि माननीय सदस्य का संदेह जायज है. माननीय सदस्य श्री दिवाकर रावते जी तथा अन्य अनेक माननीय सदस्यों ने यहां पर अपने-अपने विचार व्यक्त किए हैं. उन माननीय सदस्यों ने यहां पर हर क्लॉज पर अपने विचार व्यक्त किए हैं. इसलिए मैं यहां पर प्रत्येक क्लॉज पर बोलना नहीं चाहूंगा. यहां पर माननीय राज्यमंत्री जी उपस्थित हैं. वे सुबह से ही यहां पर इस बिल से संबंधित पाइंट नोट कर रही हैं. वे इस बिल पर कितने पाइंट नोट कर सकेंगी, इसका अंदाज मुझे नहीं है. लेकिन मेरी राय यह है कि इस बिल पर ज्यादा बहस न करते हुए हम इस बिल को ज्वाइंट कमेटी या सिलेक्ट कमेटी के पास भेज दें ताकि इस बिल की ज्यादा अच्छी तरह से छानबीन हो सके. हमारी मांग है कि इस बिल की रि-ड्राफ्टिंग होनी चाहिए.

सभापति महोदय, इस बिल के बारे में तीन बातें बहुत ही अहम हैं. मेरा कहना है कि आपने अत्यावश्यक सेवा मेंटेन करने के लिए कानून बनाया है या प्रस्तावित किया है, वह बात ठीक है. लेकिन पार्लियामेंट ने भी अत्यावश्यक सेवा कानून 1981 बनाया था. वहां पर वह बिल पास करना ठीक है क्योंकि देश में रेल विभाग है, एविएशन विभाग है और दूसरे भी अनेक विभाग हैं, और यदि वहां के मजदूर या वहां के संगठन ने कोई गैर जिम्मेदार व्यवहार किया या राजनीतिक कारण से कभी हड़ताल की तो उस समय अत्यावश्यक सेवाओं को मेंटेन करने के लिए उस बिल के माध्यम से सरकार को कुछ अधिकार प्राप्त हैं.

हमारे यहां पर महाराष्ट्र में भी कभी दो साल के लिए या कभी पांच साल के लिए हमारी सरकार समय-समय पर कानून बनाती रही है. हमारा जो लास्ट "एस्मा" कानून था, उसका पांच साल का पीरियड मई 2010 में लेप्स हो गया है. वह कानून पांच साल के लिए था. मुझे लगता है कि मई 2010 और दिसम्बर 2011 तक करीब-करीब डेढ़ साल का समय बीत गया है. मुझे लगता है कि पिछले डेढ़ साल में इस कानून के न होने पर भी कोई इंडस्ट्रियल प्रॉब्लम हमारे राज्य में कहीं पर नहीं आया है. मुझे लगता है कि सभी सेवाएं अपना काम ठीक तरह से

...4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

कर रही हैं. हमारी रेल यातायात तथा दूसरे विभाग भी अपना काम ठीक तरह से कर रहे हैं. यहां पर किसी तरह से कहीं कोई एनार्की या कोई दूसरी बड़ी घटना घटित हो गयी है, ऐसी कोई बात नहीं है. सरकार को यह समझने की बिल्कुल जरुरत नहीं है कि इस बिल के पास न होने से सरकार को कोई बहुत बड़ा नुकसान हो जाएगा. इसलिए सरकार को घबराने की जरुरत नहीं है. गैर जिम्मेदारी का व्यवहार यदि कोई कर्मचारी करता है या कर्मचारियों का कोई ग्रुप करता है या कोई ट्रेड यूनियन करती है तो उसके खिलाफ कार्रवाई करने के लिए सरकार के पास अधिकार होना चाहिए. उस बेसिक अधिकार के लिए हमारा कोई विरोध यहां पर नहीं है. लेकिन यह एक्ट बनाते समय इसके अंदर आपने जो कड़े प्रावधान किए हैं, वह ठीक नहीं हैं. क्योंकि सेक्शन दो के अंदर दी गयी डेफिनिशन बहुत ही व्यापक है. उस प्रोवीजन की वजह से कोई भी विभाग इस दायरे में आने से नहीं बचा है. इस प्रोवीजहन की वजह से सभी विभाग कवर हो गए हैं और सरकार जब चाहे उन सेवाओं को अत्यावश्यक सेवा कर सकती है.

मेरे अनुभव से मुझे ऐसा लगता है कि इस एक्ट के पास होने का मतलब यह है कि हमारा जो सेंट्रल का इंडियन ट्रेड यूनियन एक्ट 1926 है उसके अनुसार हमारी ट्रेड यूनियन रजिस्टर्ड होती हैं, हमारी यूनियन का वहां पर संवैधानिक रजिस्ट्रेशन होता है. हम वहां पर अपनी यूनियन बनाते हैं और उसके मेम्बर्स बनाते हैं. उस संबंध में हमारे एक माननीय सदस्य ने कहा कि हमारी ट्रेड यूनियन की वह व्यवस्था तो बेकार हो जाएगी. इसलिए मैं तो कहूंगा कि इतनी लंबी प्रक्रिया अपनाने के बजाय तो आप एक लाइन का एक ऑर्डिनेंस ही निकाल दो कि सेंट्रल ट्रेड यूनियन एक्ट 1926 को हम सस्पेंड करते हैं, आप 1947 एक्ट को भी स्क्रैप कर दें. उस एक्ट के कोड ऑफ कंडक्ट में लिखा हुआ है कि कौन-कौन सी एक्टिविटी कर्मचारी नहीं करेंगे, कौन-कौन सी एक्टिविटी मालिक नहीं करेंगें और कौन-कौन सी एक्टिविटी ट्रेड यूनियन नहीं करेंगी. वह एक्ट हमारे देश में बहुत अच्छा चल रहा है. यह बात सही है कि उसमें सुधार करने की कुछ गुंजाईश हो सकती है. मालिक वर्ग उस संबंध में बहुत दबाव बना रहे हैं. पिछले 10-15 साल में जो ग्लोबल इकॉनामी शुरु हुई है तब से मालिक लोग इस बात का बहुत

...5

श्री जमा..

दबाव बना रहे हैं कि उस बिल में जो सेविंग क्लॉज है,जो कि कर्मचारियों से संबंधित है, उस क्लॉज को निकालने के लिए मालिक वर्ग बहुत दबाव बना रहा है. लेकिन सरकार ने उस क्लॉज को निकाला नहीं है. हो सकता है कि उस क्लॉज का वहां पर पालन नहीं हो रहा होगा लेकिन हायर एण्ड फायर का कानून हमारे देश की संसद ने अभी पास नहीं किया है. इसलिए माननीय मंत्री महोदय तथा सरकार के जो दूसरे प्रतिनिधि यहां पर मौजूद हैं, उनसे मेरा निवेदन है कि आप इस बिल के बारे में पुनर्विचार करें. हमारे महाराष्ट्र राज्य के अंदर बहुत ही प्रगतिशील कानून बने हैं. बॉम्बे इंडस्ट्रियल रिलेशन एक्ट बना हुआ है. हमारे यहां पर एमआरटीयू पल्प एक्ट बना है जिसमें आप संगठन को मान्यता देते हैं. अब आप अगर एक लाइन के किसी भी नोटिफिकेशन से किसी उद्योग या किसी सर्विसेस को अत्यावश्यक कर दिया तो वहां पर वर्कर्स के सारे राइट खत्म हो जाएंगे, ट्रेड यूनियन का राइट खत्म हो जाएगा. हालंकि इस पूरे बिल में कहीं भी ट्रेड यूनियन का जिक्र नहीं किया गया है.यहां पर यह नहीं बताया गया है कि ट्रेड यूनियन का क्या रोल है.

सभापति महोदय, यह बिल जीएडी ने लाया है. हालांकि यह बिल लेबर डिपार्टमेंट या उद्योग विभाग द्वारा लाया जाना चाहिए था. इस बिल का संबंध उद्योग विभाग या कामगार विभाग से होना चाहिए. यह बात सही है कि बिल लाने से पहले जीएडी ने श्रम विभाग से कंसल्ट जरुर किया होगा. लेकिन मुझे लगता है कि इसमें ट्रेड यूनियन एक्ट तथा हमारे महाराष्ट्र में लेबर से संबंधित जो बाकी कानून हैं, उनका यहां पर उल्लंघन किया गया है. उन सभी बातों का विस्तार से मैं यहां पर जिक्र नहीं करना चाहूंगा. माननीय दिवाकर रावते जी ने उन सभी बातों का जिक्र यहां पर क्लॉज वाइज किया है. माननीय सदस्य श्री पावसकर तथा अन्य माननीय सदस्यों ने भी उन बातों का जिक्र यहां पर किया है. मेरा कहना है कि लेबर और ट्रेड यूनियन का जो राइट यहां पर सप्रेस हो रहा है. उसकी सुरक्षा होनी चाहिए. मैं कहना चाहूंगा कि क्लॉज 2 में आपने कुछ सेविंग क्लॉज रखा है कि अगर कोई नोटिस निकला है तो उसको विधान सभा या विधान परिषद के सामने इतने दिन के अंदर रखा जाएगा. यह सेविंग क्लॉज जरुर इसमें है. लेकिन यह करते समय हमारा अनुरोध सरकार से है कि इस पर पुनर्विचार किया जाए. इसमें दी गयी

...6

श्री जमा....

डेफिनिशन्स के अंदर बहुत सारी त्रुटियां हैं. इस डेफिनिशन के अदंर सरकार ने स्कोप बहुत बड़ा कर दिया है. मैं कहना चाहूंगा कि अभी परसों ही हमने देखा कि यह एक्ट नहीं था तो भी हमारे स्टार बस के कर्मचारियों ने मोर्चा निकाला और स्ट्राइक किया तो उन पांच-छह सौ लोगों को पुलिस पकड़कर ले गयी . आपने इस बिल में लिखा है कि नॉन बेलेबल और विदआउट वारंट अरेस्ट कर सकते हैं. इन सभी पावर्स का दुरुपयोग तो पुलिस अभी भी कर रही है. यह बात सही है कि जब मोर्चा निकलता है तो मॉब के अंदर कुछ कर्मचारी गलत व्यवहार भी कर देते हैं. मॉब मेंटेलिटी में कुछ गलत काम जरुर हो जाते हैं. ट्रेड यूनियन में काम करने की वजह से ये सब बातें हमको भी मालूम हैं. लेकिन इसका मतलब यह भी नहीं है कि पांच-छह सौ लोगों की बात न तो कांट्रेक्टर द्वारा सुनी जाए और न ही उनकी बात महानगरपालिका द्वारा सुनी जाए, फिर भी उन पांच-छह सौ लोगों को रात के समय पकड़ कर जेल में डाल दिया गया और दूसरे दिन मजिस्ट्रेट के सामने खड़ा कर दिया गया और वहां पर उनको 31 दिसम्बर तक के लिए पुलिस रिमांड पर भेज दिया गया. उनसे कहा गया कि यदि आपको जमानत लेनी है तो आप कोर्ट में इंडिविज्वुअल जाइए. मेरा कहना है कि उस बारे में सरकार द्वारा ध्यान दिया जाना चाहिए. हमारे विधानमंडल का अधिवेशन यहां पर चल रहा है फिर भी परसों छह सौ लोगों को जेल में भेज दिया गया. हमारा कहना है कि इस संबंध में लेबर डिपार्टमेंट के प्रतिनिधि या सरकार के प्रतिनिधियों को वहां पर जाकर मध्यस्तता करनी चाहिए और उन छह सौ लोगों की परेशानी दूर करनी चाहिए. क्योंकि वहां पर जमानत लेने की प्रक्रिया आसान नहीं है. मैं सिर्फ दो तीन बातें कहकर ही अपनी बात समाप्त करना चाहूंगा.

सभापति महोदय, आजकल हमारी ठेकारी प्रथा तथा आउट सोर्सिंग प्रथा बढ़ रही है. लेकिन लेबर लॉ के मार्फत किसी तरह का संरक्षण उन कमचयारियों को नहीं है.स्पेशल इकॉनामिक जोन में भी कोई लेबर कानून नहीं है. मैं आपको बताना चाहूंगा कि हमारे यहां पर बहुत सारे कॉल सेंटर्स हैं, वहां पर हमारे पढ़े-लिखे बच्चे और बच्चियां काम करते हैं, वहां पर भी ट्रेड यूनियन बनाने का कोई अधिकार उनको नहीं है. वे लोग तो पूरी तरह ......

...7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

असंरक्षित हैं. इसके अलावा भी इसमें बहुत सारे क्लॉज हैं, जिनको मैं यहां पर रिपीट नहीं करना चाहता हूं. लेकिन कामगार प्रतिनिधि होने के नाते मेरी मांग है कि इस बिल को आप ज्वाइंट कमेटी के पास भेजें. सरकार से मेरा अनुरोध है कि अत्यावश्यक सेवा से संबंधित अधिकार आप लीजिए, यह अधिकार आपको होना चाहिए. ताकि कोई ट्रेड यूनियन या कमचारियों का कोई ग्रुप ठीक से काम नहीं कर रहा है तो आप उन पर कार्रवाई कर सकें. लेकिन उससे पहले मेरा कहना यह है कि जिस विभाग के कर्मचारियों के संबंध में आप नोटिफिकेशन निकालेंगे, वहां के कर्मचारियों की यदि कोई जायज मांग है तो उनकी सही मांगों को पूरा करने के लिए क्या सरकार के श्रम विभाग या दूसरे विभागों के पास कोई मशीनरी है या नहीं है ? हमारे यहां पर कानून तो बहुत हैं. हमारे यहां पर एक कानून है कि हर महीने की 7 तारीख या 10 तारीख तक कर्मचारी को पेमेंट मिल जाना चाहिए. लेकिन महाराष्ट्र में कुछ सरकारी कर्मचारियों को छह-छह महीने तक पगार नहीं मिलता है. सरकार की कई कारपोरेशन्स के टेक्नीकल स्टाफ को समय पर पगार नहीं मिलता है, तो क्या सरकार को पेमेंट ऑफ वेजेज एक्ट की जानकारी नहीं
है ? समय पर पगार नहीं मिला तो प्रॉसीक्युशन हो सकता है.परन्तु वहां पर प्रॉसीक्युशन क्यों नहीं किया जाता है. वह गलती हमारी ट्रेजरी की हो या बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम की हो, वहां पर प्रॉसीक्युशन किया जाना चाहिए. इसलिए यह बात सही है कि अत्यावश्यक सेवाओं को सही ढंग से चलाने का अधिकार हमारी सरकार के पास होना चाहिए. लेकिन यह अधिकार एक्सट्रीम सिच्वुएशन में होना चाहिए तथा कुछ लिमिटेड अधिकार ही सरकार को होने चाहिए.

माननीय सदस्य श्री रावते जी से मैं कहना चाहूंगा कि आपने डेफिनिशन में देखा होगा कि यहां पर रोड ट्रांस्पोर्ट तथा वाटर ट्रांस्पोर्ट के बारे में तो लिखा है, लेकिन मुझे मालूम नहीं कि यहां पर एयर ट्रांस्पोर्ट के बारे में कुछ भी क्यों नहीं लिखा गया है. जबकि एयर ट्रांस्पोर्ट अत्यावश्क सेवाओं में आता है.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री दिवाकर रावते : यह बात मेरे ध्यान में नहीं आयी, ऐसी बात नहीं है. Air transport does not come under the purview of the State Government. The State Legislature has power to make law only on the subject of land and water transport.

श्री एस. क्यू. जमा : यह बात सही है कि एयर ट्रांस्पोर्ट से बड़े लोग यात्रा करते हैं. उसमें कोई दो राय नहीं हैं. लेकिन एयर ट्रांस्पोर्ट भी अत्यावश्यक सेवाओं में ही आता है. परन्तु यहां पर वाटर ट्रांस्पोर्ट और रोड ट्रांस्पोर्ट का ही जिक्र किया गया है. पायलटों की स्ट्राइक को इस बिल के दायरे से बाहर कर दिया है. मेरा कहना है कि इस बिल को पास करने से पहले इस बात की व्यवस्था की जाए कि हमारे मजदूरों की समस्याओं का निवारण टाइम-बांउड तरीके से हो सके. इस तरह की व्यवस्था इस बिल के अंदर होनी चाहिए ताकि ट्रेड यूनियन कार्यकर्ता होने के नाते हम कह सकें कि मजदूरों की समस्याओं का टाइम-बाउंड हल निकालने की व्यवस्था भी सरकार ने इस बिल के अंदर की है. इस तरह का कानून चाहे जीएडी बनाए या श्रम विभाग बनाए या उद्योग विभाग बनाए, लेकिन इस तरह का कानून भी बनाया जाना चाहिए.

हमारे माननीय सदस्यों ने यहां पर बहुत सारी बातों का जिक्र किया है. इसलिए मैं यहां पर ज्यादा समय न लेते हुए इतना ही कहना चाहूंगा कि जिस तरह का यह बिल यहां पर आया है, यदि इस बिल को हम एज इट इज पास कर देते हैं तो फिर हमें ट्रेड यूनियन कार्यकर्ता कहलाने का कोई अधिकार नहीं रहेगा. इस बिल के माध्यम से हमारी ट्रेड यूनियन के अधिकारों का हनन हो रहा है. इसलिए आप इस बिल को कमेटी के पास भेजें. ताकि इस बिल में थोड़ा संशोधन हो सके और यह बिल विस्तार से बनाने का मौका हमको तथा सरकार को मिल सके. कमेटी में बिल पर विचार करते समय हम भी अपने सुझाव इस बिल के बारे में दे सकेंगे.

अंत में मेरा यही कहना है कि इस बिल को एक समिति के पास भेजा जाए ताकि इस बिल के बारे में उस समिति में विस्तार से छानबीन हो सके. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011 चे विधानसभा विधेयक क्रमांक 43 विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता, आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्यासाठी विधेयक सभागृहामध्ये मांडण्यात आले आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर चर्चा करीत असतांना माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब, माननीय सदस्य श्री. एस. क्यू. जमा साहेब, माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते साहेब व इतर सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले आहेत. या विधेयकामध्ये अत्यावश्यक सेवेची व्याख्या दिलेली आहे. त्यामुळे हे विधेयक कामगारांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारे आहे. राज्य घटनेने आपल्याला काही हक्क दिलेले आहेत. आम्हाला जर एखादी गोष्ट मिळत नसेल तर त्यासाठी आक्रोश करण्याचे वेगवेगळे मार्ग असू शकतात. त्यापैकी एक मार्ग म्हणजे संप करणे, कामावर न जाणे आणि आपला विरोध प्रकट करणे हा आहे. कामगार केव्हा संप करतात?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 17:05

डॉ.दीपक सावंत. . . .

कामगार ज्यावेळी अर्ज देतो, विनंती करतो आणि तरी देखील त्याला प्रतिसाद मिळत नाही, मग तो जेव्हा शिष्टमंडळ घेऊन जातो, तेव्हा तेथील उच्चपदस्थ अधिकाऱ्याकडून पॉझिटीव्ह उत्तर किंवा आम्ही याबाबत विचार करतो अशा प्रकारचे आश्वासन मिळत नाही तेव्हा तो संप करतो. लोकांना संप करावयास आवडते असे नाही. म्हणून मी असे सांगितले की, या देशातील लोकशाही सर्वश्रृत असून, येथील लोकांना अधिकार दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्रामध्ये सर्वात जास्त लोकशाही आहे आणि यावर घाला घालणारे हे विधेयक आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आपण या विधेयकामध्ये इसेन्शिअल सर्व्हीसेस मध्ये जे काही आहे, ते सगळे कव्हर केलेले आहे. मग लोकांनी कुठे जावयाचे, लोकांनी आपला आक्रोश कुठे करावयाचा असा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया श्रीमती फौजिया खान एक शिक्षिका आहेत आणि त्या देखील एक शाळा चालवितात. तुमच्या शाळेतील शिक्षकांना काही प्रॉब्लेम असेल तर त्यांनी कोणाकडे दाद मागावयाची, राज्यातील शिक्षकांनी पगारासाठी संप केला किंवा आपल्या मागण्यां साठी, सुट्टयांसाठी संप केला तर त्यांचा तो अधिकार आपण नाकारीत आहात काय, तुम्ही त्यांचा अधिकार का नाकारत आहात? यासाठी काहीतरी चार दिवसापेक्षा, आठ दिवसापेक्षा किंवा दहा दिवसापेक्षा अशी कालमर्यादा घालता आली असती. त्यांना या कक्षेमध्ये आणावयाचे आहे ही गोष्ट बरोबर आहे. पण सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा साहेब यांनी सांगितले की, "It has got a wide scope". तुम्ही यामध्ये सगळयानांच कव्हर केलेले आहे.कोणालाच सोडलेले नाही. त्या दिवशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी दुधाचे उदाहरण दिले, विजेचे उदाहरण दिले, अनेक उदाहरणे दिली. तसेच इतर सन्माननीय सदस्यांनीही सांगितले आहे. त्यामुळे माझे माननीय मंत्री महोदयांना निर्वाणीचे सांगणे आहे की, आपण यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.या विधेयकातील पान क्र.2 वरील क्लॉज-2 मधील तिसऱ्या क्रमांकावर असे म्हटलेले आहे की, "रुग्णालये व दवाखाने यांच्यासह, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता राखण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा". आज देखील राज्यात वैद्यकीय अध्यापकांचा संप सुरु आहे. त्या संपासाठी त्यांचे साखळी उपोषण सुरु आहे आणि अशा वेळी त्यातील काही लोक कामावर जातात. आपण याला काय म्हणणार आहात आणि अशा वेळी आपण त्यांना कोणत्या डेफीनेशनमध्ये बसविणार आहात हा प्रश्न आहे.

सभापती महोदय,ज्या लोकांनी अत्यावश्यक सेवा स्वत:साठी बांधून घेतलेली आहे, याबाबत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

उदाहरण द्यावयाचे तर मला लोकांना दूध पोहोचवावयाचे आहे, मला लोकांकडे गॅस द्यावयाचा आहे इ. आणि या सेवेमध्ये जर ही माणसे नसतील तर मग सर्वसामान्यांच्या अत्यावश्यक गरजा कोण भागविणार आहे? मग लोक या कामापासून परावृत्त होण्याची शक्यता आहे. या कायद्यामध्ये सरकारी कर्मचाऱ्यांचाही समावेश करीत आहात. या शासनाचा राज्यातील सर्व कामकाज ठप्प करावयाचा विचार आहे काय? जवळजवळ दरवर्षी मार्डचा संप होतो आणि 8 दिवस संप केल्यावर रुग्णांचे हाल सुरु आहेत असे टी.व्ही.वर दिसले नाही तर मग त्यांना कोणीही विचारत नाही. ते डॉक्टर फक्त ॲप्रन घालून, गळयात स्टेथस्कोप घालून बॅनर घेऊन उभे रहातात. हॉस्पिटलमध्ये काम करणाऱ्या नर्सिंग . . . .

एक सन्माननीय सदस्य (खाली बसून) : डॉक्टरांची सेवा इसेन्शिअल आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, डॉक्टरांची सेवा इसेन्शिअल असली तरी देखील त्यांनी केलेले संप मिटलेले आहेत आणि जर डॉक्टरांची सेवा इसेन्शिअल नसती तर राज्य शासनाने त्यांच्या मागण्यांकडे पाहिले देखील नसते. डॉक्टर संप करीत आहेत तर करु दे, नर्सेस कामावर आल्या नाहीत तर ठीक आहे, काही फरक पडत नाही असे म्हटले असते. जर शाळेमध्ये शिक्षक आले नाहीत तर शाळा बंद आहे म्हणून पालक ओरडा करणार. शेवटी प्रत्येकाच्या दैनंदिन गरजांसाठी माणूस संप करतो, संप करण्याची कोणालाही हौस नसते. सफाई कर्मचारी संप करतात. कारण त्यांच्या काही मागण्या असतात. जर शासनाने सुमोटो त्यांच्या मागण्या मान्य केल्या तर मग कोण संपावर जाईल. परंतु राज्य शासनाला ते करावयाचे नसते आणि अशा प्रकारे त्यांना आपल्या मागण्या मांडण्याचा जो हक्क दिलेला आहे, तो आपण मारण्याचे काम करीत आहोत असे माझे म्हणणे आहे. मला माननीय मंत्री महोदयांना पुन्हा-पुन्हा सांगावयाचे आहे की, या विधेयका-तील काय घ्यावे आणि काय घेऊ नये हा त्यांचा प्रश्न आहे.परंतु माझ्या दहा-अकरा वर्षाच्या काळामध्ये आज पहिल्यांदा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे या बिलावर एकमत झाले आहे असे दिसते. त्यामुळे या सदनाची संमती घेत असताना कदाचित समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य आमच्या विरोधात मतदान करतील. पण त्यांच्या मनामध्ये असा विचार आहे की, आपले सरकार कुठेतरी चुकीचे वागत आहे, नाहीतर त्या सन्माननीय सदस्यांकडून अशा प्रकारची भाषणे झाली नसती किंवा त्यांनी त्यातील त्रुटी दाखविल्या नसत्या.

सभापती महोदय,विधी व न्याय विभाग विधेयक ड्राफ्ट करीत असते.त्यावेळी सर्वंकष विचार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ 17:05

केला जातो काय हा प्रश्न आहे.त्यावेळी कोणाची मते जाणून घेतली जातात काय ? तसेच अशा प्रकारचे बिल ड्राफ्ट करुन सभागृहामध्ये मांडल्यानंतर ते विधानसभेमध्ये संमत झाले तर यातून शासनाला एकाधिकारशाही सुरु करावयाची आहे काय किंवा हम करे सो कायदा असे करावयाचे आहे काय, काल सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब म्हणाले त्याप्रमाणे त्यांना अण्णागिरी करावयाची आहे काय ? शासनाने कमीतकमी सन्माननीय सदस्यांना तरी विश्वासात घेऊन विचारले पाहिजे की, आम्ही अशा प्रकारचे विधेयक आणत आहोत. त्यांच्याकडे देखील इन्टेलेक्चुअल लोक कमी नाहीत. असे खूप लोक आहेत. कामगार क्षेत्रामध्ये काम करणारे सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमासाहेब आहेत, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर आहेत, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेही इन्टेलेक्चुअल आहेत.सन्माननीय मंत्री श्री.सुनील तटकरे साहेब आहेत. माननीय श्रीमती फौजिया खान या एका शाळेच्या संस्था चालक आहेत, विधान परिषदेच्या सदस्या आहेत आणि या विधयेकाच्या पव्हर्यूमध्ये शिक्षकांनाही घेत आहेत.तसेच माननीय सदस्य श्री.मनिष जैन हे व्यापारीही आहेत.या सभागृहामध्ये सगळया प्रकारची माणसे आहेत आणि सगळयांना या विषयाच्या संबंधात सारखाच अनुभव आहे. म्हणून माझी पुन्हा एकदा विनंती आहे की, कृपा करुन माननीय मंत्री महोदयांनी हे विधेयक मागे घ्यावे. यामध्ये सुधारणा सुचविण्यात याव्यात किंवा हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे आणि त्याठिकाणी विचारमंथन होऊ द्यावे. तेथे पुन्हा आपल्याकडे बरेच पर्याय आहेत. यासाठी पाहिजे तर सभागृह दहा-पंधरा मिनिटे बंद करावे आणि माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करावी. जर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविले तर त्याने आपला अपमान होत नाही. जर हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविले तर त्यातून बरे होईल आणि तालिका सभापती सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशीसाहेब देखील हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावयास पाहिजे या मताशी सहमत होतील.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मेडिकल सर्व्हीसेस, दवाखाने, रुग्णालये, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था येथे काम करणाऱ्या लोकांनी नेमके कुठे जावयाचे, त्यांनी कोणाकडे दाद मागावयाची, आपले म्हणणे कोणाकडे मांडावयाचे ? 14-15 हजार रुपये पगारावर काम करणाऱ्या डॉक्टरांनी काय करावयाचे? सार्वजनिक आरोग्य व्यवस्था ही या देशाच्या सेवेचा कणा आहे. अशा वेळी तेथे काम करणारे लोक जर समाधानी नसतील, सुखी नसतील आणि त्यांच्या मागण्या पूर्ण होणार नसतील तर त्या लोकांनी काय करावयाचे हा प्रश्न आहे. मग तुम्ही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आम्हाला यासाठी पर्याय द्यावा की, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेतील लोकांनी आपल्या मागण्या राज्य शासनासमोर अशा-अशा प्रकारे मांडावयाच्या. आम्ही त्यासाठी तयार आहोत, तुम्ही विधेयक मंजूर करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मला या विधेयकावर बोलावयाचे आहे .......

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी आपले भाषण पूर्ण करावे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना भाषण करावयाचे आहे काय ?

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, होय.

**तालिका सभापती** : अजून या विधेयकावर दोन-तीन सन्माननीय सदस्यांना भाषण करावयाचे आहे. पण अगोदर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांचे भाषण पूर्ण होऊ द्यावे आणि त्यानंतर आपण काय करावयाचे ते ठरवू.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी सार्वजनिक आरोग्याच्या व्याखेविषयी बोलत होतो. या दवाखान्यातील डॉक्टरांनी, सार्वजनिक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या लोकांनी कुठे जावयाचे हा प्रश्न आहे. नर्सेसनी, टेक्नीशिअन्स्नी कोणाकडे जावयाचे ? असा प्रश्न आहे. आजपर्यंत या देशामध्ये संप झाले नाहीत काय ? मोठे-मोठे संप झाले अगदी गिरणी कामगारांपासून अगदी मार्डपर्यंत सर्वांचे संप झाले आणि ते संप मिटले नाहीत काय ? तर ते सगळे संप मिटले.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे ..... 17:15

डॉ. दीपक सावंत. . .

राज्य शासन त्यांच्यासमोर वाटाघाटीला गेले. वाटाघाटीला का गेले? कारण ते अत्यावश्यक सेवांमध्ये येतात. जर ते अत्यावश्यक सेवांमध्ये नसते तर ते संप चालू राहिले असते, शाळा बंद राहिल्या असत्या, दूधवाला आला नसता, सफाई कामगार आला नसता आणि शेवटी सामान्य जनता सफर झाली असती. हे सर्व लोक सामान्य जनता आणि समाजाचा एक घटक आहेत. जर हे लोक समाजाचा घटक असतील आणि ते या लोकशाहीचे सदस्य असतील तर त्यांना आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार नाही काय? या विधेयकामध्ये असे म्हटले आहे की, " अशा प्रकारची चिथावणी देणारा" म्हणजे आपल्या सर्व लोकांची अडचण आहे.सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेब, 'चिथावणी' म्हणजे काय? 'चिथावणी' म्हणजे आपण त्या लोकांच्या गॅदरिंगमध्ये जाऊन भाषण केले तरी ती 'चिथावणी' समजण्यात येईल आणि डायरेक्ट अटक करण्यात येईल आणि हा सगळा गुन्हा अजामीनपात्र असेल. म्हणजे काही तरी मोठी चोरी केली आहे, खून केला आहे, अशा प्रकारचा गुन्हा होईल.

**तालिका सभापती** ( श्री. मोहन जोशी ) : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना काही होणार नाही.

डॉ. दीपक सावंत : कसे होणार नाही? कायद्यामध्ये तसे लिहिलेले आहे. आपण तसे लिहून द्यावे, मी भाषण न करता खाली बसतो. सभापती महोदय, "चिथावणी" म्हणजे काय? 'चिथावणी' ची व्याख्या सांगण्यात यावी. "तुमच्या मागण्या पूर्ण होत नसतीत तर तुम्ही उद्यापासून संपावर जा. काम बंद आंदोलन करा." असे तुम्हीच सांगितलेले आहे. आपण सर्वजण महात्मा गांधीजींचे नाव घेता. गांधीजींच्या राज्यामध्ये आंदोलन हा प्रमुख शब्द आहे. त्या आंदोलनाला हे शासन हारताळ फासत आहे. जर हे असे नसेल तर माननीय मंत्री महोदयांनी 'चिथावणी' म्हणजे नेमके काय हे समजून सांगावे. चिथावणी म्हणजे कुठल्याही माणसाला आपण असे सांगितले की, "तू अमुक हे काम कर," तर ती 'चिथावणी' होईल. म्हणून 'चिथावणी'ची नेमकी व्याख्या सांगण्यात यावी. दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, आपण याला नॉन बेलेबल ऑफेन्स असे म्हटलेले आहे. हा नॉन बेलेबल ऑफेन्स का असावा? काम बंद करणे किंवा अत्यावश्यक सेवांमध्ये सहभागी न होणे हा नॉन बेलेबल ऑफेन्स का व्हावा? याचे स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती करतो की, या विधेयकाचा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत. . .

पुनर्विचार करण्यात यावा. या सभागृहात सर्व सन्माननीय सदस्यांनी या विधेयकाच्या संदर्भातील आपापली मते मांडून आपला महत्वाचा सहभाग दाखविलेला आहे. त्याचा विचार करण्यात यावा आणि लोकशाही जगविण्यात यावी. महात्मा गांधीजींचे नाव घेता ना ? मग आंदोलनाला पाठिंबा द्या. आंदोलनाचा पाठिंबा काढावयाचा असेल तर आम्ही लोकशाहीत जगतो, आमच्या देशामध्ये लोकशाही आहे, महाराष्ट्रात लोकशाही आहे. . .

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांना या विधेयकावर बोलण्यासाठी आणखी किती वेळ लागणार आहे?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आता पर्यंत मी फक्त डॉक्टर्स आणि नर्सेसच्या संदर्भात बोललो आहे अजून पॅरा मेडिकल स्टाफच्या संदर्भात मला बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : डॉ. दीपक सावंत यांचे भाषण ऑन लेग ठेवण्यात येत आहे. आपल्याला सभागृहाचे कामकाज 6.00 वाजता संपवावयाचे आहे त्यादृष्टीने आता अर्धा-तास चर्चा सुरु करु.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मला या विधेयकावर बोलावयाचे आहे.

**तालिका सभापती** : ज्या सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलावयाचे आहे त्या सर्व सन्माननीय सदस्यांना या विधेयकावर बोलण्याची संधी दिली जाईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा-तास चर्चा क्रमांक 2 बाबत**

**तालिका सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर क्रमांक एक वर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांची अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आलेली आहे आणि क्रमांक दोनवर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांची अर्धा-तास चर्चा दाखविण्यात आलेली आहे. डॉ. दीपक सांवत यांच्या अर्धा-तास चर्चेच्या बाबतीत सन्माननीय मंत्री महोदयांनी मला एक पत्र दिलेले आहे. सदर पत्राद्वारे सन्माननीय मंत्री महोदय, आज सभागृहात उपस्थित राहू शकत नसल्यामुळे ही अर्धा-तास चर्चा पुढे ढकण्याबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी ही अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत विनंती केलेली आहे पण ही अर्धा-तास चर्चा कधी घेण्यात येणार आहे? सभापती महोदय, लेखन साहित्या विषयीचा प्रश्न या सभागृहात चर्चेला आला नाही. या लेखन साहित्यामध्ये प्रचंड मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. सदर भ्रष्टाचार अर्धा-तास चर्चेच्या माध्यमातून मला या सभागृहात मांडावयाचा आहे. त्यामुळे सभापती महोदय, आपल्याला विनंती आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी मला ही अर्धा-तास चर्चा मांडण्याची संधी द्यावी.

**तालिका सभापती** : सन्माननीय सभापती महोदय, या बाबतीत निर्णय घेतील. आपल्या भावना त्यांना कळविण्यात येतील.

----

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : "बुलढाणा जिल्ह्यातील लिपिक-टकंलेखक भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार"

**मु. शी.** : "बुलढाणा जिल्ह्यातील लिपिक-टकंलेखक भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 21570 ला दिनांक 12 डिसेंबर,2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री. पांडुरंग फुंडकर वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्षनेता ) : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील लिपिक-टंकलेखक भरती प्रक्रियेत झालेला भ्रष्टाचार या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 21570 ला दिनांक 12 डिसेंबर, 2011 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील लिपिक-टंकलेखक भरती प्रक्रियेत सन 2009 मध्ये झालेल्या गैरप्रकारा बाबत विभागीय आयुक्तांनी केलेल्या चौकशीत अतिरिक्त जिल्हाधिकारी दोषी असून त्यांच्यावर अद्यापपर्यंत कारवाई झालेली नाही. सदर प्रश्नामध्ये कारवाईच्या विलंबा बाबतची कारणे विचारली असता शासनाकडून त्याची उत्तरे देण्यात आलेली नाहीत. सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील लिपिक-टंकलेखक परीक्षेच्या संदर्भात कु. निर्मला विश्वनाथ घोडके या विद्यार्थीनीने तक्रार केली होती. "इतर मागासवर्गीय महिला" या प्रवर्गातून लिपिक-टंकलेखक या पदासाठी त्यांनी अर्ज केला होता. कु. निर्मला विश्वनाथ घोडके या विद्यार्थीनीला या परीक्षेत 174 गुण मिळाले होते. अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. कामुणे यांनी कु. निर्मला विश्वनाथ घोडके यांना नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांचा "इतर मागसवर्गीय" या प्रवर्गात समावेश होऊ शकत नाही असे उत्तर दिलेले आहे. प्रत्यक्षात कु. निर्मला विश्वनाथ घोडके या विद्यार्थीनीकडे जात वैधता प्रमाणपत्र होते आणि तिने ते सादरही केले होते. तसेच तीन महिन्यात नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र सादर करण्याचे तिने मान्य केले होते. असे असताना वैयक्तिक आकस ठेवून अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. कामुणे यांनी जाणीवपूर्वक कु. निर्मला विश्वनाथ घोडके यांना डावलले. वास्तविक पहाता कु. निर्मला विश्वनाथ घोडके यांना 174 गुण मिळाले होते. खरे तर त्यांची महिलांच्या खुल्या प्रवर्गातून निवड होणे अपेक्षित होते. कु. निर्मला घोडके यांच्यापेक्षा





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

कमी मार्क्स असणाऱ्या विद्यार्थीनीची खुल्या प्रवर्गातून निवड झालेली आहे. याचाच अर्थ अतिरिक्त जिल्हाधिकारी यांनी जाणीवपूर्वक कु. घोडके यांच्यावर अन्याय केलेला आहे. खरे तर या भरतीमध्ये लाखो रुपयाचा भ्रष्टाचार झालेला असून तो लपविण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांना डावलून अपात्र विद्यार्थ्यांना नेमणुका दिल्या गेलेल्या आहेत. कु घोडके यांचे एक उदाहरण मी या ठिकाणी सांगितलेले आहे.

सभापती महोदय, या प्रकरणातील भ्रष्टाचारी अधिकारी श्री. कामुणे यांच्या संदर्भात या सभागृहामध्ये मी नियम 93 अन्वयेची सूचना व लक्षवेधी सूचना दिली होती. त्या बाबतीत चौकशी नेमण्यात आली होती. विभागीय आयुक्त अमरावती यांनी चौकशी करुन तो अहवाल राज्य शासनाला सादर केलेला आहे. त्या अहवालामध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी श्री. कामुणे यांना दोषी ठरविण्यात यावे आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी असे म्हटलेले आहे. परंतु शासनाने विभागीय आयुक्तांच्या अहवालावर कारवाई न करता त्या अहवालाची छाननी करण्याचे ठरविले आहे. विभागीय आयुक्तांची चौकशी शासनानेच नेमलेली होती. ज्या विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही चौकशी नेमण्यात आली होती ते विभागीय आयुक्त एक जबाबदार अधिकारी आहेत. परंतु शासनाने त्या विभागीय आयुक्तांच्या अहवालाची छाननी करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

( **सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. भगवान साळुंखे** )

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ पूर्वी कु. थोरात 17:25

श्री. पांडुरंग फुंडकर .....

म्हणजे शासनच शासनाच्या अहवालाची छाननी करणार असा निर्णय झाला. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मी हा प्रश्न उपस्थित केला होता पण अर्थसंकल्पीय अधिवेशनापासून आजतागायत ती छाननी पूर्ण झालेली नाही. ही छाननी कधी पूर्ण होणार ? या अधिकाऱ्याला शासनाने पाठीशी घालण्याचे ठरविले आहे का ? गोरगरीब, मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या जीवनाचे भवितव्य बिघडविणारा जो अधिकारी आहे, एक तर गोरगरिबांच्या मुलांना, मागासवर्गीयांच्या मुलांना नोकऱ्या मिळत नाहीत आणि नोकऱ्या मिळत असताना जर ते खरोखर स्पर्धेमध्ये उतरले असतील आणि अशा प्रकारचे अधिकारी त्यांना डावलून इतर लोकांची त्या ठिकाणी नेमणूक करण्याचा ज्यावेळी प्रयत्न करतात आणि ही बाब लक्षात आल्यानंतर त्याची चौकशी झाल्यानंतर त्या चौकशीमध्ये जर तो अधिकारी दोषी आढळून आला तर सरकारने त्याला पाठीशी घालण्याचे काहीही कारण नाही. परवा मी प्रश्न उपस्थित केला परंतु त्या दिवशी सभागृहात प्रश्नोत्तरे झाली नाहीत. याचे उत्तर मी गेली दोन वर्षे या सभागृहामध्ये मागत आहे. ज्या अधिकाऱ्याने हा गुन्हा केला, ज्या अधिकाऱ्याने ही चूक केली त्याला सरकार का पाठीशी घालत आहे हे अजूनही समजलेले नाही. मागासवर्गीय विद्यार्थीनींचा,. काही मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. या जिल्ह्यात टंकलेखकांची भरती करीत असताना लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला. अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्याला पाठीशी घालून आपल्याला काय मिळणार आहे ? अशा पध्दतीने शासन चालणार आहे का ?

सभापती महोदय, माझी आग्रहाची विनंती आहे की, एक तर जो अहवाल विभागीय आयुक्तांनी ठेवलेला आहे तो अहवाल काय आहे, त्या अहवालात विभागीय आयुक्तांनी काय म्हटलेले आहे ? त्यांनी त्याला जबाबदार धरलेले असताना आठ-दहा महिने विभागीय आयुक्तांचा तो अहवाल बाजूला टाकून नुसती छाननी सुरु आहे असे उत्तर देऊन शासन त्याबाबत टाळाटाळ करीत आहे. म्हणून माझी मागणी आहे की, विभागीय आयुक्तांचा अहवाल लक्षात घेऊन त्या अधिकाऱ्यावर ताबडतोब कारवाई करुन मागासवर्गीय विद्यार्थीनींचे जीवन ज्यांनी उद्ध्वस्त केले अशा अधिकाऱ्याची गय न करता, शासनाने त्याला पाठीशी न घालता ताबडतोब त्याच्यावर कारवाई करावी अशी विनंती मी या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून करतो. माननीय मंत्री महोदयांनी या बाबतीत सकारात्मक उत्तर द्यावे अशी विनंती करतो.

---

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी अर्धा-तास चर्चा उपस्थित केलेली आहे. यामध्ये साधारणत: बुलढाणा जिल्ह्यातील लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेमध्ये जो काही गैरव्यवहार झाला होता, त्यामध्ये गैरव्यवहाराच्या ज्या काही तक्रारी होत्या त्याच्या बाबतीमध्ये उपायुक्त, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली आपण चौकशी समिती नेमली होती. प्रामुख्याने ज्या तक्रारी आहेत त्यामध्ये जी प्रश्नपत्रिका तयार केली गेली त्यामध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थितीचे काही प्रश्न असावेत अशा प्रकारच्या सूचना सामान्य प्रशासन विभागाच्या आहेत आणि त्या ठिकाणी जी प्रश्नपत्रिका सादर झाली त्यामध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थितीच्या संदर्भामध्ये काही प्रश्न नव्हते अशी पहिली तक्रार होती. सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाने जो जी.आर.काढलेला आहे किंवा ज्या सूचना दिलेल्या आहेत त्यामध्ये स्थानिक भौगोलिक परिस्थितीच्या संदर्भात प्रश्न असावेत अशा सूचना जरुर आहेत पण त्या सूचनावजा आहेत. त्या बंधनकारक अशा सूचना नाहीत. या संदर्भामध्ये आयुक्तांच्या समितीने असे सांगितले आहे की, यामध्ये गंभीर अनियमितता झालेली आहे पण छाननीच्या वेळी असे लक्षात आले की, हे बंधनकारक नसल्यामुळे ही काही फार गंभीर प्रकारची अनियमितता नाही. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी ज्या तीन अधिकाऱ्यांची निवड केली होती आणि ज्यांनी हे स्थानिक प्रश्न समाविष्ट केले नाहीत त्या तीन अधिकाऱ्यांवर मात्र या चौकशी समितीने कोणत्याही प्रकारचा दोषारोप ठेवलेला नाही. तेव्हा या चौकशी समितीला माहीत होते की, या तीन अधिकाऱ्यांच्या समितीकडे ही प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम दिलेले आहे त्यामुळे त्यामध्ये केवळ जिल्हाधिकाऱ्यांचा दोष नाही. जर ते बंधनकारक असते तर दोष असता. परंतु ज्या तीन अधिकाऱ्यांनी प्रश्नपत्रिका तयार केली त्यापैकी दोन अधिकाऱ्यांनी त्यामध्ये स्थानिक परिस्थितीनुसार प्रश्न विचारले नाहीत हा त्या प्रश्नपत्रिका तयार करणाऱ्या अधिकाऱ्यांचा दोष असताना सुध्दा चौकशी समितीने त्यांना दोषी धरलेले नाही. त्या बाबतीत कोणताही उल्लेख या चौकशी अहवालामध्ये नाही.

सभापती महोदय, दुसरा जो दोषारोप होता त्यामध्ये त्यांनी इतर मागास प्रवर्गातील चार उमेदवारांना परस्पर खुल्या प्रवर्गात दर्शविले अशा प्रकारचा दोषारोप आहे. यामध्ये या ठिकाणी जे

..3..

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके ....

चार उमेदवार आहेत त्यांच्यापैकी एकाने यासंदर्भात मॅटमध्ये याचिका दाखल केली होती. परंतु मॅटचा जो निर्णय लागलेला आहे त्यामध्ये त्यांनी सुध्दा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेला जो निर्णय आहे तो योग्य ठरविलेला आहे. त्यांचे नॉन क्रिमिलेयरचे सर्टिफिकेट त्यांच्या अर्जासोबत नसल्यामुळे जरी इतर मागासवर्गीय प्रवर्गातून त्यांनी अर्ज केलेला असला तरी त्यांना खुल्या प्रवर्गामध्ये टाकण्याचा जो निर्णय जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेला आहे तो योग्य आहे असे मॅटचे म्हणणे आहे. मॅटचा निर्णय असताना त्याच्या बाबतीत आपण काही तरी दोष लावणे हे कितपत योग्य आहे असा आमच्यासमोर प्रश्न आहे. इतरही दोन उमेदवारांनी मॅटमध्ये न्याय मागण्यासाठी आपापले म्हणणे मांडलेले आहे, तक्रार मांडलेली आहे. परंतु ती बाब अजून प्रलंबित आहे. त्यामुळे या बाबतीमध्ये जी भूमिका जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेली आहे ती भूमिकाच मॅटने मान्य केलेली आहे. जिल्हाधिकाऱ्यांची जी कृती आहे ती योग्य आहे असे त्यांनी म्हटलेले आहे.

तक्रारीतील जो चौथा आक्षेप आहे त्यामध्ये महसूल विभागातील कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांना नियमबाह्य नेमणुका देण्यात आल्या, अशा प्रकारची तक्रार आहे. यामध्ये कार्यालयीन काही कर्मचारी आहेत त्यांची बहीण असेल, मुलगी असेल यांची निवड झालेली आहे. परंतु त्यांची निवड ही त्या परीक्षेमध्ये त्यांना जे गुण मिळालेले आहेत त्याच्या आधारावर झालेली आहे. ते नातेवाईक आहेत म्हणून त्यांची त्या ठिकाणी निवड करण्यात आलेली नाही. केवळ ते नातेवाईक आहेत म्हणून त्यांना डावलण्याचा कोणताही अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना नाही. ज्यांनी जाहिरातीप्रमाणे अर्ज केले आणि परीक्षेमध्ये त्यांना जे गुण मिळाले त्यांना कोणत्या कायद्याखाली किंवा कोणत्या अधिकाराखाली डावलणार ? त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार झालेला आहे किंवा इतर कारणामुळे डावलले आहे किंवा त्यांची निवड झालेली आहे असे काही चौकशी समितीने आपल्या अहवालात म्हटलेले नाही. उपायुक्तांच्या अध्यक्षतेखालील जी काही समिती आहे त्या समितीने शासनाला अहवाल दिलेला आहे. प्रत्येक चौकशी समितीचा अहवाल शासनाकडे आल्यानंतर त्याची छाननी होतच असते. मला आपल्याला निश्चितपणे सांगावयाचे आहे की, अहवाल आला म्हणून सहसा लगेच कारवाई होत नाही. मंत्रालयातील विभाग त्याची छाननी करतो

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. प्रकाश सोळंके ....

आणि वेळप्रसंगी सामान्य प्रशासन विभागाकडे किंवा जेव्हा गरज असेल तेव्हा विधी व न्याय खात्याकडे सुध्दा आपण त्या बाबतीत विचारणा करतोृ आणि त्याच्या नंतरच त्यावर कारवाई करण्याचा निर्णय आपण घेत असतो. छाननीचे काम पूर्ण झालेले आहे. जी छाननी झालेली आहे त्या बाबतीतील प्रस्तावाची फाईल सन्माननीय मंत्री महोदयांकडे गेलेली आहे. त्यामध्ये छाननीनंतर काय आढळून आले त्या संदर्भात निश्चितपणे येत्या आठ दहा दिवसामध्ये माननीय मंत्री महोदय निर्णय घेतील. चौकशी समितीचा अहवाल आणि छाननीनंतरची बाब या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्या ठिकाणी योग्य ती कारवाई केली जाईल.

----

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याजवळ त्या मुलीने स्पेसिफिक तक्रार केली होती. ती तक्रार माझ्याजवळ आहे. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, बुलढाणा, विषय- लिपिक-टंकलेखक पदाबाबत, अर्जदार कु.निर्मला विश्वनाथ घोडके, माळविहीर, ता.जि.बुलढाणा, माननीय महोदय, वरील विषयानुसार मी अर्जदार कु.निर्मला विश्वनाथ घोडके, दिनांक 24 जुलै, 2009 या दिनांकाच्या जाहिरातीनुसार मी माझा अर्ज लिपिक व टंकलेखक या पदासाठी इतर मागास प्रवर्गातून रुपये 75 चा डी.डी. भरलेला आहे. सोबत शाळेची पूर्ण कागदपत्रे व जातीचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. अर्ज क्रमांक 196 व परीक्षा बैठक क्रमांक 0099 हा आहे. तसेच माझ्या परीक्षेचे गुण 174 आहेत. तरी माझा अर्ज जाणीवपूर्वक खुल्या प्रवर्गात टाकण्यात आला आहे असे म्हटले आहे. तिने इतर मागास प्रवर्गात अर्ज केला होता. पण जाणीवपूर्वक या कामुणे महाशयाने तिचा अर्ज खुल्या प्रवर्गात घातला आहे. मी इतर मागास प्रवर्गात अर्ज केलेला असल्यामुळे माझी नियुक्ती करण्यात यावी अशी तिने विनंती केलेली आहे.

सभापती महोदय, माझ्याजवळ अंतिम निवड यादी आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने गुणानुसार यादी तयार केलेली आहे. त्यामध्ये या मुलीचे सर्वात वर नाव आहे. श्री.प्रल्हाद शंकरराव शेळके 172, श्री.धनंजय तुळशीराम मुरुमकर 172, श्री.गजानन रामदास काळवाघे 172,
श्री.रविंद्र नारायण चव्हाण 172, श्री.सत्यविजय जाधव 172, श्री.चेतन सुभाषराव लोखंडे 164, श्री.चंद्रकांत किसन भाऊसार 164. म्हणजे या यादीतील सर्व उमेदवारांचे गुण 174 पेक्षा कमी आहेत. या मुलीने इतर मागास प्रवर्गातून अर्ज केला होता, जातीचे प्रमाणपत्र जोडले होते, 75 रुपयांचा डी.डी.जोडला होता. परीक्षेत 174 गुण मिळाले होते. अंतिम निवड यादी प्रसिध्द झ ाल्यावर ओ.बी.सी.मधील उमेदवारांपैकी याच मुलीला 174 गुण मिळालेले आहेत. या अधिकाऱ्याच्या जवळच्या उमेदवारांना नियुक्ती द्यावयाची होती म्हणून ओ.बी.सी.मधील काही मुलींची नावे जाणीवपूर्वक खुल्या प्रवर्गात ट्रान्सफर केली. खुल्या प्रवर्गात तिचे नाव घातले, पण तिच्याजवळ क्रिमिलेअर सर्टिफिकेट नाही. या एका कारणामुळे तिची खुल्या प्रवर्गात झालेली निवड रद्द करण्यात आली. खरे तर तिची कॅटेगरी बदलण्याची गरज नव्हती. पण जवळच्या मुलांना ॲडजेस्ट करण्यासाठी तिची कॅटेगरी बदलण्यात आली. त्यामुळे तिच्यावर अन्याय झालेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त झालेल्या प्रमाणित प्रती माझ्याजवळ आहेत. परंतु मंत्री महोदय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री पांडुरंग फुंडकर....

सांगत आहेत की, या भरतीतील तीन अधिकारी मॅटमध्ये गेले. येथे प्रश्नपत्रिकेसंबंधी सांगण्यात आले आहे. परंतु हा प्रश्नपत्रिकेचा विषयच नाही. तिने इतर मागास प्रवर्गातून अर्ज केला होता, त्या प्रवर्गात तिला सर्वात जास्त म्हणजे 174 गुण मिळालेले असताना तिला खुल्या प्रवर्गात टाकण्यात आले. एवढाच मुद्दा आहे. मंत्री महोदयांनी असे सांगितले की, याबाबतची फाईल मंत्री महोदयांकडे जाणार आहे, त्यावर ते सही करतील. त्याचे उत्तर येईल. गेली दीड वर्षे सभागृहात हा विषय उपस्थित करीत आहे. मला अजूनही उत्तर आलेले नाही. जिल्हाधिका-यांकडे तिने तक्रार केलेली आहे त्यानुसार चौकशी करण्यात आलेली आहे की नाही ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी गुणांसंबंधीची माहिती सांगितली आहे. परंतु त्या मुलीने इतर मागास प्रवर्गातून अर्ज केला होता. तिने जातीचे प्रमाणपत्र जोडले होते, ही वस्तुस्थिती आहे. पण नॉन क्रिमिलेअर सर्टिफिकेट देणे बंधनकारक असताना सुध्दा तिने ते दिलेले नव्हते....

श्री.पांडुरंग फुंडकर : खुल्या प्रवर्गातून अर्ज केला असेल तर क्रिमिलेअर सर्टिफिकेट द्यावे लागते. इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना हे प्रमाणपत्र द्यावे लागत नाही. तिने जात वैधता प्रमाणपत्रही सादर केले होते.

श्री.प्रकाश सोळंके : मी एवढेच म्हटले आहे की, इतर मागास प्रवर्गातील उमेदवारांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. ते न दिल्यामुळे तिचा आपोआप समावेश प्रवर्गात खुल्या झाला. अधिकाऱ्याने तसा निर्णय घेतला आहे. त्या निर्णयाविरुध्द उमेदवार मॅटमध्ये गेले होते. मॅटचे असे म्हणणे आहे की, या मुलीची कॅटेगरी बदलण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी घेतलेला निर्णय योग्य आहे. मॅटच्या कोर्टात हा निर्णय सिध्द झालेला आहे. त्यामुळे त्यांनी जाणीवपूर्वक हा निर्णय घेतला आहे असे आपल्याला कसे म्हणता येईल ? मी यापूर्वीच असे सांगितले आहे की, या अहवालाची छाननी झालेली आहे,. मंत्री महोदयांकडे याबाबतची फाईल आलेली आहे त्यावर येत्या 15 दिवसात शासन निर्णय घेईल.

**तालिका सभापती ( श्री.भगवान साळुंखे )** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते एका मुद्याबाबत सातत्याने लक्ष वेधत आहेत. त्या मुलीला सर्वात जास्त मार्क्स मिळालेले आहेत. त्यामुळे तिला कोणत्या ना कोणत्या प्रवर्गातून नियुक्ती मिळावी असा त्यांचा आग्रह आहे.

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, तिला हाईएस्ट मार्क्स इतर मागास प्रवर्गात मिळालेले आहेत. हे मला मान्य आहे. ही मुलगी याच प्रवर्गात असती तर तिची प्रथम क्रमांकाने निवड झाली असती. पण तिने नॉन क्रिमिलेअरचे सर्टिफिकेट सादर न केल्यामुळे तिचा खुल्या वर्गात समावेश करण्यात आला. त्यामुळे खुल्या प्रवर्गात ती प्रतिक्षा यादीवर आहे. खुल्या प्रवर्गात तिच्या पेक्षाही जास्त गुण मिळालेले उमेदवार आहेत. त्यामुळे त्यांची निवड झालेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : तिने जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले होते. तिने असे सांगितले होते की, 3 महिन्यात मी क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र आणून देते. हा नियम आहे. तिला 3 महिन्यांची मुदत न देता तिला खुल्या प्रवर्गात टाकून तिच्यावर अन्याय करण्यात आला. हे बरोबर नाही.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, यह विषय बहुत छोटा है, लेकिन बहुत महत्वपूर्ण विषय है. हमारे विरोधी पक्ष नेता सम्माननीय श्री पांडुरंग फुंडकर जी ने तारांकित प्रश्न भी पूछा था, उसका माननीय मंत्री महोदय ने उत्तर भी दिया है. लेकिन उस उतर से संतुष्ट न होने की वजह से ही यह चर्चा माननीय विरोधी पक्ष नेता ने यहां पर लायी है. मेरा कहना है कि अगर निचले स्तर पर, जिला अधिकारी लेवल पर या निवड प्रक्रिया लेवल पर या सिलेक्शन कमेटी लेवल पर कोई गड़बड़ी हुई है तो सरकार द्वारा उसका बचाव करने के बजाय संबंधित परीक्षार्थी को न्याय देने का प्रयत्न करना चाहिए.

उन्होंने कहा कि डिवीजनल कमीशनर ने इंक्वायरी की है और उसकी रिपोर्ट आयी है और वह रिपोर्ट माननीय मंत्री महोदय के पास है, वे सब बातें ठीक हैं विभागीय आयुक्त का निर्णय जो होगा उस पर सरकार निर्णय लेगी. परन्तु माननीय विरोधी पक्ष नेता ने यहां पर तथ्य रखा है, उसकी सर्टिफाइड कॉपी के बारे में भी यहां पर बताया है. यह बात सही है कि उस परीक्षार्थी ने ओबीसी कॅटेगीरी में एप्लाय किया होगा. लेकिन उसने सबसे हाइएस्ट मार्क सिक्युअर किए होंगे, जो कि 174 हैं और उसने अगर क्रिमिलियर का सटिर्फिकेट नहीं दिया तो भी माननीय विरोधी पक्ष नेता ने भी यहां पर कहा है कि उसको समय दिया जाना चाहिए. जिला अधिकारी द्वारा समय दिया जाना चाहिए. उसको बताया जाना चाहिए कि क्लर्क कम टाइपिस्ट के

...4

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

NTK/

श्री जमा...

लिए आपका नंबर पहला या दूसरा है. आप इतने दिन के अंदर क्रिमिलियर का सर्टिफिकेट दीजिए और इतने दिन के अंदर आपको अपाइंटमेंट मिलेगा. ऐसा न करते हुए उसको यदि ओपन कॅटेगरी में भी यदि रखा और किसी दूसरे व्यक्ति के मार्कस उससे ज्यादा हैं तो इसका अपाइंटमेंट रिजेक्ट होना वाजिब हो सकता है. वे कह सकते हैं कि कुमारी निमला सिलेक्ट नहीं हुई.

माननीय मंत्री महोदय ने यहां पर मॅट में जाने की बात कही है. मैं कहूंगा कि यह ट्रिब्युनल है. यह फुल फलेश ज्युडिशल कोर्ट नहीं है. ट्रिब्येनल किसी बात पर इन्फलुएंश हो सकती है. वहां पर अपनी बात रखने में कोई व्यक्ति कम पड़ सकता है. इसलिए उस सिलेक्शन प्रॉसेस का 100 प्रतिशित ज्युडिशल रिव्यु हो गया है, ऐसा मानना सरकार के लिए उचित नहीं होगा. क्योंकि यह एडमिनिस्ट्रेटिव ट्रिब्युयनल है. जो लोग ट्रिब्युनल में गए हैं वे लोग बाद में कोर्ट में जाएंगे या नहीं जाएंगे, वह एक अलग बात है. लेकिन सभापति महोदय, शासन से मेरा एक स्पेसिफिक प्रश्न है कि इस बात की छाननी होनी चाहिए कि यदि उसको ओपन कॅटेगिरी में डाला गया है तो उसका ओपन रेंकिंग क्या है. वह पहले नंबर पर थी, दूसरे नंबर पर थी या तीसरे नंबर पर थी. दूसरी बात यह है कि यदि वह ओपन कॅटगिरी में भी यदि मेरिट लिस्ट में दूसरों को कंपीट करती है तो शासन द्वारा उसको तुरंत अपाइंटमेंट देनी चाहिए. दूसरी बात मुझे यह कहनी है कि डिवीजनल कमीशनर की जो रिपोर्ट आयी है उस पर शासन निर्णय लेगी और वह निर्णय जो भी हो, लेकिन उस बच्ची के साथ यदि नाइंसाफी हुई है तो उसको जल्द से जल्द इंसाफ मिलना चाहिए. इस बारे में शासन का क्या निर्णय है ?

नंतर श्री.गिते......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : या ठिकाणी सदरील विद्यार्थिनीने इतर मागासवर्गीय प्रवर्गातून अर्ज केला होता. आता पात्र, अपात्रचे निकष पाहिले तर तिने नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट जोडले नाही. एक तर जिल्हाधिकारी यांनी तिचा अर्ज अपात्र म्हणून ठेवला असता. परंतु जिल्हाधिकारी यांनी तसे केले नाही. त्यांनी त्या विद्यार्थिनीस ओपन प्रवर्गातून संधी देण्याचा प्रयत्न केला. सन्माननीय सदस्य श्री. जमा साहेब म्हणता आहेत की, तिला 174 गुण मिळालेले आहेत. तिचा रँक नंबर हा खुल्या प्रवर्गातील आहे. खुल्या प्रवर्गातील पहिल्या क्रमांकाचे गुण 192, क्रमांक दुसरा आणि तिसऱ्याचे गुण क्रमांक 196 आणि चवथ्या क्रमाकांच्या उमेदवारास 184, त्यानंतर 182, त्यानंतर 178, त्यापुढे 178 आणि प्रतिक्षा सूचीमधील जी विद्यार्थिनी श्रीमती वनिता गणेश आहे तिला 176 ्गुण आहेत. प्रतिक्षा सूचीमध्ये तिचा नंबर आघाडीवर असून तिला 174 गुण आहेत. मला मान्य आहे की, आपण तिची इतर मागावर्गीय प्रवर्गाशी तुलना करीत आहात..

श्री. पांडुरंग फुंडकर : त्यांनी खुल्या प्रवर्ग महिला असे म्हटले आहे. यामध्ये गुणांची क्रमवारी अशी आहे की, 158, 158, 156, 152, 150, 150 आणि प्रतिक्षा सूचीमध्ये 142,140 आणि 136 अशी आहे. यात सत्य माहिती कोणाची मानावयाची हा खरा प्रश्न आहे. माझ्याकडे जिल्हाधिकारी यांचे पत्र उपलब्ध आहे. आपण कोणाला कशाला पाठीशी घालता आहात, तुम्ही संबंधित अधिकाऱ्यांचा बचाव कशासाठी करता आहात.

श्री. प्रकाश सोळंके : कोणत्याही अधिकाऱ्याचा बचाव करण्याचे कारण नाही. परंतु अधिकाऱ्यांचा दोष नसताना त्यांचे विरुध्द कारवाई करणे बरोबर नाही. या ठिकाणी जिल्हाधिकारी यांनी निवडीच्या बाबतीत जी ॲक्शन घेतलेली आहे. ती मॅटमध्ये अपहेल्ड झाली. मॅटचा निर्णय विभागीय आयुक्तांना लागू आहे. शासनाला लागू आहे. मॅट हे ॲडमिस्ट्रेटिव्ह कोर्ट आहे म्हणून त्यांचा निर्णय लागू होत नाही असे होत नाही. मॅटचा निर्णय विभागीय आयुक्त आणि शासनास लागू आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी श्री. पांडुरंग फुंडकर यांनी आता जी बाब निदर्शनास आणून दिली आहे. ती तपासून घेण्यात येईल. या बाबतीत शासन स्तरावर कोणत्याही प्रकारचा निर्णय घेतलेला नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडील जी काही माहिती या ठिकाणी सांगितली, ती माहिती देखील तपासून घेण्याची माझी तयारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सन्माननीय सभापती महोदय, हा एका महिलेचा नोकरीचा प्रश्न आहे. ती मागासवर्गीय महिला आहे. त्या महिलेच्या केसच्या बाबतीत माननीय विरोधी पक्ष नेते कळकळीने आपणाला सांगत आहेत. तसेच गेल्या दीड वर्षापासून ते या प्रकरणाचा पाठपुरावा करीत आहेत. ती बाब ट्रिब्यूलनमध्ये गेली आहे अशी माननीय मंत्री महोदय माहिती देत आहेत, त्यांची माहिती चुकीची आहे असे मी म्हणत नाही. ब-याच वेळा काही मुद्दे ट्रिब्यूनल समोर आले नाही, तर एखाद्या वेळेस अन्यायकारण निर्णय होऊ शकतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या प्रकरणासंबंधी सविस्तर अशी माहिती दिली आहे. ती माहिती जाणून घेतल्यानंतर सकृतदर्शनी असे वाटते की, या प्रकरणामध्ये काही तरी गडबड झालेली आहे. शासन हे जनतेला न्याय देण्याचे काम करीत असते. तसे काम हे आघाडी सरकार करीत आहे. या प्रकरणाची माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडे असलेली सर्व कागदपत्रे मागवून घेऊन त्यांची फेरतपासणी करुन घेऊन माननीय विरोधी पक्ष नेते, संबंधित महिला आणि माननीय मंत्री महोदय अशी एकत्रित बैठक घेऊन, त्या प्रकरणाची सुनावणी घेऊन त्या महिलेवरील अन्याय 15 दिवसात दूर करतील काय ?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, त्या मुलीकडे नॉन क्रिमीलेअर सर्टिफिकेट नसल्यामुळे हे सर्व रामायण घडते आहे. यापूर्वी अनेक विद्यार्थी वा उमेदवार यांना ओ.बी.सी.प्रवर्गामध्ये संधी दिलेली आहे, अशी आपल्याकडे अनेक उदाहरणे आहेत. ही माहिती हवी असेल तर ती माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यास तयार आहे. ती मुलगी त्या प्रवर्गात असून सुध्दा तिच्यावर अन्याय झाला असे वाटत असल्यामुळे शासन मानवतेचा दृष्टीकोन समोर ठेवून त्या मुलीस न्याय दिला जाईल.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते हा विषय सभागृहात सातत्याने उपस्थित करीत आहेत. नियम 93 च्या अनुषंगाने तसेच लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून हा विषय सभागृहात उपस्थित केला गेला आहे. सभागृहात हा विषय उपस्थित झाल्यानंतर सन्माननीय सदस्य तेच तेच प्रश्न उपस्थित करीत आहेत, त्या प्रश्नांना माननीय मंत्री महोदय पूर्वी प्रमाणेच उत्तर देत आहेत.या प्रश्नाची कोठे तरी तड लागण्याची आवश्यकता आहे. सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी व श्री. भाई जगताप यांनी जी सूचना केली आहे, त्यांच्या सूचनेचा संदर्भ घेऊन येत्या 15 दिवसांच्या आत सर्व सबंधितांना, आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या दालनामध्ये एक

3..

श्री. रामनाथ मोते..

बैठक बोलवावी आणि त्या बैठकीत हा विषय कायमचा संपवावा, अशी माझी माननीय राज्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय राज्यमंत्री महोदयांनी या ठिकाणी पुरुष खुल्या प्रवर्गातील गुण वाचून दाखविले.

श्री. प्रकाश सोळंके : ते खरे आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझे आपणास आव्हान आहे की, खुल्या महिला प्रवर्गातील गुणांची यादी आपण या ठिकाणी वाचून दाखवावी.

श्री. प्रकाश सोळंके : मी या ठिकाणी मान्य केले आहे की,...

श्री. पांडुरंग फुंडकर : तुम्ही खुल्या पुरुष वर्गाची गुणांची यादी या ठिकाणी का वाचून दाखविली.

श्री. प्रकाश सोळंके : मी मान्य केले आहे की, तुम्ही जी माहिती देता आहात ती खरी असावी.

श्री. पांडुरंग फुंडकर : माननीय राज्यमंत्री महोदयांनी पुरुष खुल्या प्रवर्गाची माहिती या ठिकाणी वाचून दाखविली आहे. महिला खुल्या प्रवर्गाची माहिती दिली नाही.

श्री. प्रकाश सोळंके : त्या महिलेस महिला खुल्या प्रवर्गात टाकले असते तर तिची निवड झाली असती ही गोष्ट मला मान्य आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : त्या महिलेस खुल्या प्रवर्गात टाकले आहे. माझ्याकडे या प्रकरणासंबंधीची सर्व कागदपत्रे उपलब्ध आहेत, ती मी आपणास सादर करतो. तिला महिलेच्या खुल्या प्रवर्गात का टाकले नाही. तिला खुल्या प्रवर्गात का टाकले ? महिलांसाठी तेथे खुला प्रवर्ग आहे. महिलेच्या खुल्या प्रवर्गातील गुण आपण वाचून दाखवा. आपणाकडे जर ती माहिती नसेल तर ती माहिती मी वाचून दाखवितो.

**तालिका सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे मुद्दे माननीय महसूल राज्यमंत्र्यांच्या लक्षात आलेले आहेत. त्यामुळे आपण कृपया त्यांच्याकडून उत्तर घ्यावे.

श्री. प्रकाश सोळंके : आपणाला पॉझिटिव्ह उत्तर हवे आहे ना? माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सभागृहात जी माहिती दिली आहे, ती सकृतदर्शनी खरी वाटते. त्यांनी सभागृहात दिलेली

4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके..

माहिती 100 टक्के खरी आहे असे मी समजतो. या प्रकरणासंबंधी ते जी कागदपत्रे माझ्याकडे सादर करणार आहेत, त्यांची तपासणी आम्हाला करावी लागेल. त्यांनी दिलेली माहिती सकृत्‌दर्शनी खरी आहे. त्या मुलीची खुल्या प्रवर्गात निवड झाली नाही. खुला प्रवर्ग (महिला) या एवेजी खुला प्रवर्ग (पुरुष) यात तिचे नाव अंतर्भूत केले म्हणून तिची निवड होऊ शकली नाही. पण तिने मिळविलेल्या गुणांच्या आधारे महिलांसाठी राखीव असलेल्या खुल्या प्रवर्गात तिची निवड होत असेल तर त्या महिलेच्या बाबतीत शासन सकारात्मक निर्णय घेईल. या प्रकरणाच्या बाबतीत माझ्या दालनात संबंधितांबरोबर 15 दिवसात बैठक घेण्यात येईल.

----

यानंतर श्री. भोगले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

